शनिवार । ३० जुलै १९७७
७५ पैसे

# माणूस

## जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीचा वाहक रा. स्व. संघ होणार असा समज आहे संघाला ही क्रांती झेपेल का?

किशोर बेंडकिहाळ, सातारा ( पृष्ठ : ९ )

## कोणता पक्ष पर्यायी व्हावा? मार्क्सवादी कम्युनिस्ट की काँग्रेस?

माहितगार ( पृष्ठ : ५ )

## गिरायपल्ली चकमक अशी घडली....
## चिलकलगुट्टा चकमकीची हकीकत....
## यल्लंडु जंगलातील ती प्रेते....

'नक्षलवादाच्या शोधात' ( पृष्ठ : १८ )

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक नववा

३० जुलै १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# सप्रेम नमस्कार

संपादक, माणूस यांसी,

¤ थोड्याशा अनिच्छेने व सभ्रमात मी हे लिहीत आहे. नवागत व होतकरू लेखकाच्या लेखनाबद्दल आक्षेप घेणे हे काम नेहमीच त्रासदायक असते, पण ते मी आज करीत आहे श्री. शिरीष सहस्रबुद्धे याचे लेखन मी बराच काळ वाचीत आहे. ते मला फारच तुच्छतापूर्ण व शेरेबाज वाटते हे नमूद करण्यास खेद होतो.

माझ्या आठवणीप्रमाणे श्री. सहस्रबुद्धे आजवर सिनेमाची सर्व अंगे, अभिनय, संगीत, दिग्दर्शन, साहित्यमूल्ये, नाट्यदिग्दर्शन, नाट्यवस्तु, रंगभूमीची सर्व अगे यावर मत-प्रदर्शन करून चुकले आहेत या सर्व क्षेत्रात आपणास बरेच काही समजते, त्याचप्रमाणे विद्यमान कलाकार, लेखक, दिग्दर्शक वगैरेंस काडीची अक्कल नाही, असे भासविण्याचा सहस्रबुद्धे याचा प्रयत्न असतो. समीक्षकाची वस्त्रे अंगावर चढविल्याने त्याचा असा गैर-समज झाला आहे की त्यांनी या सर्व विविध शाखाचा सखोल अभ्यास केला आहे! माझ्या कल्पनेप्रमाणे कोणत्याही कलासाध-नेच्या क्षेत्रात, एकेका कसबासाठी जन्मजन्म घालवावा लागतो. अशा परिस्थितीत आपल्या नाट्यसिनेक्षेत्रातील प्रथम दर्जाच्या व्यक्ती-बद्दल शेरे मारताना सहस्रबुद्धे यानी थोडा संयम बाळगावा अशी अपेक्षा करावी काय?

त्याच्या चौफेर ज्ञानाचे नवनवे पैलू दृष्टो-त्पत्तीस येत आहेत. 'किनारा'च्या परी-क्षणात त्यानी वैद्यकक्षेत्रावरही आपला अधि-कार असल्याचे सूचित केले आहे. त्याचप्रमाणे जे. वेंगल रावसारख्या, चार वर्षे मुख्य मत्री असलेल्या गृहस्थालादेखील शब्दांत पकडण्या-इतके वकिली कसबही त्यांच्यापाशी आहे हेही नव्याने कळले

या शेवटच्या प्रकाराबद्दल मला आणखीही काही कुतूहल आहे ते असे–पत्रकार एखाद्या चळवळीची, प्रक्रियेची माहिती घेण्यासाठी जातात तेव्हा ते कोणाला शब्दांत पकडण्या-साठी जात असतात काय? स्पॉट रिपोर्टिंगचा हेतू हा असू शकतो काय? त्याचप्रमाणे श्री. राव 'आपल्याला हवे तसेच व तेच बोलले' म्हणजे काय? आपण काही पूर्व-कल्पना सिद्ध करण्याचा हेतू धरून आंध्रातील परिस्थितीची पाहणी करवीत आहात काय? पत्रकारितेचा हा नवा प्रकार फारसा विश्वा-सार्ह वाटत नाही.

श्री. सहस्रबुद्धे याचा बनचुकेपणाचा हा पवित्रा बऱ्याच प्रमाणात त्यांच्या नवशिके-पणातून उद्भवला आहे हे ध्यानात घेऊन त्याच्या लेखनावर अधिक तीव्रपणे लिहिण्यास मन घेत नाही. शिवाय त्यांच्या लेखनातून जी अभावित विनोदनिर्मिती होते, तिचा आनंदही वारंवार मिळतो ही गोष्टही विस-रून चालणार नाही. एकच उदाहरण देतो. 'मेहबूबा' चित्रपटाच्या परीक्षणात श्री. सहस्रबुद्धे गंभीरपणे तक्रार करतात 'किशोर-कुमारच्या गाण्यातील बनावटी दर्द ऐकवत नाही' हे विधान म्हणजे एक षट्कारच आहे. पार्श्वगायकाच्या गाण्यात दर्द वा कोण-तीही भावना जी असेल ती (Simulated) सिम्युलेटेडच असणार–किशोरकुमार दु:खी गाणे म्हणत असताना, त्याच्यावर व्यक्तिगत-रीत्या एखादे संकट कोसळलेले असावे असे तर सहस्रबुद्धे मानीत नाहीत ना?

सहस्रबुद्धे यांनी उदंड लिहावे. उत्साहाने लिहावे; पण ज्यानी आज कलाक्षेत्रासारख्या जीवघेण्या स्पर्धेच्या क्षेत्रात स्वतःच्या टॅलटने स्वत चे नाणे पाडले आहे अशा प्रथम श्रेणीच्या कलावतावर (उदा : लक्ष्मीकात प्यारेलाल, किशोरकुमार, गुलजार, आर. डी. बर्मन इ.) ताशेरे झाडण्याचा मोह टाळावा. इट इज नॉट कॅरी कन्व्हिक्शन; हे एक आणि दुसरे म्हणजे तुच्छतेचा, आढ्यतेचा सूर सातत्याने लावून ठेवला तर वाचकांनाही कंटाळा येतो.

५।७।७७ –चंद्रशेखर मराठे

स. न. वि. वि.

¤ आपल्या 'माणूस'च्या दि. २ जुलै १९७७ च्या अंकात श्री. शिरीष सहस्रबुद्धे

यानी दीर्घपणे लिहिलेले गुलजारच्या 'किनारा' चित्रपटाचे परीक्षण वाचले

परीक्षण वाचून फार आश्चर्य वाटले श्री. शिरीष सहस्रबुद्धे हे एक नावाजलेले, अनुभवी चित्रपटसमीक्षक असताना त्यांच्याकडून यापेक्षा चांगल्या परीक्षणाची आशा होती. इतके एककल्ली परीक्षण वाचून खरेच खेद वाटला. सहस्रबुद्धे यानी परीक्षण करण्याची एक आगळीच पद्धत शोधून काढलेली दिसली गुलजारच्या 'किनारा' चित्रपटाचे परीक्षण करता करता त्यानी मध्येच गुलजारच्या आजपर्यंतच्या 'मेरे अपने' पासूनच्या सर्व चित्रपटाचेही परीक्षण केले आहे. म्हणजे 'किनारा'चे परीक्षण राहिले बाजूला आणि 'ते' परीक्षण झाले 'गुलजारचे चित्रपट' याचे या परीक्षणपद्धतीमुळे कलाकृतीवर अन्याय होतो हे माझे मत हा अन्याय जसा कलाकृतीवर होतो तसाच तो कलाकृतीच्या निर्मात्यावरही होतो इथे असा अन्याय गुलजारवर झाला आहे एखाद्या कलाकाराकडून अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही, पण जगातले सर्वोत्कृष्ट कलाकार सर्वच कलाकृती फार उत्कृष्ट वा सारख्याच सुदर देतात असे नाही. हे उदाहरण सर्वच कलाच्या क्षेत्रात नीट पाहिल्यास लक्षात येईल त्यामुळे गुलजारच्या आजपर्यंतच्या चित्रपटापेक्षा 'किनारा' फार बोगस झाला आहे हे सहस्रबुद्धे याचे मत म्हणजे गुलजारवर केलेला अन्याय असे मला वाटते

सहस्रबुद्धे हे जाणतातच त्यानी ते स्पष्टही केले आहे, पण गुलजारवर, त्याच्या कवितेवर त्याच्या आजपर्यंतच्या चित्रपटावर त्याचे प्रेम आहे म्हणून ते इतक्या चिडीने वा पोटतिडकीने गुलजारचा समाचार घेताना दिसले, पण एखाद्या कलाकारावरचे अतीव प्रेम हे जर असे अडचणीचे व्हायला लागले तर त्याचाही वेळीच विचार केला पाहिजे. म्हणूनच हे पत्र लिहिण्याचा सभार

गुलजारकडून सहस्रबुद्धे वास्तववादी चित्रपटाची अपेक्षा ठेवतात मी इथे त्याना एक विचारू इच्छितो–आजपर्यंत गुलजारनी दिलेले सर्व चित्रपट 'शाम बेनेगल वा सत्यजित राय' याच्या तुलनेत वास्तववादी होते असे त्याना वाटते काय? गुलजारने आजपर्यंत सर्वोत्कृष्ट दिलेला चित्रपट म्हणजे 'अचानक'. ती गुलजारची पातळी, त्याचे इतर सर्व चित्रपट हे त्याच्या खालीच येतील. –'आँधी'सुद्धा. अशा 'अचानक'मध्ये सुद्धा गुलजार वास्तवतेपासून काही वेळा दूर गेला आहे. कदाचित तो त्याचा पिंड नसेल. आँधी वा कोशिश हे चित्रपट–ज्यातील 'कोशिश'चा सहस्रबुद्धे साधा उल्लेखही करीत नाहीत – अकुर वा निशांत इतके वास्तववादी कसे असावेत? ही अपेक्षा ठेवणे हीही एक चूक आहे असे वाटते म्हणून 'किनारा' हा एक बाजारू, धदेवाईक चित्रपट झाला आहे हे त्याचे म्हणणे मान्य करता येणे शक्य नाही गुलजारनी आजपर्यंतच्या आपल्या पद्धतीनेच 'किनारा' दिले आहे अर्थात 'किनारा'-मध्ये उणीवा नाहीत असे मला म्हणायचे नाही. 'किनारा'च्या कथेत खूप गोंधळ आहे. ती कथा के ए अब्बास याच्या 'अचानक' वा 'कमलेश्वर' याच्या 'आँधी' एवढ्या उचीची नाही. भूषण वनमाळी याची कथा स्वीकारण्यात गुलजारने चूक केली आणि छोट्या कथेवर लाब–१६ रिळाचा चित्रपट काढला हे मला मान्य आहे रगही भडक वापरलेत हेही मान्य. मोठे सेटस् वापरून भव्यता आणलीय हेही मान्य. या तात्रिक उणीवाची जबाबदारी 'गुलजार'वर नक्की येते; पण एवढेच म्हणजे 'किनारा' नव्हे. 'किनारा'तील कविताही सहस्रबुद्धे याना गुलजारच्या आजपर्यंतच्या कवितेपेक्षा कमी दर्जाची वाटते हाही एक विनोद. 'किनारा'मध्ये किती तरी गाण्याच्या ओळी गुलजारने त्याला शोभतील अशाच दिल्या आहेत, पण त्याची साधी दखलही सहस्रबुद्धे घेत नाहीत

'नाम गुम जाएगा
चेहरा ये बदल जाएगा
मेरी आवाजही पहचान है
...गर याद रहे'

किंवा 'अबके ना सावन बरसे,
अबके बरस तो बरसेंगी अखियाँ'

या ओळीतील काव्य नेमके सहस्रबुद्धे याना कुठे कमी वाटते? गद्यगीताचा केलेला एक प्रयोग इतका टाकाऊ आहे असे मला वाटत नाही गीताच्या जोडीने सवादाबाबतही असे म्हणता येईल की, ते नक्कीच खालच्या पातळीचे नाहीत. मुळातच कोत्या कथेवर वा ठरीव साच्याच्या कथेवर गुलजारने चित्रपट काढायला नको होता. त्यामुळे आरती सन्यालच्या नाचात बरीच रिळे त्याला वाया घालवावी लागली. हा कथा स्वीकारण्यातला कोतेपणा मजूर आहे; पण अशाही कथेत गुलजारने ज्या पद्धतीने रग भरलेत तिथे त्याचे असलेले थोडेफार यश आहे 'किनारा'च्या थोड्याफार यशात गुलजारचे बरे दिग्दर्शन, उत्कृष्ट सगीत, सुदर फोटोग्राफी, पुरेसे सकलन आणि कदाचित लोकाचे आवडते जितेंद्र, हेमा व धर्मेंद्र हे मुद्दे आहेत यातील एकही सहस्रबुद्धे याना योग्यतेचा वाटत नाही याचे आश्चर्य

दिग्दर्शनाचे किती तरी छोटे छोटे प्रसग चित्रपटात आहेत. ते सर्वच सागत बसत नाही, पण एक सागावासा वाटतो–उदास सध्याकाळी जितेंद्र (इदर) समुद्राच्या पार्श्वभूमीवर गाणे गात असतो. सध्याकाळ सरून जाते 'सूर्य बुडून जातो आणि त्याच्या घरात केव्हाच दिवे लागलेले असतात इथे गुलजारचे काहीच कौशल्य नाही? (अर्थात हा प्रसग 'आनद'मधल्या प्रसंगासारखा वाटतोच, पण यातही फरक आहे) त्याचबरोबर उध्वस्त जुन्या इमारतीमध्ये (मढीच्या) आरतीचे उदध्वस्त हिंडणे तिच्या उध्वस्त प्रेमाची पार्श्वभूमी तयार करते. 'आधी'मध्ये एका गाण्यासाठी वापरलेले गुलजारचे ते तत्र इथे अधिक ताकदीने वापरले आहे असे वाटते त्याचबरोबर एकमेकाचे फोटो घेताना सपूर्ण पडद्यावर अधार होऊन मध्येच फोटोएवढा चेहरा दिसतो हेही एक आगळे तत्र गुलजारने वापरले आहे. त्याचबरोबर गुलजारचे आवडते फ्लॅशबॅकचे तत्र इथे त्याने फार वेगळ्या पद्धतीने वापरले आहे त्याला 'मौसम'चा भडकपणा नाही वा 'आँधी'सारखे तुटकपण नाही असे वाटते मूळ प्रसगातच 'ते' प्रसग मिसळून गेले आहेत हा गुलजारच्या फ्लॅशबॅक तत्राचा विकास आहे असे वाटते. अर्थात त्याच्या

## सहस्रबुद्धे यांच्यासारख्या नावाजलेल्या समीक्षकाचे इतके एककल्ली परीक्षण....

दिग्दर्शनात काही ठिकाणी नाटकीपणा आला आहे हे खरे, पण ते तेवढेच खरे आहे हे जे सहस्त्रबुद्धे याना वाटते ते मला मान्य नाही.

त्याचबरोवर आर. डी बर्मनच्या संगीताचा उल्लेख केवळ एका ओळीत करून सहस्त्रबुद्धे पुढे जातात, हाही अन्यायाचा एक प्रकार. सुदर संगीताचा आर. डी. बर्मन याचा जसा वाटा आहे तसा तो गुलजारचाही आहे ना ? पण हे सहस्त्रबुद्धे माडत नाहीत. तसेच फोटोग्राफीबद्दल. त्याचाही कुठे उल्लेख नाही. हे तंत्रही गुलजारने फार सकसपणे हाताळले आहे. त्याचबरोबर चित्रपटाची गती–हीही गुलजारने हवी तेवढी ठेवली आहे. फार थोडे प्रसग रटाळ झाले आहेत; पण हेही सहस्त्रबुद्धे मांडत नाहीत. अभिनयाबद्दलही इतक्या उथळपणे त्यांनी मतं व्यक्त केलीत की, त्याबद्दल काही लिहिणेही अप्रस्तुत वाटते.

एकूण गुलजारच्या अतीव प्रेमाने श्री. शिरीष सहस्त्रबुद्धे यानी केलेले 'किनारा'चे समीक्षणाचे तारु 'किनारा'बरच आपटून गेले. ते 'किनारा'च्या मुख्य पात्रात जाऊन त्याची खोली मोजू शकले नाही असे वाटते. म्हणूनच सहस्त्रबुद्धे यांच्यासारख्या नावाजलेल्या चित्रपटसमीक्षकाने इतके उथळ, एककल्ली, काही अपेक्षेने केलेले परीक्षण धक्कादायक वाटले. असो. मी माझी मते मांडण्याचा प्रयत्न केला आहे, आपणास योग्य वाटल्यास 'माणूस'मध्ये द्यावीत म्हणजे वाचकाना दुसरी बाजूही कळेल.

सातारा ७–७–७७ **प्रमोद कोपर्डे**

## महत्त्वाच्या मुद्द्यांचा परामर्श....

मा. सपादक, 'माणूस',

श्री. चंद्रशेखर मराठे व श्री. प्रमोद कोपर्डे यांची पत्रे वाचली. माझ्या लिखाणाची इतक्या आस्थेने दखल घेतल्याबद्दल प्रथमतः मला त्यांचे आभार मानले पाहिजेत. सुमारे वर्ष-दीड वर्ष इतराच्या भूमिकावर लिहीत राहिल्यानतर एकदा तरी माझी स्वत.ची या लिखाणामागची भूमिका माझ्या वाचकासमोर माडण्याची संधी श्री. मराठे व श्री. कोपर्डे याच्यामुळे मला मिळत आहे याचे मला समाधान वाटते. ही सधी साधावी याच हेतूने हे उत्तरादाखल लिखाण करीत आहे, दुसरा कोणताच उद्देश नाही. त्याच समाधानातून उभयतांनी केलेली टीका मी साभार स्वीकारतो. श्री. मराठे यानी माझ्या तुच्छतापूर्ण व शेरेबाज लिखाणासबंधी मारलेले उपरोधिक शेरे–ताशेरेही मी स्वीकारतो. माझ्याच लेखनात हे उपरोधाचे हत्यार बरेच वापरले जात असल्याने त्याच्याबद्दल तक्रार करण्याचा मला फारसा हक्क नाही असे वाटते.

या दोन्ही पत्रातील महत्त्वाच्या मुद्द्याचा क्रमाने परामर्श घ्यायचा तर–

१. श्री. मराठे याच्या पत्रातल्या दुसऱ्या परिच्छेदाबाबत एक खुलासा करण अगत्याचं आहे. मी स्वत ला 'समीक्षक' समजत नाही. तसे म्हणवूनही घेत नाही माझी धारणा 'माणूस'मध्ये मी सिनेमा-नाटकासबंधी लिहितो', अशी आहे व स्वत:ची कुठे ओळख करून देण्याचा प्रसग आलाच तरीही मी हेच शब्द वापरतो. मराठे याच्या आरोपातून सुटण्यासाठी मी ही पळवाट शोधीत आहे असे कुणी म्हणू शकेल; परंतु माझी ही भूमिका नवी नाही हे माझ्या जवळच्या लोकाना ठाऊक आहे लेखनाला सुरुवात केल्यापासून मी ही भूमिका घेत आलो आहे आणि सधी मिळेल तेव्हा ती जाहीरपणे माडलेलीही आहे. मी समीक्षकही नाही वा पत्रकारही नाही. 'माणुस'मध्ये मी लिहितो ते एक बऱ्यापैकी रसिक असा सर्वसामान्य प्रेक्षक म्हणूनच. (अर्थात ही गुणवत्ताही श्री. मराठे किंवा इतर कुणी मला नाकारणार असले तरी माझी तक्रार नाही. त्याना आपली मते बाळगण्याचा हक्क आहेच.) चित्रपट/रगभूमीबद्दल आस्था असलेला व त्या कलाकृती डोळसपणे पाहण्याचा प्रयत्न करून त्यावर विचार करू पाहणारा एक प्रेक्षक या नात्याने मी माणूसमधील लेखन करीत आलो आहे यामध्ये मी माणूसच्या संपादकाची वा वाचकांची फसवणूक केली असेल असं त्याच्याकडून आजवर मिळालेला पाठिंबा लक्षात घेता, मला तरी वाटत नाही या कलाचे खरे आश्रयदाते असलेल्या प्रेक्षकवर्गाला त्याच्याबद्दल आपली स्पष्ट मते माडण्याचा अधिकार जरूर आहे. मला तो बजाविण्याची संधी मिळाली आहे, एवढेच.

साराश, श्री. मराठे ज्यांचा उल्लेख पत्राच्या दुसऱ्या परिच्छेदात करतात, ती समीक्षकाची वस्त्रे मी कधीच, जाणीवपूर्वकच; अगावर चढविलेली नाहीत. त्यामुळे कलेच्या विविध शाखाचा आपण सखोल अभ्यास केला आहे असा माझा गैरसमज बिलकुल झालेला नाही. मी काय किंवा विद्यमान कलावत काय, सर्वज्ञ कुणीच नाही व सर्वचजण चुका करू शकतात. स्वतःच्या व त्याच्या लायकीबद्दल माझ्या मनात कोणत्याच प्रकारचे भ्रम (illusions) नाहीत. दुर्दैवाने ज्याचे लिखाण कुठेही छापले जाते अशा सगळयानाच पत्रकार, समीक्षक वगैरे पदव्या आपल्याकडे मिळत असल्याने मलाही सर्वत्र तशा प्रकारे ओळखले जाते, याला माझा इलाज नाही.

अर्थात समीक्षकत्व नाकारण्यामागे माझा पळवाट शोधण्याचा हेतू नाही, तसाच फाजील नम्रपणाही नाही मुद्दा एवढाच की, समीक्षक/पत्रकार हे शब्द आपण फारच स्वस्त, सवग करून टाकले आहेत. समीक्षक व समीक्षा हे इग्रजीतील अनुक्रमे critic व criticism याचे पर्यायवाची शब्द आहेत. हे शब्द आपण इग्रजीत ज्या वजनाने व तोलामोलाने, राखीवपणाने वापरतो त्याचा विचार करता मराठीत स्वत ला समीक्षक म्हणवून घेणाऱ्याने अगोदर दहादा पूर्ण विचार करायला हवा. वृत्तपत्रे–नियतकालिकांमध्ये लिहिणाऱ्या सरसकट सगळयाना समीक्षक/पत्रकार म्हटले जाते हे चुकीचे आहे. श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी, श्री. माधव मनोहर अशी तुरळक मडळीच प्रत्यक्षात त्या स्थानावर योग्य ठरतील.

२. 'कलेच्या क्षेत्रात मला बरेच समजते व इतराना अक्कल नाही', असे भासविण्याचा माझा प्रयत्न असतो, असे एक विधान श्री. मराठे यानी आपल्या पत्राच्या दुसऱ्या परिच्छेदात केले आहे मात्र त्यानी हा प्रयत्न सिद्ध करण्यासाठी पुरेसा (खर तर काहीही) पुरावा दिलेला नाही. तो दिला असता तर त्याच्या आरोपाला व माझ्या स्पष्टीकरणालाही अधिक बळकटी आली असती. आहे या स्थितीत मी एवढच म्हणू शकतो की, स्वत.च्या मर्यादाची स्पष्ट जाणीव मला असल्याने इतराना बेअक्कल ठरविण्याचा प्रयत्न मी जाणूनबुजून कधीच केलेला नाही. अनवध नाने कधी तसे घडले असेल व कुणी ते निदर्शनास आणन सिद्ध केले तरी मी

दिलगिरी व्यक्त करीन तात्कालिक चुका-दोष-दुर्गुणावर मी कडक टीका करीत असलो तरी तेवढ्यावरून त्या कलाकाराच्या योग्यतेबद्दल सामान्यीकरण (generalized statement) करणे मलाही पटणार नाही. उदाहरणार्थ लक्ष्मीप्यारे जोडीने अलीकडच्या काही चित्रपटाना सामान्य दर्जाचे सगीत पुरविले आहे अस मी जरूर म्हणतो; पण त्यावरून ते शभर टक्के भिकार सगीतकार आहेत अस म्हणायच मी टाळतोच. अशी hasty generalizations मी केली असल्यास श्री. मराठे यानी उदाहरणे द्यावीत, अन्यथा आरोप मागे घ्यावा.

शेरे मारताना मी संयम बाळगावा ही श्री. मराठे यांची अपेक्षा रास्तच म्हणता येईल. तथापि 'एकेका कसबासाठी जन्मजन्म घालवावा लागतो,' हे त्या अपक्षेचे जे कारण मराठे देतात ते फारसे पटण्यासारखे नाही. एक उदाहरण देतो. व्ही. शांताराम यानी उभा जन्म कलासाधनेत घालविला याबद्दल सशय नाही. तथापि एवढ्या कमाईनतरही 'चानी'मध्ये त्यानी ठिक-ठिकाणी साहित्य/कलेचा गळा दाबला आहे. (अस मला वाटत.) आता त्याची ही चूक मी निर्भीडपणे व प्रामाणिकपणे माडणारच. 'व्ही. शांताराम हे पहिल्यापासून आजपर्यंत टुकार कलावत आहेत,' अस मी म्हणालो तर ते सयम सोडल्याच लक्षण जरूर ठरेल; परतु चानीमधाल त्याच्या दोषाची चर्चा करताना त्याच्या एरवाच्या मोठेपणाबद्दलचा आदर मी आपल्या पायात घोटाळू देणार नाही. अशोककुमार हे श्रेष्ठ कलाकार आहेत व अभिनयक्षेत्रात त्यानी केलेल्या अजोड कामगिरीबद्दल समीक्षक व प्रेक्षकानी त्यांचा नेहमीच सन्मान केला आहे. तथापि मराठे म्हणतात त्याप्रमाणे एका कसबासाठी जन्म घालविणाऱ्या या वयोवृद्ध, तपोवृद्ध कलाकाराने, 'एक से बढ़ कर एक' या सिनेमात जे हिडीस चाळे केलेले आहेत त्याचे समर्थन त्याच्या आजवरच्या लौकिकाच्या आधारे करता येणार नाही. किंबहुना त्या लौकिकाला ते लाच्छनच असल्याने त्यावर परखड टीका करण्यात काहीच गैर नाही. प्रथम दर्जाच्या कलाकारावर शेरे मारणे आनदाचे मुळीच नसते; पण प्रथम दर्जाच्या कलाकारावरही मग दर्जेदार कलाकृती देण्याची जबाबदारी येत नाही काय? साराश मी कोणत्याच व्यक्तीवर (मग त्या प्रथम दर्जाच्या असोत वा नसोत) शेरे मारीत नसून त्याच्या particular चुकावर स्पष्ट टीका करीत असतो व तीही (बहुधा) पुराव्यासह/उदाहरणासह करतो. माझ्या हल्ल्याचा रोख सर्वव्यापी, सामान्य नसून विशेष, ठराविक, particular, निवडक चिजांवर असतो. त्या परखड व प्रामाणिक मतप्रदर्शनालाच श्री. मराठे 'सयम सोडणे' असे नाव देत आहेत अस मला वाटत याविषयी ते त्याच वैयक्तिक मत असून मी त्याची नोद घेतली आहे, एवढच मी म्हणू शकतो. तसेच त्याच्या याही मताच्या पुष्टयर्थ (माझा संयम सुटल्याची उदाहरणे वगैरे) पुरावा त्यानी दिलेला नाही, त्यामुळे अधिक भरीव चर्चा करता येत नाही.

३. श्री. मराठे याच्या पत्रातील तिसरा व चौथा परिच्छेद हे non-academic स्वरूपाचे तर आहेतच; पण अपुऱ्या माहिती-वर घाईघाईने काढलेले ते निष्कर्ष आहेत. माझ्या चौफेर ज्ञानाचे नवनवे पैलू दृष्टो-त्पत्तीस येऊ लागले असले तर श्री. मराठे याची काही हरकत आहे काय? माझे अज्ञान कुठे दिसले तर त्यानी जरूर माझा कान पकडायचा प्रयत्न करावा. एरवी वैद्यकशास्त्रावर माझा अधिकार असल्याचे मी 'किनारा'च्या परीक्षणातून सूचित केले तर श्री. मराठे याना वाईट का वाटावे? वैद्यकशास्त्र हे काही गुप्त ज्ञान आहे की काय, की जे माझ्यासारख्याला मिळू नये? जे. वेंगलराव याना शब्दात पकडायला 'वकिली कसब'च लागते हे श्री. मराठे याना कुणी सागितले? ते माझ्यापाशी आहे हे श्री. मराठे याना नव्यानेच कळले यात लिहिण्यासारखे विशेष काय आहे? हे कसब माझ्यापाशी नसणारच अशी त्याची जुनी समजूत झालेली होती की काय? असल्यास कशामुळे? श्री. मराठे व मी एकमेकाना तोंडापुरतेही ओळखत नाही, तेव्हा माझ्या-बद्दल अशा नवनव्या गोष्टी त्याच्या दृष्टो-त्पत्तीस येत गेल्या तर त्यात त्यानी असे घाबरे होण्यासारखे काय आहे? श्री. मराठे याचे अक्षर व शुद्धलेखन त्रासदायक आहे ही गोष्टही त्याच्या या पत्रामुळे मला नव्यानेच कळली आहे. नव्या ओळखीत हे असे चाला-यचेच. ज. वेंगलराव चार वर्षे मुख्य मंत्री आहेत याचा अर्थ ते शब्दात सापडणार नाहीत असा होतो की काय? अशा राज-कारण्याना शब्दात पकडायला वार्ताहर पुरेसे होतात. वकील लागत नाहीत निदान माझा अनुभव तरी तसा आहे कित्येकदा तर ही मडळी कोणताही प्रयत्न न करताच, आपण होऊन शब्दात अडकल्याची उदाहरणे (माझ्याबाबतीत नव्हेत) घडली आहेत. मार्च ७७ च्या लोकसभा-निवडणुकीत श्री शकर-राव चव्हाण, श्री. यशवतराव मोहिते, श्री. रफिक झकेरिया हे महाराष्ट्रीय मत्री जाहीर सभेतही कसे चुकीचे शब्द वापरून फसले हा जगजाहीर इतिहास आहे

आपल्या पत्राच्या चौथ्या परिच्छेदात श्री मराठे यानी व्यक्त केलेले कुतूहल अस्थानी व अवेळी आलेले आहे. पत्रकार / वार्ताहर शब्दात पकडण्याचा हेतू धरून जात नाहीत. आम्हीही गेलो नव्हता. 'वेंगल-रावाना शब्दात पकडायला गेलो होतो ते काम फत्ते झाले' अस मी कुठ म्हटलल आहे काय? माझ्या स्पॉट रिपोर्टिंगचा हेतू हा होता हा जावईशोध मराठ्याना कशाच्या आधारे लावला? वेंगलरावाचा भेट होण व ते बोलताना चुकणे हे दोन्ही फक्त योगायोग होते. फक्त ते महत्त्वाचे वाटल्याने (माणूसच्या दि २ जुलैच्या अकाच्या मुख-पृष्ठावर छापलेल्या) माझ्या पत्रात मी त्याचा उल्लेख केला एवढच. वेंगलराव आम्हाला हवे तसेच बोलले म्हणज काय, हा खुलासा वस्तुत श्री. मराठे याना मागायचे कारण नाही. कारण तो माझा व श्री माज-गावकराचा आपसातला प्रश्न आहे. त्यातून पत्र छापलेले असल्यामुळे त्याना खुलासा मागायचा होताच तर निदान लेखमालतला सबधित भाग प्रसिद्ध होईपर्यंत थाबायला काय हरकत होती? श्री. मराठे याना आस-पासचा सदर्भ माहीत नाही, आमचे हेतू माहीत नाहीत, वेंगल रावाचे व आमचे बोलणे नक्की काय झाले हे माहीत नाही, आम्हाला त्यानी काय बोलायला हवे होते हे माहीत नाही, ते खरोखर शब्दात सापडले की नाही, असल्यास कशा प्रकारे हे माहीत नाही आणि तरीही ते आपले धडाधड सशय घेत सुटले आहेत, एवढेच नव्हे तर ज्याबद्दल कोणतीही तपशील माहीत नाही

असा हा पत्रकारितेचा तथाकथित नवा प्रकार विश्वासार्ह वाटत नसल्याचे जाहीर करून मोकळे झाले आहेत. हा सगळाच प्रकार गुडघ्याला बाशिंग बांधण्याच्या जातीतला आहे, मोठा विनोदी आहे. त्याच्या या आगाऊ ( in advance अशा अर्थाने ) शंकांचा कोणताही यावेगळा खुलासा करण्याचे मला प्रयोजन नाही हवे तर आमची लेखमाला सपल्यानंतर त्यानी याबाबत नव्याने मुद्दे माडावेत सध्या एवढेच सागतो की आम्ही आश्रमदये गेलो ते निर्लेप मनाने परिस्थितीची वस्तुनिष्ठ पहाणी करून लिहिण्यासाठी. आमच्या वा श्री. माजगावकरांच्या मनात कोणत्याच पूर्वकल्पना नव्हत्या व नाहीत. श्री. माजगावकरबघूचे उदार व democratic सपादकीय धोरण ज्याना परिचित आहे त्याना याची वेगळी जाणीव द्यायला नको. माझ्या अनौपचारिक पत्रातल्या चारदोन वाक्यावर श्री. मराठे यानी इतकी आगपाखड करावी याचे सखेद आश्चर्य वाटते. 'श्री. वेंगलरावानी हवापाण्याच्या गप्पा कराव्यात अशी आमची अपेक्षा होती व त्यामुळे ते हवे तेच व तसेच बोलल्याचे मी लिहिले' असा खुलासा मी दिला तर ? पूर्ण अज्ञानात व अधारात असताना आरोप करणाऱ्या मराठ्याना तोही स्वीकारावा लागणार नाही काय ? निदान तर्कदृष्टया ?

४. माझे विनोद, विशेषत: षट्कार वाचकांना आनद देतात ही गोष्ट समाधानकारक आहे. तथापि श्री. मराठ्यानी त्यासाठी दिलेले एकच उदाहरण अगदीच पोकळ आहे. किशोरकुमार दु:खी गाणे म्हणत असताना त्याच्यावर व्यक्तिगत संकट कोसळलेले नसते याची जाणीव सुदैवाने मला आहे. पार्श्वगायनातच काय पण अभिनयातल्या भावनासुद्धा Simulated असणार हे मला शभर टक्के मान्य आहे इग्लिश लिटरेचरमध्ये सध्या मी एम्. ए. पुरे करीत आहे आणि कलेविषयीच्या या theories मध्ये मी श्री. मराठ्याना हार जाईनसे वाटत नाही. मुद्दा आहे तो असा की या भावना simulated असूनसुद्धा शक्य तितक्या नैसर्गिक वाटतात की नाही ? त्या थोडयाफार तरी नैसर्गिक वाटल्या तर कलाकार खरा. त्या कृत्रिम वाटल्या तर कुठे तरी चुकल असं समजायचं. कलेची एक व्याख्याच मुळी 'जीवनाच्या शक्य तितक्या जवळ येऊ पहाणारा जीवनाभास' अशी आहे. किशोरकुमारच्या 'मेहबूबा'मधल्या गाण्यातला दर्द मला बनावटी वाटला तो याच अर्थाने. आणि हा इतका रूढ इतका accepted अर्थ आहे की त्याबद्दल कुणी शंका काढील असं माझ्या स्वप्नातही आलं नाही. याच अर्थाने किशोरच्या 'कोई लौटा दे मेरे बीते हुए दिन' मधला दर्द मला अस्सल वाटलेला आहे. अर्थात इथे मात्र मतभिन्नतेला वाव आहे. आणखी एक उदाहरण देतो. अंकुरमधली शबाना आजमीची ती सस्मरणीय भूमिका श्री. मराठ्यानी पाहिली असेल. गावच्या जमीनदारापासून अंकुरमधल्या नायिकेला–लक्ष्मीला–दिवस जातात आणि उलट्या होतात. उलटी होण्याच्या या प्रसगातला ( Simulated असलेलाच ) अभिनय शबानान इतका जिवंत, इतका अकृत्रिम, इतका रिॲलिस्टिक केलेला आहे की हा अभिनय आहे हे आपण क्षणभर विसरतो. अंकुरमध्ये लक्ष्मी उरी फुटून रडते तो प्रसंग आठवावा. हे दु:ख शबानाच स्वत:चं नाही ही गोष्ट घोकत ते दृश्य पाहिलं तरीसुद्धा ते रडणं खर वाटत. आयुष्याचा एक तुकडाच समोर पाहिल्यासारख वाटतं. अर्थात तीच शबाना 'शक'मध्ये रडताना ऐकावी. ती इतकं कृत्रिम, बळेबळे रडली आहे की तान्हं मूल रडत असल्यासारखं ध्वनिचित्र निर्माण होतं आणि मग तो दर्द बनावट वाटतो, पहावत / ऐकवत नाही. आपला Simulated performance कलावत किती खरा, किती अकृत्रिम, जिवत, non-simulated वाटल्यासारखा, spontaneous भासवू शकतो हे अजमावणं हा त्याच्या मोठेपणाचं मूल्यमापन करायचा एक निकष आहे असं मी मानतो.

५. पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात श्री. मराठे यांनी पुन्हा दुसऱ्या परिच्छेदातलाच सूर लावला आहे. कारणही तेच दिले आहे. गुलजारच्या टॅलंटबद्दल व प्रथमश्रेणीबद्दल मला यत्किंचित शंका नाही. उलट प्रेम आहे; पण त्याचा किनारा मला कलाहीन ( आणि कळाहीन ) वाटला तर त्याच्या इतर कारकीर्दीबद्दल योग्य तो आदर राखूनही ( आणि किनाराच्या परीक्षणात मी तो यथोचित राखला आहे. ) मी किनारा वाईट असल्याचं लिहिणारच. ते थोरे, ती मतं किनाऱ्याबद्दल असतील, संपूर्ण गुलजारबद्दल नव्हेत हेही मी आधी स्पष्ट केलेलंच आहे. यालाच श्री. मराठे ताशेरे झाडणं म्हणत असतील तर माझा नाइलाज आहे ते त्याचं मत आहे, येथील मॅजेस्टिक साहित्यिक गप्पामध्ये, 'शिवराळपणा म्हणजे चागले परीक्षण, असं तुम्हाला वाटत का ?' असा श्री. मराठ्याच्या मताशी जुळणारा प्रश्न मला विचारला गेला होता, त्याला मी 'प्रामाणिक मतप्रदर्शन म्हणजे चागले परीक्षण' असे उत्तर दिले होते, तेच येथेही लागू आहे. 'इट इज नॉट कॅरी कन्व्हिक्शन' हेही पुन्हा श्री. मराठ्याच वैयक्तिक मत झाल. याच्या उलट मत व्यक्त करणारेही पुष्कळ वाचक भेटतात. मला दोघाच्याही मताविषयी तटस्थ आदर आहे एवढच मी म्हणू शकतो. आणि स्पष्ट सागायच तर एका मर्यादेपलीकडे या 'कॅरीइग कन्व्हिक्शन'ची पर्वा मी करीत नाही. मी वाचकासाठी स्वत:च मतप्रदर्शन करतो. वाचकाच्या मताच प्रतिनिधित्व करीत नाही.

६. 'माझ्या लिखाणात तुच्छतेचा सूर असतो' ही शक्यता मात्र मी बव्हशी मान्य करतो. 'वाचकाना त्याचा कटाळा येऊ शकतो,' हेही मान्य करता येईल येथेही मला आत्मसमर्थन करता येईल; पण त्यापेक्षा स्वत मध्ये सुधारणा कराव्या लागल्यास जरूर करण्याचे आश्वासन वाचकांना देणेच अधिक औचित्याचे ठरेल.

७. माझ्या वरील लिखाणात कुठे कडवटपणा आल्याचे कुणाला वाटल्यास मी दिलगीर आहे. तथापि हा कडवटपणा श्री मराठ्याच्या पत्रातील कडवटपणाचीच प्रतिक्रिया आहे. किमान दोन/तीन जागी श्री. मराठे यानी ( बहुधा नकळत ? ) माझी व्यक्तिगत मानखडना करण्याचा प्रयत्न केला असल्याची माझी भावना आहे. वस्तुत: त्यांना तसे करायचे प्रयोजन नाही. त्यानी लेखक म्हणून माझी लायकी शून्य असल्याचेही सिद्ध केल्यास हरकत घेतली नसती; परतु व्यक्ती म्हणून माझा अहकार दुखविण्याचे कारण काय ?

श्री. मराठे यांनी हे लेखन मोठ्या अनिच्छेने व संभ्रमाने केलेले असल्याचे तेच सागतात, तथापि प्रत्यक्ष लिखाणात तर तसा प्रत्यय येत नाही. उलट लेखन तुच्छतापूर्ण

पुष्ठ ३२ वर

# पर्यायी पक्ष : मार्क्सवादी, कम्युनिस्ट की काँग्रेस ?

माहितगार

जनतापक्ष तोंडाने लोकशाहीची भाषा बोलत असून द्विपक्षपद्धती असली पाहिजे असे प्रतिपादित आहे, पण त्याची ही भाषा ढोंगीपणाची आहे जनतापक्षाला काँग्रेस नामशेष करावयाची आहे असे विचार यशवंतराव चव्हाण यानी महाराष्ट्र काँग्रेसच्या सर्वसाधारण सभेत (१७ जुलै) बोलून दाखविले त्याच दिवशी जयप्रकाश नारायण यांनी कलकत्त्यात पर्यायी पक्षाविषयीची आपली मते माडली. काँग्रेस हा पर्यायी पक्ष बनावा. मात्र त्या पक्षाने इंदिरा गाधी यांचे नेतृत्व टाकून दिले पाहिजे. इंदिरा गाधी नसलेल्या काँग्रेस पक्षाचे नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांनी करावे असेही जयप्रकाश म्हणाले. पर्यायी पक्षासबधी जॉर्ज फर्नांडिस यानीही आपली मते माडली आहेत. मार्क्स. कम्युनिस्ट पक्षाने पर्यायी पक्षाची जागा घ्यावी असे फर्नांडिस याना वाटते. विरोधी पक्षाच्या नेत्याना मारण्याचा कट काँग्रेससरकारने आखला होता असे गृहमत्री चरणसिंग म्हणाले देशात काँग्रेसविरोधी लाट आहे. त्यातच चरणसिंग याच्या विधानाने काँग्रेसविषयी लोकाना आणखीच घृणा वाटेल व तिची घट होण्यास मदत होणार.आहे. हे लक्षात घेऊनच यशवतराव चव्हाण यानी जनतापक्ष लोकांना भडकावीत आहे, काँग्रेसला बदनाम करीत आहे असे सागितले. हे जसे खरे त्याचप्रमाणे जॉर्ज फर्नांडिस याच्या मतामुळेही यशवतरावाना राग आला आहे मार्क्स. कम्युनिस्ट पक्षाने पर्यायी पक्षाची जागा घ्यावी किंवा तो पर्यायी होईल असे म्हणणे म्हणजेच काँग्रेस नाहीशी झाली आहे असे मानणे किंवा ती नामशेष करावी असे सागण्यासारखे आहे. फर्नांडिस आज जनतापक्षाचे आहेत. त्यामुळे ते स्वत.च्या पक्षाला सत्ताधारी पक्षाचे स्थान राहावे याच मताचे आज असणे स्वाभाविक ठरते आणि मार्क्स. कम्युनिस्ट पर्यायी पक्ष राहावा ही त्याची इच्छा ! द्विपक्षीय लोकशाही मान्य केल्यास तिसऱ्या पक्षाला स्थानच राहत नाही. म्हणजे काँग्रेसचे अस्तित्व काही काळ राहिले तरी ती नगण्यच होईल. फर्नांडिस याच्या विचाराचे हे सूत्र आहे त्याचाच राग यशवतरावाना आहे तो त्यानी महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात व्यक्त केला.

पर्यायी पक्षासबधी खुलेपणाने साधकबाधक चर्चा होणे आवश्यक आहे. जयप्रकाश व फर्नांडिस याच्या मतामुळे दोन प्रवाह पुढे आले आहेत आणि यासबंधीच्या चर्चेची प्रक्रिया सुरू झाली आहे असे म्हणावयास हरकत नाही.

फर्नांडिस म्हणतात तो पर्याय झाल्यास राजकारणाची, अर्थकारणाची दिशा काय राहील व जयप्रकाशांना अभिप्रेत असलेल्या पर्यायामुळे काय परिणाम होतील हे तपासण्याची वेळ आली आहे. जनतापक्षाचे आजचे स्वरूप काय आहे ? त्यामध्ये मार्क्सवाद, गाधीवाद याचे व्यावहारिक मिश्रण करून समाजवाद आणू पाहणारे समाजवादी, निर्भेळ गांधीवाद जोपासणारे संघटना काँग्रेस, गाधीवादाला जवळ करणारे भालोद व मार्क्सवाद, गाधीवाद याची ॲलर्जी असलेले जनसंघ एकत्र येऊन जनतापक्ष झाला आहे. काँग्रेसमधील हुकूमशाही प्रवृत्तीनी काबीज केलेली सत्ता मिळविणे व लोकशाहीतील व्यक्तिविचार व मतस्वातत्र्य परत करण्यासाठी जनतापक्ष निर्माण झाला. परिस्थितीच्या अपरिहार्यतेतून जनतापक्ष जन्मला व त्याच्याकडे सत्ता आली. आर्थिक व सामाजिक परिवर्तनासाठी निश्चित स्वरूपाचा कार्यक्रम घेऊन जनतापक्ष जन्मलेला नाही. त्यामुळे या पक्षाचे सरकार समाजवादी वा पुरोगामी आहे असे मानण्याचे कारण नाही. जनतापक्षाचे नेते नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी, मधू लिमये व जॉर्ज फर्नांडिस हे जाहीरपणे जनतासरकार समाजवादी नाही हे सागत असतात भारतासारख्या देशात समाजवादी तत्त्वज्ञान हाच एक मार्ग आहे असे त्याना वाटत असल्यामुळे सध्याचे सरकार समाजवादी नाही हे ते सागत असतात. त्या पक्षातील इतर घटकाच्या नेत्याच्या तोडून हे सरकार समाजवादी नाही अशी भाषा येत नाही जनतापक्षाच्या रूपाने एका पक्षाची तीस वर्षांची मक्तेदारी सपुष्टात आणता येते हा आत्मविश्वास जनतेत निर्माण झाला आहे, ही जनतापक्षाची कामगिरी असून आतापर्यंत शक्य न वाटणारी घटना घडून सत्ता हातात आली. भिन्न भिन्न विचाराबर श्रद्धा असणारे हे पक्ष सत्ता जाऊ नये या विचाराने एकत्र राहतील, परतु त्यामुळे हितसबधितांविरुद्ध व सामान्य माणसाच्या हिताचे राजकारण जनतापक्ष करील असे मानण्याचे कारण नाही. सत्ता जाऊ नये यासाठी एकत्र राहिलेली ही भिन्न विचाराची मडळी सामान्याच्या हिताकरिता जुजबी कार्यक्रम हाती घेतील. निवडणुकीत सत्ता हातात ठेवण्यासाठी उपयोगी होईल याकरिता जेवढे करणे शक्य असेल तेवढे धोरण जनतापक्ष अमलात आणील.

### काँग्रेसपक्षही कुंभमेळाच

काँग्रेसपक्षाचे स्वरूपही आजच्या जनतापक्षासारखेच आहे. कुभमेळ्याला अनेक विचाराची माणसे येतात. काँग्रेसचाही कुभमेळा झाला आहे. समाजवाद मानणारी, गाधीवाद जोपासणारी मडळी काँग्रेसमध्ये आहेत, त्याचप्रमाणे जैसे थे वादी मंडळीही काँग्रेसमध्ये आहेत. रूढी-परपरा जोपासणारी माणसेही आहेत. थोडक्यात काँग्रेस व जनतापक्षाच्या आजच्या स्वरूपात फार मोठा फरक आहे अशातला भाग नाही. त्यामुळे केंद्रात जनतापक्ष व पर्यायी पक्ष म्हणून तसाच चेहरामोहरा असलेला काँग्रेसपक्ष यामुळे परिवर्तनाची दिशा व गती यात फरक राहणार नाही. जयप्रकाश नारायण याच्या मताप्रमाणे

काँग्रेसपक्ष पर्यायी पक्ष म्हणून राहिला तर उजव्या विचारांचे प्राबल्य असलेला हा पक्ष सत्तेवर तर कधी तो पक्ष सत्तेवर राहील; परंतु जॉर्ज फर्नांडिस यांच्या मतानुसार मार्क्स कम्युनिस्ट पर्यायी उभा राहिला तर परिस्थितीमध्ये मोठा फरक घडून येईल. ज्याना मध्यम मार्ग हवा आहे, गांधीवादावर ज्यांच्या निष्ठा आहेत अशाना जनतापक्षात स्थान राहील आणि मार्क्सवादी विचार हे ज्यांच्या विचारसरणीचे अधिष्ठान राहिले अशाना मार्क्स. कम्युनिस्ट पक्ष जवळचा होईल; परंतु हे केव्हा होईल ? आजची काँग्रेस पूर्णपणे नामशेष होईल तेव्हाच या दिशेने प्रक्रिया सुरू होईल. काँग्रेस नामशेष झाल्यावर काँग्रेसमधील काही लोकाना जनतापक्षात जावे लागेल. काँग्रेस नामशेष झाल्याशिवाय हे घडणार नसल्यामुळेच महाराष्ट्र काँग्रेसमध्ये भाषण करताना यशवंतराव चव्हाण यानी जनतापक्षाला काँग्रेस नामशेष करावयाची आहे यावर भर दिला. कार्यक्रमाच्या प्रश्नावर येत्या पाच वर्षांत जरी नाही तरी त्यानंतरच्या अल्पकाळातच जनतापक्षाचे विघटन होण्याची शक्यता आहे. असे विघटन झाले तर जनतापक्षातील समाजवाद्याना मार्क्स. कम्युनिस्ट पक्ष जवळ करावा लागेल. असलेल्या पक्षातून फुटल्यावर नवा पक्ष काढावा असे इतक्या वर्षांच्या अनुभवानतर कोणी म्हणेल हीही शक्यता राहिलेली नाही समजा, उद्या काँग्रेस नामशेष झाली तर जनता व मार्क्स कम्युनिस्ट हेच दोन प्रभावी पक्ष राहतील. त्यामुळे विचाराच्या दृष्टीने जवळचा असलेला पक्ष म्हणून समाजवादावर निष्ठा असलेले मार्क्स कम्युनिस्ट पक्षात जातील. मार्क्स. कम्युनिस्ट पक्षाची अवस्था उजव्या कम्युनिस्टासारखी राहिलेली नाही. रशियाच्या तालावर नाचण्याचे उजवा कम्युनिस्ट पक्ष सोडून देत नाही. युरोपातील कम्युनिस्ट पक्षात युरो–कम्युनिझमचे वारे पसरले आहे. भारतातील कम्युनिस्टावर त्या वाऱ्याचे कसलेही परिणाम होत नाहीत. त्यामुळे रशियाच्या तंत्राने या देशात राजकारण करण्याचे कम्युनिस्टाचे धोरण कायम आहे. मार्क्स कम्युनिस्ट पक्षाला आंतरराष्ट्रीय लागेबांधे राहिलेले नाहीत. कम्युनिस्ट पक्षात फूट पडल्यानंतर डावा कम्युनिस्ट पक्ष चीनवादी मानला असला तरी चिनी कम्युनिस्ट पक्षाने मार्क्स. कम्युनिस्टाना जवळ केलेले नव्हते, याचे पुरावे अनेक आहेत. त्यामुळे भारतापुरतेच मर्यादित स्थान मार्क्स कम्युनिस्ट पक्षाला राहिले आहे शिवाय सशस्त्र उठावाची कल्पनाही मार्क्स. कम्युनिस्ट पक्षाला चुकीची असल्याचे हळूहळू पटू लागले आहे. याचा अर्थ तो पक्ष गांधीवाद्याइतका शांतिप्रिय झाला आहे असे नव्हे ! भारतीय घटनेच्या चौकटीत राहून काम करण्याचे त्यानी मान्य केले आहे. या चौकटीत राहूनच तो कारभारही करीत आहे. मार्क्स कम्युनिस्ट पक्षाचे तंत्र व काही प्रमाणात धोरण बदलले आहे. शिवाय समाजवाद मान्य असणारी मंडळी या पक्षात मोठ्या संख्येने गेली की मार्क्स. कम्युनिस्टाना आपल्या धोरणांना आणखी मुरड घालावी लागेल हा सर्व विचार करता मार्क्स कम्युनिस्ट पक्षाचा पर्याय डाव्या विचाराच्या राजकारणाच्या दृष्टीने अधिक व्यवहार्य ठरेल.

## ध्रुवीकरणाची प्रक्रिया

पर्यायी पक्षाबाबत जयप्रकाश नारायण व जॉर्ज फर्नांडिस यांची मते म्हणून त्याकडे न पाहता दोन विचार म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. या दोन विचाराप्रमाणे आज लगेच राजकारण घडेल असेही मानण्याचे कारण नाही. ही प्रक्रिया आहे. ती घडून येण्यास कालावधी लागेल. मार्क्स. कम्युनिस्ट पक्षाचा पर्याय मूळ धरू लागला तर किंवा त्या पर्यायाने मूळ धरावे यासाठी राजकीय ध्रुवीकरण घडण्याची आवश्यकता आहे. ध्रुवीकरण होऊ लागले तर एकाच विचाराच्या सूत्रात बांधलेला पक्ष तयार होऊ शकेल. अन्यथा परस्पर विरोधी विचाराच्या व्यक्तींचा समूह बनून आजच्यासारखे ' कुंभमेळी पक्ष ' राहतील. काँग्रेसचे पूर्णांशाने विघटन होऊ लागले तर ध्रुवीकरणाची प्रक्रिया जलद होईल. अशा वेळी आज डाळयासमोर असलेल्या नेत्यांचेच नेतृत्व राहील हे मात्र संभवनीय वाटत नाही त्यामुळेच काँग्रेसजनाना विशेषत तिच्या नेत्याना ध्रुवीकरण मानवण्यासारखे नाही.

जनतापक्षाला काँग्रेस नामशेष करावयाची आहे असे यशवंतराव म्हणत असले तरी पर्यायी पक्षासंबंधी जयप्रकाश नारायण यांनी जे विचार मांडले त्याबाबत यशवंतरावानी कसलीच प्रतिक्रिया ( लेख लिहीपर्यंत ) व्यक्त केलेली नाही जे. पी.च्या निवेदनाला आठ दिवस होत आले तरी यशवंतराव त्यावर गप्पच आहेत मात्र सरचिटणीस व्ही. बी. राजू यानी अत्यंत कडक शब्दात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे जयप्रकाशानी काँग्रेसपक्षात लुडबूड करण्याचे कारण नाही आम्ही आमचे पाहून घेऊ अशाच आशयाची राजूंची प्रतिक्रिया आहे. राजू सरचिटणीस आहेत म्हणून त्यानी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे यशवंतरावाना ती व्यक्त करण्याची आवश्यकता नाही हा युक्तिवाद केला जाण्याची शक्यता आहे; परंतु जयप्रकाश यानी पर्यायी पक्षाचे नेतृत्व यशवंतराव चव्हाण यानी करावे असे स्पष्ट म्हटले आहे त्यामुळे यशवंतरावांच्या प्रतिक्रियेची अपेक्षा आहे. जयप्रकाश यांचे विचार मान्य होण्यासारखे आहेत म्हणून यशवंतराव त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करत नसतील, हेही शक्य आहे.

राजकारणात आज अशक्य, जरतरच्या वाटणाऱ्या गोष्टी उद्या घडत असतात हे लक्षात घेऊनच पर्यायी पक्षाच्या विचाराकडे पाहिले पाहिजे. □


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# श्रीलंका

## हुकुमशाहीविरुद्ध कौल

वा. दा. रानडे

श्रीलंकेमधील निवडणुकीत भारताची पुनरावृत्ती झाली. भारतातील कॉंग्रेस-पेक्षाही अधिक मोठ्या प्रमाणात तेथे श्रीमती सिरिमाओ भाडारनायके याच्या पक्षाचा पराभव झाला. पार्लमेंटच्या एकूण १६८ जागापैकी १६६ जागाच्या निकालात या पक्षाला अवघ्या आठ जागा मिळाल्या. एका द्विसदस्य मतदारसघात पुन्हा निवडणूक घेतली जाणार आहे. श्री. गुणवर्धने याच्या नेतृत्वाखालील युनायटेड नॅशनल पार्टीने १३९ जागा जिंकून डाव्यांच्या सयुक्त आघाडीने १९७० च्या निवडणुकात मिळविलेल्या विजयाला माग सारले. या आघाडीला त्या वेळी ११५ जागा मिळाल्या होत्या. या वेळच्या निकालाचा आणखी एक महत्वाचा विशेष म्हणजे डाव्या आघाडीला एकही जागा मिळाली नाही. आतापर्यंतच्या प्रत्येक निवडणुकीत विजयी झालेले ट्रॉट्स्कीवादी लका समसमाजपक्षाचे नेते परेरा याना या वेळी प्रथमच पराभव पत्करावा लागला.

सिरिमाओच्या पक्षाबरोबरच डाव्या पक्षाची सपूर्ण वाताहत यात भारतापेक्षा श्रीलकेतील निवडणुकाचे निराळेपण आहे. भारतात पश्चिम बगालमध्ये मार्क्सवाद्यानी मिळविलेल्या यशाचा अपवाद सोडला तर दोन्ही कम्युनिस्ट पक्षाना स्वतःच्या बळावर फार थोड्या जागा जिंकल्या. उजव्या कम्युनिस्टानी काग्रेसशी आणि मार्क्सवाद्याना जनतापक्षाशी समझोता केला होता. त्यामुळे त्याना काही जागा मिळाल्या आणि श्रीलकेतील पक्षाप्रमाणे त्याचा पूर्ण परवड झाली नाही.

श्रीलकेतील बदलत्या पक्षबलाची अधिक यथार्थ कल्पना येण्याच्या दृष्टीने गेल्या चार निवडणुकाचा एकत्र तुलनात्मक विचार करायला हवा.

श्रीलंकेतील बदलते पक्षबळ

| पक्ष | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | १९६० | १९६५ | १९७० | १९७७ |
| श्रीलंका फ्रीडम पार्टी | ७५ | ४१ | ९० | ८ |
| लंका समसमाज पक्ष | १२ | १० | १९ | ० |
| कम्युनिस्ट | ० | ४ | ६ | ० |
| युनायटेड नॅशनल पार्टी | ३० | ६६ | १७ | १३९ |
| तामिळ कॉंग्रेस | २ | ३ | ३ | – |
| फेडरल पार्टी | – | १४ | १३ | – |
| तामिळ युनायटेड | – | – | – | – |
| लिबरेशन फ्रंट | – | – | – | १७ |
| सिलोन वर्कर्स कॉंग्रेस | – | – | – | १ |
| अपक्ष | – | ६ | २ | १ |

या आकडेवारीवरून सिरिमाओची श्रीलका फ्रीडम पार्टी आणि डाव्या पक्षाचे अपयश विशेष तीव्रतेने जाणवते श्रीलका फ्रीडम पार्टीने सर्वांत जास्त ९० जागा १९७० मध्ये मिळविल्या होत्या; पण या वेळी ९० वरून ८ पर्यंत त्या पक्षाची घसरगुंडी झाली. १९६५ मध्येही या पक्षाचा पराभव झाला होता; पण एवढे मोठे अपयश मिळाले नव्हते. याउलट युनायटेड नॅशनल पार्टीने १३९ जागा जिंकून विजयाचा नवा उच्चाक केला. या पक्षाला १९७० मध्ये अवघ्या १७ जागा मिळाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा विजय विशेष उठून दिसतो. १९६५ मध्ये या पक्षाला सर्वांत अधिक जागा मिळाल्या तरी निर्णायक बहुमत मिळाले नव्हते आणि इतर पक्षाचे सहकार्य घेऊन त्याने सयुक्त मत्रिमडळ स्थापन केले होते. या वेळी तशी आवश्यकता राहिलेली नाही.

श्रीलकेमधील निवडणुकाचा अर्थ काय लावायचा? श्रीमती भाडारनायके याच्या पक्षाचे तसेच श्रीलका समसमाजपक्ष आणि कम्युनिस्ट या दोन डाव्या पक्षाची धोरणे व कार्यक्रम जनतेने फेटाळला असे म्हणता येईल का? या पक्षाचा समाजवादी कार्यक्रम जनतेला मान्य नव्हता असे नाही; पण लोकशाही व मूलभूत हक्क पायदळी तुडवून ज्या हुकूमशाही पद्धतीने या पक्षानी हा कार्यक्रम अमलात आणण्याचा प्रयत्न केला त्यामुळे जनता त्याच्या विरुद्ध गेली. भारतात एकोणीस महिनेच आणीबाणी होती. श्रीलकेमध्ये श्रीमती भाडारनायके याच्या सात वर्षांच्या कारकीर्दीपैकी सहा वर्षे आणीबाणी होती. भारताप्रमाणेच श्रीलकेमधील मतदान हा मुख्यत. लोकशाहीच्या गळचेपीविरुद्धचा कौल होय.

कारभारातील भ्रष्टाचार आणि आर्थिक प्रश्न सोडविण्यात अपयश ही श्रीमती भाडारनायके याच्या पक्षाच्या अपयशाची महत्त्वाची कारणे आहेत. सिरिमाओनी आपल्या मुला-मुलीना सरकारमध्ये मोठ्या जागा दिल्या. मुलगा अनुरा यास युवकप्रश्नविषयक सल्लागार नेमले तर मुलगी सुनेत्रास पतप्रधान व सरक्षणमत्र्यांचा सलग्न अधिकारी नेमले. चलनवाढ आणि बेकारी हे दोन प्रश्न सरकार सोडवू शकले नाही सुशिक्षिताच्या बेकारीचा प्रश्न तर फारच तीव्र झालेला होता. श्रीलकेमध्ये अठरा वर्षांवरील तरुणाना मताधिकार आहे. या तरुणवर्गाने १९७० मध्ये मोठ्या अपेक्षेने सिरिमाओचा पक्ष आणि डाव्या पक्षाच्या आघाडीला निवडून आणले होते; पण त्यानी निराशा केल्याने हा वर्ग उलटला व त्याने या वेळी युनायटेड नॅशनल पार्टीस मते दिली. चलनवाढीला आळा घालणे आणि बेकारीनिवारण या कार्यक्रमाना युनायटेड नॅशनल पार्टीने अग्रक्रम दिला आहे त्याची कितपत परिणामकारक अंमलबजावणी होते यावर त्या सरकारचे यश अवलबून राहील. नाही तर मतदार पुढच्या निवडणुकीत पुन: त्याच्या विरुद्ध जाईल.

युनायटेड नॅशनल पार्टीचे नेतृत्व डडले सेनानायके याच्यानतर जयवर्धने याच्याकडे आले. प्रतिगामी उजवा पक्षही त्या पक्षाची प्रतिमा बदलून त्याला नवे स्वरूप देण्या व

प्रयत्न त्यांनी केला आहे लोकशाही समाजवादाची भूमिका पक्षाने स्वीकारली आहे. भारतातल्या जनतापक्षाप्रमाणे विरोधी पक्ष एकत्र येऊन हा विरोधी पक्ष बनलेला नाही. श्रीलकेच्या राजकारणात तो दीर्घकाळ कार्य करीत आहे व १९६५ च्या निवडणुकात तर तो सत्तेवरही आला होता. भारताप्रमाणे श्रीलकेत सत्तेची मक्तेदारी एका पक्षाकडे कधीच नव्हता. तेथील मतदार भारतीय मतदारापेक्षाही जागरूक आहे. स्वातंत्र्यानतरच्या आठ निवडणुकात तेथे एकदाही ८० टक्क्यापेक्षा कमी मतदान झाले नाही. १९६५ मध्ये ८२ टक्के व १९७० मध्ये ८५ टक्के मतदान झाले होते. या वेळच्या मतदानाचे आकडे अजून उपलब्ध झालेले नाहीत; पण १९७० पेक्षा ते जास्त झाल्याच्या बातम्या आहेत. इग्लड-अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशातसुद्धा एवढ्या मोठ्या संख्येने मतदान होत नाही.

तामिळी भाषिकाच्या तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रटने निवडणुकीत १७ जागा जिंकल्या तामिळ कॉंग्रेस आणि फेडरल पार्टी असे तामिळ भाषिकांचे पक्ष पूर्वी होते. त्यानी आता एकच आघाडी स्थापन केली आहे. तामिळ भागातल्या बहुतेक सर्व जागा या पक्षाने जिंकल्या. उत्तर भागात तामिळ भाषिकाचे स्वतंत्र राज्य स्थापण्याची त्याची मागणी आहे. युनायटेड नॅशनल पार्टीचे नेते या पक्षाशी समझोता करू शकले नाहीत तर फुटीर प्रवृत्ती बळावून श्रीलंकेच्या एकसंधतेलाच धोका आहे त्याच्या न्याय्य मागण्या मान्य करून सत्तारूढ पक्षाचे नेते हा प्रश्न समाधानकारकपणे सोडविण्यात यश मिळवितील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. □

---

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## □ जुने सरकार आणि इंदिराजी

लोकशाहीमध्ये सर्वसाधारण परिस्थितीमध्ये सत्तान्तर झाले तर जुने सरकार हा फारसा चर्चेचा विषय होऊ शकत नाही; परंतु भारतामध्ये सत्तान्तर झाले–ते केवळ अभूतपूर्व पद्धतीने. जुने सरकार पूर्ण बदनाम झाले,–हाती असलेल्या मताचा मजबूत आधार घेऊन जनतेने पहिले शासन फेकून दिले. जनतेचा पूर्ण विश्वास संपादन करून घेऊन नवीन शासन सत्तेवर आले, पण जुन्या सरकारबद्दलचा कडवटपणा जराही कमी झालेला नाही. जुन्या सरकारच्या प्रत्येक पापाचे पूर्ण माप सबंधितांच्या पदरामध्ये घालण्याच्या तयारीनेच नवीन गृहमंत्र्यानी कबर कसली आहे, पण गेल्या सप्ताहामध्ये त्यानी लोकसभेमध्ये असा आरोप केला की–विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्याना ठार मारण्याची कल्पना त्यावेळच्या सरकारच्या मनामध्ये होती. आपल्या विधानाच्या समर्थनार्थ त्यानी माजी ॲटर्नि जनरल निरेन डे यानी न्यायालयामध्ये केलेल्या विधानाचा आधार घेतला आणि जगण्याचा हक्कही नाकारला गेला तो नेमका कोणत्या उद्देशाने असा प्रतिप्रश्नही त्यानी केला. गृहमंत्र्यांच्या या विधानानतर जी प्रचंड वावटळ उडाली त्याचे पडसाद गेल्या सप्ताहामधील सर्व साप्ताहिकामधून पाहावयास मिळाले.

लोकसभेमध्ये कॉंग्रेसपक्षाचे नेते श्री. यशवंतराव चव्हाण यानी तर गृहमंत्र्यांच्या विधानाला जोरदार हरकत घेतलीच, पण इतर काही नेत्यानीही या विधानाला जोरदार आक्षेप घेतले होते चव्हाण म्हणाले– विरोधी पक्षांना ठार मारण्यात येणार असल्याचा जो आरोप गृहमंत्र्यानी जुन्या सरकारवर केला आहे त्याबाबत त्यांनी एक तर सबळ पुरावा सादर करावा अथवा आपले विधान मागे घ्यावे. नामदार चरणसिंग यानी विधान मागे घेण्याचे नाकारल्यावर कॉंग्रेससदस्यांनी सभात्याग केला. गृहामध्ये हे प्रकरण पुढे थोडेफार धुमसत राहिले असते, परतु प्रकरण खरे चिघळले ते इंदिराबाईनी गृहाबाहेर प्रसिद्ध केलेल्या आक्रमक पत्रकानतर. या पत्रकाबद्दल गृहामध्ये पडसाद उमटणे अपरिहार्य होते आणि त्याप्रमाणे ते उमटलेही. हे पत्रकप्रकरण हक्कभंग करणारे आहे काय ? याचा विचार करण्यासाठी हे सारेच प्रकरण लोकसभेने समितीकडे सोपविले आहे.

इंदिराजींच्या त्या वेळच्या शासनाबद्दल गृहमत्री चरणसिंग यांनी जे विधान केले त्याबाबत इडियन एक्स्प्रेसच्या संपादकांनी एक टिपण लिहिले आहे. त्यामध्ये ते म्हणतात–विरोधी पक्ष आपल्याला मारण्याचा घाट घालीत आहे. अशी ओरड निवडणूकसभामध्ये बाईनी अनेक वेळा केली. आणि त्याच्या या विधानाविरुद्ध त्यावेळच्या विरोधी पक्षानी जो निषेध नोदविला त्याची त्यानी जराही दखल घेतली नाही. आता विरोधी पक्ष सत्तेवर आल्यावर–आणिबाणीच्या काळधा कालखंडामधील जी पापे उजेडात आली आहेत, त्याचे गभीर स्वरूप पाहता गृहमंत्र्यानी जे विधान केले ते अगदी अवाच्या सवा आहे असे म्हणता येणार नाही. गृहमत्र्यानी माजी महामत्र्यावर प्रखर हल्ला चढविल्यावर त्या गप्प बसतील असे वाटलेच नव्हते शिवाय गृहमंत्र्यावर प्रतिहल्ला चढविताना, त्यांनी केलेल्या इतर आरोपाना उत्तर देण्याची संधीही त्यानी साधून घेतली. इतकेच नव्हे तर विरोधी पक्षाला नेस्तनाबूत करण्याची ही पद्धत–हा विचार जे बोलून दाखवितात त्यांच्याच मनामध्ये असेल असेही त्यानी आपल्या निवेदनामध्ये प्रसिद्ध केले आहे आपल्या टिपणामध्ये एक्सप्रेसचे सपादक पुढे म्हणतात–गृहमत्र्यानी केलेल्या विधानाबाबत केवळ खुलासा करून इदिराजी थांबल्या असत्या तर ते समजण्यासारखे होते. पण आणीबाणी मधील अत्याचाराबाबत त्यानी निवडणूकप्रचार सभामध्ये जी उडती दिलगिरी व्यक्त केली त्याचा दाखला देऊन त्यानी–आणीबाणी घोषित करण्याचा जो मूळ गुन्हा केला

पृष्ठ २९ वर

# रा. स्व. संघातील बदल – सत्य की संभ्रम

किशोर बेडकिहाळ, सातारा

सध्या महाराष्ट्रात रा. स्व. संघाच्या भूमिकेत (की पवित्र्यात ?) बदल होत आहे काय ? ह्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर उलटसुलट चर्चा चालू आहे. या निमित्ताने संघाच्या वैचारिक भूमिकेबाबत व त्यातील बदलाच्या संदर्भात या लेखात चर्चा करावयाची आहे एक अडचणीची बाब सर्वांत प्रथमच नमूद करून टाकली पाहिजे व ती ही की, संघाची वैचारिक भूमिका स्पष्ट करणारी अधिकृत पुस्तिका अथवा वाङमय नसल्याने म्हणा अथवा प्रस्तुत लेखकाच्या ते वाचनात न आल्याने तीन्ही सरसंघचालकानी वेळोवेळी केलेली भाषणे, लेखन व वार्ताहराना दिलेल्या मुलाखती संघाची भूमिका म्हणून गृहीत धरली आहे कदाचित यावर सरसंघचालकाचे मत हे संघाचे अधिकृत मत नव्हे असा आक्षेप घेतला जाण्याची शक्यता आहे.(पूर्वी गोळवलकराच्या चातुर्वर्ण्यावरील मुलाखतीसंबंधी एक संघस्वयंसेवक श्री. प्रकाश गाडगीळ यानी श्री. वसंत पळशीकर याच्याशी समाज प्रबोधनपत्रिकेतून (१९७०) वाद करताना असा आक्षेप घेतला होता.) पण अधिकृत असे वाङमय नसल्याने व सरसंघचालकाची मते संघाची अधिकृत मते नव्हेत असा खुलासा (किमान वादग्रस्त प्रश्नावर तरी) रा. स्व. संघाच्या कार्यकारिणीने न केल्याने सरसंघचालकाची भाषणे, मुलाखती व इतर लेखन यातून ध्वनित होणारी भूमिका संघाची म्हणून गृहीत धरावी लागते.

स्थूल मानाने संघाची भूमिका उद्दिष्टाच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे मांडता येईल. १. हिंदुराष्ट्र, हिंदुराष्ट्रवाद, हिंदुधर्म व संस्कृती याचे संवर्धन व जोपासना २. एकरस हिंदुसमाजनिर्मितीसाठी हिंदुसंघटन. ३ या साध्यांसाठी बलोपासना व चारित्र्यसंपन्नता व संस्कार करणे सकृद्दर्शनी ही उद्दिष्टे सांस्कृतिक स्वरूपाची वाटतात; पण याबरोबरच त्या अनुषंगाने येणाऱ्या संघाच्या राजकीय मताची चिकित्साही या छोटयाशा लेखात करावयाची आहे. वरील उद्दिष्टातील पहिले व दुसरे उद्दिष्ट यात संघजनाना (निदान गोळवलकराच्या कारकीर्दीपर्यंत तरी) विरोधाभास वाटत नाही. जातीधर्मनिरपेक्ष लोकशाहीची भूमिका घेणाऱ्याना मात्र यात नक्कीच विसंगती दिसते. या विसंगतीचे स्वरूप असे– हिंदुसमाजात जातिव्यवस्था, अस्पृश्यता, चातुर्वर्ण्यासारखी रचना अस्तित्वात असताना व धर्माचा त्याना पाठिंबा असताना हिंदुधर्म व संस्कृती याचे जतन करून एकरस हिंदुसमाजनिर्मिती (व बलवान हिंदु (?) राष्ट्र) शक्य आहे का ? यासाठी हिंदुधर्म व हिंदुसंस्कृती याचा वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पायावर पुर्नविचार केल्याशिवाय उत्तर मिळणे कठीण आहे. तरीही संघाच्या या अडथळ्याबाबतची (अस्पृश्यता वगैरे) भूमिका समजावून घेणे महत्त्वाचे ठरते.

## १ : संघ व अस्पृश्यता

गोळवलकराना १९५० साली (संघावर बंदी उठल्यावर) एका वार्ताहराने अस्पृश्यतेच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्याला गोळवलकरांनी आम्ही ती मानीत नाही असे उत्तर दिले (गोळवलकराच्या मुलाखती व भाषणे हे १९५० सालचे पुस्तक पाहावे) १९७१ साली 'चातुवर्ण्यव्यवस्था' प्रकरणीही अस्पृश्यता गेली पाहिजे व वर्णव्यवस्था राहिली पाहिजे अशीही मुलाखत त्यांनी दिली होती. यावरून संघ अस्पृश्यता पाळीत अथवा मानीत नाही असे वाटते; पण एवढयाने त्यांची याबाबतची भूमिका स्पष्ट होत नाही. (सुदैवाची गोष्ट ही की, देवरसानी वर्णव्यवस्थाही गैरलागू ठरविली आहे.) या देशात अस्पृश्यताविरोधी झालेल्या सर्व चळवळीपासून संघ संघटनात्मक पातळीवर दूर राहिला आहे (हीच गोष्ट चळवळीबाबतही सत्य आहे) एकरस हिंदुसमाजनिर्मितीचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवणाऱ्यानी याबाबत प्रत्यक्ष चळवळीत जोमाने भाग घ्यावयास हवा होता. (व अजूनही घ्यायला हवा.) याउलट गोळवलकरानी शंकराचार्यांनी अस्पृश्याना शुद्ध करून घेणारा एखादा विधी शोधावा व अस्पृश्यता नष्ट करावी अशी सूचना केली होती. (म्हणजे स्पृश्यानी लादलेल्या अस्पृश्यतेचे प्रायश्चित्त अस्पृश्यानीच घ्यायचे) या सर्वांतून अस्पृश्यता खरोखरीच (लवकर) नष्ट व्हावी असे संघाला वाटते असे मानायचे काय ? अलीकडे संघस्थानावर स्पृश्यास्पृश्य भेद पाळला जात नाही असे सांगितले जाते. तसे असेल तर ते योग्यच होय; पण प्रश्न इतकाच राहतो की, यामुळे संघस्थानाबाहेरील क्षेत्रात असणारी अस्पृश्यता नष्ट करण्यास संघ बांधिलकी मानतो की नाही ? की संघात अस्पृश्यता नाही म्हणून अस्पृश्यासह सर्वांनी संघात यावे. (संघ त्याचेकडे जाणार नाही) असे सांगावयाचे आहे ? इतके होऊनही पुन्हा एक प्रश्न उरतोच; तो म्हणजे प्रत्यक्ष कसलाही संघर्ष न करता केवळ तत्त्वत. अस्पृश्यता जावी अशी भूमिका घेऊन अस्पृश्यतेचा प्रश्न सुटेल असे संघ मानतो काय ? तसा तो न सुटल्यास एकरस हिंदुसमाजनिर्मिती शक्य आहे काय ? असे आहे (शक्य आहे) असे मानल्यास संघाची अस्पृश्यतानिवारणाची कळकळ (?) ढोंग का मानू नये ? गोळवलकराची याबाबतची भूमिका अत्यंत प्रतिगामी व इतिहासचक्र उलटे फिरवून धर्मप्रभाव कायम करणारी होती. सुदैवाने नव्या सरसंघचालकाची भूमिका तत्त्वतः स्वागताई आहे; पण या कामासाठी लागणारी सामाजिक संघर्षाची भूमिका (उदा. एक गाव एक पाणवठा) संघटनात्मक पातळीवर संघाने अजूनही घेतली नाही ही वस्तुस्थिती आहे. उलट संघाबद्दलचे गैरसमज दूर होत आहेत (म्हणजे संघाची मूळ भूमिका कायम आहे) असे सांगण्यात सरसंघचालक मश्गुल आहेत.

## २ : धर्म परंपरा, संस्कृती व संघ

या त्रयीबाबतची गोळवलकरांची भूमिका आग्रही व अचिकित्सक होती. सर्व हिंदुपरपराचे विश्लेषण त्यांनी उदात्त (उद्दाम) शैलीत केले आहे. प्राचीन काळी आम्ही जगाचे गुरु होतो, आम्हाला शिकविण्यासारखे काही नाही. उलट आमच्यापासून शिकण्यासारखे बरेच आहे, अशी टोकाची दुराग्रही भूमिका त्यानी घेतली. राष्ट्रवादाचा पायादेखील परपरा व संस्कृती यावर आधारित असावा (उदा. हिंदुराष्ट्रवाद) इतकी प्रतिगामी भूमिका त्यानी घेतली. जे जे अभारतीय (खरे तर त्याच्या भाषेत अहिंदु) ते ते अराष्ट्रीय व म्हणून अस्वीकारार्ह ही भूमिका (गोळवलकराची व सघाची) येथल्या परंपरा व धर्म याच्या समर्थनार्थ त्यानी घेतली. याच पद्धतीने (तर्कशुद्ध) विचार करीत पुढे गेल्यास संघ हा ब्राह्मणीसंस्कृतीची जोपासना करतो व त्याचे अस्पृश्यता विरोधाचे ढोंग स्पष्ट होते असे डॉ. आढावासारख्यांनी मानल्यास गैर काय? एकरसहिंदुसमाजनिर्मिती परंपरेच्या व धर्माच्या समर्थनानी होणार तर नाहीच; पण परंपरागत वर्णवर्चस्व व वरिष्ठ वर्णीयांची गुलामगिरीच दलितांना व बहुजनसमाजाला वाटल्यास त्यात गैर काय ठरेल? तात्पर्य परंपरांची चिकित्सा शास्त्रीय पद्धतीने न करता त्यानी पाठीशी घालणारी अशास्त्रीय भूमिका (विज्ञानाचे पदवीधर असूनही) गोळवलकरांनी माडली. किमान आज तरी धर्माच्या ऐहिकदृष्टीने विचार करण्याची गरज संघाला वाटते का? याचे उत्तर संघाने जाहीररीत्या दिले पाहिजे. धर्म, परंपरा, संस्कृती यातून गुलामगिरी लादणारा धर्माचा भाग तत्त्वत कालबाह्य म्हणून सोडण्याने हा प्रश्न सुटणार नाही. तर परंपरांवर व धर्मावर कठोर प्रहार करणाऱ्या प्रबोधनाच्या चळवळीतून हा प्रश्न सुटण्याची (सुटलाच तर) शक्यता आहे हे संघाला मान्य आहे का? प्रबोधनाने प्रश्नाबद्दलच्या विचाराची दिशा स्पष्ट होत नाही असे संघ मानीत असल्यास सघस्थानावरील बौद्धिकेही कदाचित बंद करावी लागतील. त्याचप्रमाणे धर्म ही ज्याची त्याची व्यक्तिगत बाब आहे ही आधुनिक सेक्युलॅरिझमची भूमिका संघाला मान्य आहे का? बहुधा नसणारच. कारण ही भूमिका घेऊन धर्माच्या आधारे एकरस हिंदुसमाजनिर्मितीचे उद्दिष्टच सोडून द्यावे लागेल. संघाची याला तयारी आहे का? धर्म व परंपरा याचा सामाजिक प्रभाव नष्ट करण्याने एकरससमाजनिर्मिती शक्य आहे हे मान्य करण्यावर संघ बदलतो आहे किंवा नाही हे ठरवायचे आहे. आज तर या प्रश्नाचे उत्तर नाही असेच आहे. कारण संघबंदी उठल्यावर सर्व देशभर जाहीर सत्यनारायणाची पूजा घालून, संघाने आनंद प्रदर्शित करून आपण आहोत तिथेच आहोत हे पुन्हा स्पष्ट केले आहे.

## ३ : संघ व राष्ट्रवाद

'रा. स्व. संघाची विचारसरणी ही अत्यंत उग्र अशा राष्ट्रभक्तीतून निर्माण झाली आहे' (स. प्र. पत्रिका सप्टें-ऑक्टो. १९७० मधील प्रकाश गाडगीळ यांचा लेख) असे सघस्वयंसेवक समजतात. वास्तविक उग्रता ही कोणत्याही विचाराच्या आत्यंतिक भावनात्मक जवळिकेतून निर्माण होत असते. या अर्थाने पाहायचे झाल्यास हिंदुत्वाच्या प्रेरणेने ती उग्र राष्ट्रभक्ती निर्माण होते व तिचे (राष्ट्रभक्तीचे) सवर्धनही हिंदुत्वाच्या पोषणाने होते हे ओघानेच आले. अर्थात संघात न जाणाऱ्यांची राष्ट्रभक्ती उग्र नाही असे कुणी मानायचे काहीच कारण नाही प्रश्न इतकाच आहे, या उग्र राष्ट्रभक्तीचा आशय (अर्थातच राष्ट्रवादाचा) हिंदुत्व हा योग्य आहे काय? कारण केवळ भावनात्मकता वा उग्रता या युद्धकाळात राष्ट्रवादाला पोषक ठरतील; परंतु एरवी त्याचे रूपातर आक्रमक राष्ट्रवादात होते हेही मान्य करावयास हवे. राष्ट्रवादाच्या आशयासबधीची भूमिका (संघाची) आक्षेपार्ह वाटते व हेच हिंदुत्व त्याच्या राष्ट्रवादाचा गाभा आहे. वास्तविक हिंदू हा शब्द मूळचा भारतीय नाही, पण केवळ सर्वजण तो उच्चारतात म्हणून सघाला मान्य आहे. (संघाची भूमिका नेहमीच सोयिस्कर नीतीची राहिली आहे.) एकदा राष्ट्रवादाचा आशय हिंदुत्व राहणार हे मान्य केल्यावर हिंदू कोणास म्हणावे हा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. जे जे या भूमीला पुण्यभू, पितृभू मानतात, त्याचप्रमाणे ज्याना येथल्या परपरा व संस्कृती मान्य आहे व त्यांचा अभिमान आहे ते ते हिंदू अशी गोळवलकरांची याबाबतची भूमिका. ही भूमिका सकुचित तर आहेच, पण यामुळे मुस्लिम अल्पसंख्य, ख्रिश्चनसमूह याचे काय? हा प्रश्न उपस्थित होतो व या याबाबतची संघाची भूमिका या समूहानी येथल्या राष्ट्रीय (म्हणजेच हिंदू) परंपरेशी समरस व्हावे (अन्यथा दुय्यम नागरिक म्हणून राहावे लागेल) अशी होती व हीच आक्षेपार्ह गोष्ट आहे. यामुळे हिंदुपरंपरा, धर्म, संस्कृती न मानणारी माणसे अहिंदू म्हणजेच अराष्ट्रीय (कारण हिंदुराष्ट्र हे हिंदूचे आहे) व म्हणून शत्रू ठरतात ही भूमिका आक्रमक राष्ट्रवादाचे स्वरूप सोज्वळ शब्दात (दम देऊन) सागण्याची आहे. वास्तविक राष्ट्र ही प्रत्यक्ष प्रत्ययाला न येणारी; पण अस्तित्वात आहे असे मानलेली पोकळ कल्पना आहे. तिच्यात ज्या स्वरूपाचा आशय भरला जातो त्या स्वरूपाचा राष्ट्रवाद (उदा हिंदुराष्ट्रवाद, द्विराष्ट्रवाद) उभा राहतो व हा आशयच जर आक्रमक असेल तर राष्ट्रवाद हा आक्रमक होतो व त्याला परपरावादाची जोड मिळाली तर तो विस्तारवादी सुद्धा होतो. उदा. गोळवलकराना ज्या पवित्र (?) सिंधुनदीच्या नावावरून हिंदू हे नाव पडले, ती पवित्र नदी आजच्या भारतात नाही याचे दु ख आहे. (पहा 'विचारधन' हे गोळवलकराचे पुस्तक) व ती नदी पुन्हा भारतात यावी याची तीव्र ओढ आहे. हे घडवायाचे असेल तर आक्रमण करून हा प्रदेश जिंकण्याशिवाय मार्ग नाही. हे घडत नाही तोपर्यंत गोळवलकराना दु ख होणार हा विस्तारवादी राष्ट्रवाद दु खी अत:करणाने सागण्याचा नमुना. म्हणून सघाच्या राष्ट्रवादाच्या भूमिकेने येथील हिंद्वेतर व त्यांचे प्रश्न तसेच जे संघाच्या अर्थाने हिंदु नाहीत (उदा. समाजवादी, कम्युनिस्ट) त्यांचे काय? हा प्रश्न निर्माण होतो व यामुळे समान नागरी कायदा, लोकशाही या कल्पनाच निकालात निघतात. अलीकडच्या काही चर्चेतून भारतात राहणारा तो हिंदू अशी किमान व्यापक भूमिका घेतली जाते; पण त्यातही हिंदुत्वाचा (अनावश्यक) आग्रह कायम आहेच. संघाने ही भूमिका अर्थातच बदलली पाहिजे. कारण हिंदुराष्ट्रवाद (हिंदुधर्माच्या आधारे) ही तर्कशुद्ध स्वयंभू कल्पना नाही. (उदा. ज्या दलितांना हिंदू परंपरानी गुलाम केले त्यानी हिंदुराष्ट्रवाद मानावा असे आपण प्रत्यक्ष त्याच्यासाठी चळवळ न करता म्हणणार का?) ही कल्पना हिंदुराष्ट्रवाद मान्य नसणाऱ्याना

पृष्ठ २७ वर

आर्थिक टिपणे

# तेलासाठी दाही दिशा !

नारायण वैद्य

केंद्रसरकारच्या पेट्रोलियम मंत्रालयाचा १९७६-७७चा वार्षिक अहवाल नुकताच सादर करण्यात आला. त्या अहवालानुसार भारतातले क्रूड तेलाचे उत्पादन १९८१ मध्ये वार्षिक १९ दशलक्ष टनापर्यंत जाईल. सध्याचे उत्पादन वार्षिक ८·८ दशलक्ष टनाचे आहे. आज पेट्रोलियमच्या सर्व उत्पादित पदार्थांची (Petroleum products) वार्षिक गरज २४ दशलक्ष टनाची आहे असे सांगून हा अहवाल पुढे म्हणतो की, १९८१ साली ही गरज ३२ दशलक्ष टनापर्यंत जाईल.

१९७६-७७ मध्ये देशात क्रूड तेलाचे जे एकूण उत्पादन झाले त्यापैकी ऑइल अॅन्ड नॅचरल गॅस कमिशनचे ५·७ दशलक्ष टन, ऑइल इंडियाचे ३·१ दशलक्ष टन व आसाम ऑइल कंपनीचे सुमारे ६०,००० टन होते. १९७६-७७ मध्ये देशातल्या सर्व तेलशुद्धिकरण-कारखान्यातून एकूण २३ दशलक्ष टन तेलावर शुद्धिकरणप्रक्रिया करण्यात आली. त्यापासून २१·४ दशलक्ष टन पेट्रोल व तत्सम उत्पादित पदार्थ तयार करण्यात आले. याच वर्षी १४·२ दशलक्ष टन क्रूड तेल व २.६ दशलक्ष टन पेट्रोलियम उत्पादन याची आयात करण्यात आली. या आयातीची किंमत १४५० कोटी रुपयापर्यंत जाईल. १९७७-७८ मध्ये (ओपेक राष्ट्रांनी तेलाच्या किंमती वाढविल्या तर) तेलआयातीची किंमत १५३० कोटी रुपयापर्यंत जाईल.

या अहवालात १९८१ सालचे जे चित्र रेखाटण्यात आले आहे ते फारसे आशादायक नाही. १९८१ साली देशाची पेट्रोल व तत्सम उत्पादने याची गरज ३२ दशलक्ष टन असेल व स्वदेशी उत्पादन त्या वेळी १९ दशलक्ष टन असेल. तेव्हा १३ दशलक्ष टन तेल बाहेरून आणावे लागेल हे उघड आहे. १९७६-७७ मध्ये १६·८ दशलक्ष टनाची आयात करावी लागली व त्यासाठी सुमारे १४५० कोटी रु खर्च झाले. यावरून (तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमती जर स्थिर राहिल्या-परंतु ती शक्यता कमी) १९८१ साली १२०० कोटी रुपयापर्यंत तेलाच्या आयातीसाठी खर्च करावे लागतील.

या वर्षी तेलाचा पुरवठा समाधानकारक व्हावयाचा असेल तर पेट्रोल व तत्सम उत्पादने याची काटकसर करणे व उपयुक्ततेच्या दृष्टीने या पदार्थांची कार्यक्षमता वाढविणे यावर या अहवालात भर दिला आहे.

ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञांनी पेट्रोलखर्चात बचत करण्याचे नवे तंत्र शोधण्याचा अभ्यास चालविला आहे ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थ सायंटिफिक अॅन्ड इंडस्ट्रियल रिसर्च ऑर्गनायझेशन (मेलबोर्न) यांनी औद्योगिक कारखान्यासाठी इंधन म्हणून जी तेले वापरतात त्यात वस्त्रगाळ शुद्ध कार्बन मिसळून तयार होणारा द्राव वापरला तर जळणाची बचत होईल असे म्हटले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार या पद्धतीने १५ ते २० टक्के इंधनाचा खप वाचेल; परंतु प्राथमिक प्रयोग जरी यशस्वी झाले असले तरी काटकसरीच्या दृष्टीने तात्रिकदृष्ट्या हे कितपत शक्य आहे हे आज तरी सांगता येत नाही.

जगातल्या अनेक देशांना तेलाची आयात करावी लागते. दिवसेंदिवस जगाची तेलाची मागणी वाढत जाणार. त्याचा फायदा तेलनिर्यातदार राष्ट्रे घेणार. भारतासारख्या विस्तीर्ण क्षेत्रफळाच्या व प्रचंड लोकसंख्येच्या अविकसित देशात तेलाचा खप कमी करावयाचे म्हटले तरी ते कितपत शक्य आहे? मोहीम किंवा चळवळ म्हणून तेलाचा खप कमी करणे हे 'ठीक' आहे. काटकसर हवीच. खाजगी मोटारमालकांनी रोज १ लिटर तेल कमी वापरावे म्हणजे देशभर होणारी तेलाची बचत मोठी होईल यात शंकाच नाही; परंतु वाहतूक, औद्योगिक कारखाने, विद्युतउत्पादन याची मागणी दिवसेंदिवस वाढत जाणार. ती पूर्ण कशी करावयाची याचा विचार करण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे. औद्योगिक कारखान्यांना भांडवलगुंतवणुकीच्या सवलतीचे उदार धोरण व कामगारांना किमान वेतन देण्याची सक्ती (-आणि ही सक्ती आवश्यकच आहे) एका बाजूला व अर्थसंकल्पाचे संतुलन, पतपुरवठ्यात शिस्त हे चलनवाढ रोखण्याचे उपाय दुसऱ्या बाजूला, अशा स्थितीत ज्याचे फायदे दृष्टिपथात येण्यास अधिक काळ जावा लागतो अशा उद्योगामध्ये (उदा. लोखंड, खनिज तेल, खते) सार्वजनिक रक्कम गुंतवणुकीत कपात करावी लागेल. अशी कपात देशाच्या विकासाला मारकच ठरणार. १९७४ पासून आतापर्यंत आयात तेलापैकी जवळजवळ निम्मा व्यवहार हा भारतसरकार व संबंधित देशाचे सरकार यांच्या शासकीय पातळीवर झाला आहे म्हणून ४० ते ५० टक्के डिस्काउंट 'उधारीची सवलत आणि कर्जाची सवलत' या माध्यमातून मिळाला आहे. जर ही पद्धत नसती तर तेलाच्या आयातीची रक्कम गेल्या वर्षी २५०० कोटी रुपयापर्यंत गेली असती आणि १ जानेवारी १९७७ पासून (म्हणजे 'ऑर्गनायझेन ऑफ पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज' OPEC ने तेलाच्या किंमती वाढविल्यानंतर) आयात तेलाची किंमत आणखी काही कोटींनी वाढली असती.

पेट्रोलचा देशभर काटकसर आणि पेट्रोलियम उत्पादित पदार्थांच्या उपयोगाची कार्यक्षमता वाढविणे याबरोबरच देशात तेलाचे उत्पादन कसे वाढेल हा एक महत्त्वाचा विषय आहे. भारताच्या समुद्रप्रदेशात तेलाचे साठे शोधून काढण्याचा अभ्यास १९७८ मेपर्यंत पूर्ण होईल असे १९७६-७७ च्या पेट्रोलियम खात्याच्या अहवालात सांगितले आहे. अंदमान व निकोबार ही बेटे सोडून उरलेल्या सागरी भागात ऑइल अॅन्ड नॅचरल गॅस कमिशनचे अन्वेशक जहाज हा अभ्यास करीत आहे हे संशोधन मे १९७८ ला संपले म्हणजे संशोधनाचे क्षेत्र संपले असा अर्थ

अभिप्रेत नसावा. एक म्हणजे संशोधनासाठी आणखी दोन जहाजे तयार करावयास हवीत आणि संशोधनाचे क्षेत्र वाढवावयास हवे. तेलसंशोधनासाठी जगातल्या इतर देशांकडून आधुनिक तंत्रांची मदत घेण्यात कमीपणा वाटण्याचे कारण नाही. दुसरे म्हणजे १९७८ नंतर संशोधनाचा कार्यक्रम जारी राहील असे पाहिले पाहिजे.

बॉम्बे हाय व वसई तेलक्षेत्रासाठी जागतिक बँकेने नुकतेच १२० कोटी रु. चे कर्ज मंजूर केले आहे. पेट्रोलियम उत्पादन विभागासाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याची भारताची ही पहिलीच वेळ. तसे पाहिले तर जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास संघटना ( International Development Association ) यांनी ऊर्जाविकासासाठी १९५० पासून सहाय्य केले आहे. त्यात विद्युतनिर्मितीसाठी ७४९ दशलक्ष डॉलर व कोळसाउत्पादनासाठी ४७·४ दशलक्ष डॉलरची मदत ही लक्षणीय आहे. या सहाय्यामुळे बॉम्बे हाय व वसई येथील तेलउत्पादनात निश्चितपणे वाढ होईल यांत शंका नाही. आताच्या अंदाजाप्रमाणे सदर तेलक्षेत्रातून जास्तीत जास्त १३ दशलक्ष टन तेल उत्पादित होऊ शकेल व त्यामुळे आगामी २० वर्षांत सुमारे १२,८०० कोटी रुपयांचे परकीय चलन वाचेल. चालू आर्थिक वर्षात बॉम्बे हायमधून २·५ दशलक्ष टन तेल निघेल असा अंदाज आहे. १९८१–८२ च्या सुमारास हा आकडा १० दशलक्ष टनांपर्यंत जाईल. १९७६–७७ मध्ये हाच आकडा केवळ ०·४ दशलक्ष टनांचा होता. १९८० पर्यंत बॉम्बे हायसाठी ८५४ कोटी रुपये खर्च करावे लागतील. यात बॉम्बे हायपासून किनाऱ्यापर्यंत तेल आणि गॅस वाहून नेणारे नळ टाकण्याचा समावेश आहे. आतापर्यंत या एकूण प्रकल्पासाठी १२० कोटी रुपये खर्च झाले आहेत. १९७७–७८ मध्ये गुजराथ तेलक्षेत्रामधून ४·२ दशलक्ष टन तेल मिळावे असा प्रयत्न चालू आहे. याच क्षेत्रातून गेल्या आर्थिक वर्षात ४·१७ दशलक्ष टन क्रूड तेल व ६७९ दशलक्ष घनमीटर नैसर्गिक वायू मिळविता आला. या सर्वांपासून १५४ कोटी रु. नैसर्गिक तेलवायुमहामंडळाला मिळाले.

तेलसंशोधन व तेलउत्पादन यासाठी बरीच मोठी यंत्रसामुग्री लागते. त्यातली जी येथे तयार करणे शक्य असेल ती केली पाहिजे. त्यामुळेसुद्धा काही कोटी रुपयांचा परदेशचलनाचा भार कमी होईल. नैसर्गिक तेल व वायुमहामंडळाच्या बडोदा येथील यंत्रशाळेने १९७६–७७ मध्ये तेलउत्खननासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीपैकी काही यंत्रे तेथेच तयार करून ७८·४ लक्ष रुपयांचे परकीय चलन वाचविले. तेलसाठ्याचे संशोधन करण्यासाठी सरकार जसे प्रयत्नशील आहे तसेच तेलउत्खनन, वाहतूक आणि उपयोग यांचे बाबतीतही काटकसरीच्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीने संशोधनशाखा स्थापन होणे अगत्याचे आहे. अशा तऱ्हेचे संशोधन सरकारनेच करावे असे काही धर्मशास्त्र नाही. या व्यापक उद्योगातून अनेक मोठे खाजगी उद्योग संबंधित आहेत त्या सर्वांनी देशव्यापी व सर्वंकष संशोधनासाठी सुसज्ज प्रयोगशाळा आणि संशोधनसंस्था स्थापन करणे व त्यांचा सर्व खर्चभार उचलणे ही एक राष्ट्रीय गरज आहे.

□

पेट्रोल व पेट्रोलियम-उत्पादने यांच्या वापरात काटकसर करण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांचे जागी दुसरा पदार्थ वापरणे. आपल्या देशांत दगडी कोळशाचे उत्पादन बरेच आहे. तेव्हा शक्य तेथे दगडी कोळसा' कोलगॅस इत्यादी वापरून राष्ट्रीय औद्योगिक प्रगतीचा वेग कायम ठेवता येईल.

मध्यवर्ती ऊर्जामंत्रालयाच्या वार्षिक अहवालानुसार गेल्या ३ वर्षांत इंधनतेलाऐवजी कोळसा वापरून २ लक्ष ८० हजार टन तेलाची बचत करण्यात आली. १९७६–७७ मध्ये ६·२ दशलक्ष टन कोळसा निर्यात करण्यात आला. त्यामध्ये पश्चिम युरोप, जपान व तैवान यासारख्या नवीन गिऱ्हाइकांचा समावेश आहे. याच कालावधीत धुराचा त्रास न होणारे कोळशाचे दोन प्रकार कोल–इंडियाने शोधले आहेत. १९७६–७७ मध्ये एकूण कोळसाउत्पादन १०१ दशलक्ष टन झाले. या वर्षीत ऊर्जामंत्रालयाने नऊ मोठ्या कोळसा उत्पादन प्रकल्पांना मान्यता दिली आहे. त्यासाठी ८० कोटी ९० लक्ष रुपये भांडवल गुंतवावे लागेल. या प्रकल्पातून १९७८–७९ साली ५ लक्ष ८ हजार टन कोळसा मिळेल. हे प्रमाण प्रतिवर्षी ८ लक्ष ७८ हजार टनांपर्यंत वाढेल.

सदर अहवालात असेही सांगण्यात आले आहे की, 'देशात अनेक ठिकाणी 'लो टेंपरेचर कार्बनायझेन प्लॅन्ट्स्' उभारण्यात येणार आहेत. त्यातून कोळशापासून कोलगॅस व धूररहित इंधनाची निर्मिति होईल व जळणासाठी लागणारे रॉकेल व लाकूड यांची मोठ्या प्रमाणावर बचत करता येईल.

जसे तेलसंशोधनावर लक्ष केन्द्रित झाले आहे तसे कोळशाचे साठे भूगर्भातून शोधून काढणे व औद्योगिक क्षेत्रे, वाहतूक याबाबतीत नवनवीन पद्धती वापरून कोळशाचा उपयोग व कार्यक्षमता वाढविणे यावरही देशव्यापी संशोधनावर सरकारी व खाजगी क्षेत्रात भर द्यावयास पाहिजे. स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने हा कार्यक्रम आवश्यक आहे असे वाटते.

□

शैक्षणिक संस्था आणि संशोधनसंस्था यांना शास्त्रीय उपकरणे आयात करण्यावरची बंधने केन्द्र सरकारने शिथिल केल्याचे जाहीर केले आहे. एका आर्थिक वर्षांत एखाद्या संस्थेला जास्तीत जास्त २५ हजार रुपयांपर्यंत शास्त्रीय उपकरणे आयात करता येतील हे बंधन कायम ठेवण्यात आले आहे. यापूर्वी एका वेळी फक्त ५ हजार रुपयांचेच साहित्य आयात करता येई; हे बंधन रद्द करण्यात आले आहे. उपकरणांच्या किंमतीवाढ आणि इतर खर्चवाढ यामुळे हे बंधन जाचक आहे अशी प्रातिनिधिक मागणी सर्वत्र होत होती. □




# धरणाचे पाणी पेटले आहे

चंद्रकांत दीक्षित

अहमदनगरचा उत्तर भाग म्हाळादेवी का निळवंडे या धरणाच्या जागेवरून तापला असून धरण होण्याआधीच त्यातील पाण्याचे चटके या भागातील शेतकऱ्यांना बसू लागले असून 'आम्हाला म्हाळादेवीच पाहिजे.' वा '*निळवंडे धरण झालेच पाहिजे*' अशा घोषणांनी हा परिसर दुमदुमत आहे व उभय बाजू हा प्रश्न जीवनमरणाचा प्रश्न म्हणून आपापल्या बाजूने लढवीत आहेत.

म्हाळादेवी-निळवंडे प्रकरण वृत्तपत्रातून यावयास सुरुवात झाली व माजी मुख्य मंत्री शंकरराव चव्हाणांनी भूमिपूजन केलेल्या म्हाळादेवीधरणाची जागा बदलून निळवंडे येथे धरण करण्याची घोषणा नवे मुख्य मंत्री वसंतदादा पाटील मंत्रिमंडळाने केली आणि त्यातूनच गेले दोन महिने 'म्हाळादेवीच योग्य'... नाही नाही 'निळवंडे योग्य' अशी हाणामारी चालू झाली. विशेष असे की, हाणामारीची सूत्रे शंकरराव चव्हाण मंत्रिमंडळातले पाटबंधारेमंत्री. श्री. भिकाजी जिजाबा खताळ-पाटील यांनी म्हाळादेवीचे बाजूने स्वीकारली आहेत तर निळवंडे धरणाची *जागा खताळविरोधी गट सांभाळीत आहेत.* त्यामुळे रोज कोठे ना कोठे शेतकरी परिषदा, कार्यकर्त्यांच्या बैठका होत असून दिलखुलासपणे एकमेकांचे वाभाडे काढले जात आहेत. त्यामुळे हा प्रश्न चांगलाच पेटल्याने वास्तवता काय आहे म्हणून प्रत्यक्षात या भागात जाणेच श्रेयस्कर म्हणून चक्कर टाकली. काही पुढारी कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. या वादात नगर जिल्हा जनतापक्ष आहे म्हणून पक्षीय धुरीणांची भेट घेतली. त्यातला हा वृत्तांत.

म्हाळादेवी किंवा निळवंडे धरणाची जागा अकोला तालुक्यात आहे अर्थात कोठेही धरण झाले तरी त्याचे पाणी खुद्द अकोला, संगमनेर, श्रीरामपूर व *कोपरगाव तालुक्यातील जमिनीला* दिले जाणार आहे. म्हाळादेवीचे जागी धरण झाले तर अकोला ( ७१० ) संगमनेर ( ११ हजार ), श्रीरामपूर ( १८ हजार ) व कोपरगाव ( १२ हजार ) अशा एकर जमिनीस पाणी मिळणार आहे, तर निळवंडे धरणाखाली हीच क्षमता अकोला, संगमनेरकरिता जास्त होते व श्रीरामपूर-कोपरगावचे क्षेत्र कमी भिजते; परंतु कोपरगावला गंगापूर धरणातून आधीच पाणी मिळत आहे तर श्रीरामपूरला भंडारदऱ्याचे पाणी मिळते. निळवंड्याचे धरणामुळे अकोला-संगमनेर विभागातला दुष्काळी भाग सुपीक होईल व या चारही तालुक्यात समतोल होईल. म्हाळादेवी धरणाला फक्त डावा कालवा असल्याने अकोला-संगमनेरचा दुष्काळी भाग कायम पाण्याविना राहाणार आहे, तर निळवंडे धरणाला उजवा कालवा असल्याने नेमके पाणी त्या तालुक्यातील दुष्काळी भागाला मिळणार आहे.

*म्हाळादेवीला उजवा कालवा काढावा अशी जी मागणी अकोला-*-संगमनेर विभागातून केली होती, ती प्रच्छन्नपणाने आ. खताळांनी मंत्री असताना धुडकावली होती व आपण मोठ्या शेतकऱ्याचेच पंटर आहोत. हे कृतीने दाखवून दिले होते. आता मात्र म्हाळादेवीचे धरण योग्य याचे नेतृत्व खताळ आणि खासदार बाळासाहेब विखे करीत आहेत. खा. विखे नेमके श्रीरामपूर विभागातले. तशात प्रवरा सहकारी साखरकारखान्याचे अध्यक्ष म्हणजे शुगरकिंग. या शुगरकिंगना आपल्याकडे पाणी जास्त यावे असेच वाटणार. म्हणून त्याचा आग्रह म्हाळादेवीचा आणि खताळ हे विखे पाटील याचे साथीदार म्हणून त्यांचा निळवंड्याला विरोध असे त्रांगडे झाले आहे.

खताळ स्वत. संगमनेरचे असून *आपल्या तालुक्यातील जमीन जास्त भिजू नये म्हणून प्रयत्नशील व्हावेत हे आश्चर्यच;* परंतु मला नाही मिळाले तर इतरानाही मिळू देणार नाही या प्रवृत्तीतून वाद वाढविला गेला आहे. म्हाळादेवीसाठी खताळ जे समर्थन करीत आहेत ते फारसे टिकणारे नाही. कारण खताळ स्वतःच पाटबंधारेमंत्री होते त्या वेळी खरे तर कामात त्यांना वेग आणता आला असता, परंतु लोकसभा-निवडणुकीने उलथ्याचे पालथे झाले. स्वत· शंकरराव चव्हाण मुख्य मंत्र्याऐवजी साधे आमदार झाले तर त्यांची सावली म्हणून वावरलेले खताळ कुठे ? आणि हीच रुखरुख आ. खताळांना आहे. मंत्रिपद गेले त्यामुळे भगतगणही गेले. अस्तित्वासाठी तर धडपडले पाहिजे म्हणून तुम्ही शेंडी ठेवली ना, मी दाढी ठेवणार अशी भूमिका खताळ-विखे पाटलांची.

## दोन धरणांचा वाद

म्हाळादेवी की निळवंडे या वादात म्हाळादेवीच श्रेष्ठ असे सांगितले जाते. प्रत्यक्ष पाहिले तर असे दिसून येते, की म्हाळादेवीचे धरणात ६·४३ टी. एम्. सी. पाणी राहील, तर निळवंडे धरणात ५·२० टी. एम्. सी पाणी राहील. म्हणजे जवळपास सव्वा टी. एम्. सी. पाणी निळवंडे धरणात कमी राहील. तरीही म्हाळादेवीइतके जवळपास क्षेत्र भिजेल त्यासाठी प्रत्यक्षात १·२३ टी. एम्. सी. पाण्याचा साठा कमी होईल व तो ओव्हरफ्लो होऊन प्रवरेच्या पात्रात पडेल. प्रत्यक्षात म्हाळादेवीला पिकप वेअर ( पाण्याला वळण

देण्यासाठी छोटीशी भिंत ) करावयाचा. त्यामुळे श्रीरामपूरला ते पाणी कमी पडणार आहे ते पडणार नाही. अर्थात या धरणाला डावा आणि उजवा कालवा काढला पाहिजे. दोन्ही कालवे काढले तरच अकोला–संगमनेरचा दुष्काळी भाग पाण्याखाली येईल व श्रीरामपूर, कोपरगावबरोबरच विकासाची समान संधी प्राप्त होईल. विकासाच्या समान संधीसाठी खताळ–विखेपाटलांविरुद्ध विरोधकांचा असा पवित्रा आहे.

खरं तर ब्रिटिश काळात, म्हणजे जवळपास १८८२ साली म्हाळादेवी, सावंतवाडी, निळवंडे, दिगंबर या जागांची पाहणी भूगर्भशास्त्रज्ञांनी केली होती व त्या पाहणीत धरणासाठी उत्तम जागा म्हणून सावंतवाडीचा अहवाल आहे. तज्ज्ञानी म्हाळादेवीला मातीचे धरण व्हावे असा निर्णय घेतला होता व निळवंडयापेक्षा म्हाळादेवी उपयुक्त असा अहवाल दिला होता. (खताळ बैठकी, परिषदातून हाच अहवाल सागत असतात) परंतु १८८२ सालचा अहवाल पुढे दुरुस्त झाला व म्हाळादेवीपेक्षा निळवंडे श्रेष्ठ या भूमिकेवर तंत्रज्ञ आले. (हे मात्र खताळ–विखे सांगत नाहीत.)

आणखी खरी एक बाजू कुणी पुढे आणलीच नाही व ती म्हणजे कृष्णा–गोदावरी पाणीवाटपाचा वाद. तो मिटला असला तरी त्यात मख्खी होती व तीच खरी पार्श्वभूमी येथे आहे. गोदावरीच्या पाण्यावर एकूण २१५ टी एम्. सी. पाणी महाराष्ट्राला मिळू शकत होते. कारण तीत गोदावरी, प्रवरा, दारणा, आढळा, म्हाळुंगी व मुळा या नद्यातील जलसपत्तीचा समावेश होता त्यापैकी इंग्रजी राज्यात भंडारदरा येथे ११ टी. एम्. सी.चे धरण झाले. भंडारदरा तरी का बांधले गेले ? तर म्हाळादेवीला मातीचे धरण होणार म्हणून १९०० चे सुमारास विविध देशातले तंत्रज्ञ या म्हाळादेवीला आले. तज्ज्ञांनी प्रारंभिक कामाची पाहाणी केली. (आजही तेथे नदीच्या डाव्या बाजूला पायाच्या कामाचे अवशेष दिसत आहेत.) व त्यांनी एकमुखी निष्कर्ष काढला, की धरण टिकणार नाही. म्हणून ते त्या काळी होणारे धरण रद्द करून भंडारदरा बांधले गेले. नंतर दारणा (इगतपुरी ) साडेसात टी. एम्. सी.; गंगापूर साडेसहा टी. एम्. सी.; मुळा (बारागाव नांदूर) २१ टी. एम्. सी.; आढळा (देवठाण–अकोला) दीड टी. एम्. सी; म्हाळुंगीवर (भोजापूर–सिन्नर) एक टी. एम् सी. अशी धरणे झाली व आता म्हाळादेवी वा निळवंडे (साडेसहा टी. एम्. सी.) होऊ घातले आहे अशा ५५ टी. एम्. सी. पाण्याचा हिशेब झाल्यावर १६० टी एम. सी. पाणी शिल्लक राहिले. १९६५ मध्ये भारत–पाक युद्ध झाले. नेमके त्याच वेळी महाराष्ट्रात शकरराव चव्हाण पाटबंधारेमंत्री होते व केंद्रात के. एल्. राव. या दोघांनी संगनमत केले व ११५ टी. एम्. सी चे धरण जायकवाडीला मंजूर करून घेतले. कामाला गतीही आणली. (आता तर जवळपास पूर्ण)स्वर्गीय लालबहादूर शास्त्रीना आणून भूमिपूजन उरकले व ४५ टी. एम्. सी. पाण्याचे उदारहस्ते उदक आंध्र राज्याला दिले. ते पाणी गोदावरीच्या पात्रातून दिले हे महत्त्वाचे आहे.

हा कट जर नीट लक्षात घेतला तर आपल्या खताळ–विखे विरुद्ध कार्यकर्त्यांची बाजू लक्षात येते. खताळपाटील सध्या राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाण्याया प्रश्नाकडेच पहा म्हणून आवाज देत आहेत व थेंब नि थेंब वापरात आणण्याचे आवाहन करीत आहेत !

खरं तर खताळपाटलांना म्हाळादेवीच का, या प्रश्नावर बोलण्याचा नैतिक हक्कच नाही, असे सागताना निळवंडयाचा समर्थक म्हणाला, की खताळपाटील याना ज्येष्ठनेते दत्ता देशमुख यानी सुचविलेली संगमनेर–अकोल्यासाठी केळीसागली योजना रद्द केली. ती झाली असती तर ३६ हजार एकर जमीन भिजली असती; परतु त्यानी त्या योजनेच्या दोन योजना केल्या. देवठाण व भोजापूर त्याद्वारे फक्त २० हजार एकर क्षेत्र भिजत आहे. एवढेच नव्हे तर मुळा-योजना मूळची ३१ टी. एम. सी. ची असताना २१ टी एम. सी.ची झाली. १० टी. एम. सी. पाणी कोठे गेले ? तर नदीपात्राद्वारा जायकवाडी धरणातून ओव्हरफ्लो करून आंध्रात गेले काय बोलणार आहेत खताळ–पाटील ?

आता आहे खर्चाचा मुद्दा. म्हाळादेवीचे भूमिपूजन झाले व त्या वेळेपासून आतापर्यंत दोन कोटीच्या आसपास खर्च झाला व आता निळवंडयाला धरण केले तर पहिला खर्च अनाठायी जाणार नाही का ? वास्तवात खर्च झाला तो मशिनरी व काही बंगल्यांवर व दुष्काळी काम म्हणून पाट खादले त्याचा; परंतु निळवंडयाला मशिनरी उपयोगात येऊ शकते व पाटही उपयोगात येऊ शकतात. बंगले तर केव्हाही उपयोगी ठरू शकतील. कारण म्हाळादेवी व निळवंडयात असे कितीसे अंतर आहे ?

## निळवंडे का योग्य ?

वास्तववादी दृष्टिकोनातूनच या धरणांकडे पाहिले पाहिजे कारण म्हाळादेवीला केवळ १·२३ टी. एम. सी पाणी जास्त साठणार व व जास्त जमीन भिजणार हा दावा खरा नाही. धरण बाधताना कमीत कमी पुनर्वसन हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण म्हाळादेवी धरणाखाली ' संभोडी, मेहेंदुरी, म्हाळादेवी, सावतवाडी, चितळवेढे, निळवंडे, निंबरळ, रिठे व दिगबर ' अशी ९ गावे जातात व जवळपास पंधरा हजार नागरिकाचे पुनर्वसन करावे लागणार आहे. त्यात सुपीक जमीन जात असून पुनर्वसनाचा खर्च १० कोटी येणार आहे तर निळवंडे धरणाखाली केवळ दिगंबर, निळवडे ही पूर्णपणे व चितळवेढे हे अर्धे गाव अशी अडीच गावे जातात, म्हणून पुनर्वसनाचा खर्च कमी येईल.

तुलनात्मकदृष्टया पाहिले तर असे दिसते की म्हाळादेवीपेक्षा निळवंडे श्रेष्ठ आहे. सर्व परिस्थितीच्या पाहाणीत हेच दिसते. तक्ताही हेच दाखवील –

| | म्हाळादेवी | निळवडे | दिगबर |
|---|---|---|---|
| कॅचमेंट एरिया | २७४ चौ. कि.मी. | २३७ चौ. कि.मी | १९२–७० चौ कि.मी. |
| साठा | ६·४३ TMC. | ५·२० TMC | ४·५२ TMC |
| पाण्याचा उपयोग | ७·८२ TMC. | ६·५० TMC | ५·१० TMC |
| सिचनक्षेत्र | ४१६०० एकर | ३५८०० एकर | ३२२५० एकर |
| बुडणारे क्षेत्र | ३४६० एकर | २२२२ एकर | १९६० एकर |
| एकूण किमत | १४·७० लक्ष (१९७७ साली) | १४·४९ लक्ष (१९७७ साली | १२·४९ लक्ष |
| वीजनिर्मिती | ५० द. ल. यु. | ४२ द. ल. यु. | ३० द. ल. यु. |

## राजकीय परिणाम

या धरणाच्या जागेची साठमारी चालू असताना जनतापक्षाची भूमिका काय याचा कानोसा घेता समजले, की, जिल्हापक्षाने या धरणाचे बाबतीत आपली भूमिका काय ठेवावी यासाठी सर्वश्री अमृत मेहता ( माजी जिल्हा लोकलबोर्ड अध्यक्ष ) माजी आमदार मोहनराव गाढे व भास्करपाटील गलांडे याची समिती नेमली आहे. हे तिघे अनुक्रमे अकोला, कोपरगाव व श्रीरामपूर या तालुक्यांतले आहेत. समिती प्रत्यक्ष जागेची पाहाणी करणार आहे. ( एव्हाना झाली असेल. ) नकाशे, शासकीय माहिती व कार्यकर्ते शेतकरी यांचेशी चर्चा करणार आहे.

या धरणाचे पडसाद जिल्ह्याचे राजकारणावर पडणार काय असा प्रश्न उभा राहातो अर्थात जिल्हाभर त्याचे पडसाद उठणार यात संशय नाही. कारण उभय गट मोठे मातबर आहेत व त्यांची गट-बांधणी तशी मजबूत आहे आता तर खा. बाळासाहेब विखेपाटील हेच महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेसचा तंबू टाकून बसले आहेत व आमदार खताळ त्या तंबूत आहेत. विखेपाटील महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले आहेत. हा परिपाक फार वेगळया कारणा-वरून झाला; तरी धरणाचा प्रश्न त्यात होताच.' कारण माजी मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांचे धोरणाविरुद्ध नवे मुख्य मंत्र्याचे धोरण आहे, अशी खताळपाटलाची ओरड आहेच. तेव्हा धरणाचे प्रश्ना-वरूनच जिल्हाभर कॉंग्रेस फुटणार आहे. धरणाचे केवळ निमित्त धरले जाईल. खासदार विखेपाटील स्वत. साखरकारखाना चालवितात व सत्तेची केंद्रे कशात आहेत हे सगळयानाच माहिती असल्याने त्यानी भराभर आपली म्हणून जी माणसे आहेत ती गोळा करावयास सुरु-वात केली आहे. त्यामुळे जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आ. शंकरराव काळे ( हेही साखरकारखान्याचे अध्यक्ष आहेत. ) याची मोठी पचाईत झाली आहे की, आता आपण कॉंग्रेस कशी साभाळावयाची ! म्हणून त्यानीही विखे–खताळाविरुद्ध सभाचा सपाटा लावला आहे; परतु याचा म्हणावा तसा परिणाम होत नाही. म्हणून अनेक साखर-कारखानदाराची लॉबी उभी करण्याचा प्रयत्न चालला आहे. त्याना साथ आहे ती राज्यमंत्री एकनाथराव निंबाळकरांची व दा. ता. रूपवते या मंत्रीमहाशयांची ( रूपवते अकोल्याचे आहेत. ) म्हणजे हा वाद आता साखरकारखान्यातून पैशाचे जोरावर जिल्हा परिषद, सहकारी बँक, सहकारी संस्थातून खेळला जाणार आहे आणि अस्मिता ( ! ) दुखावलेली माणसे नगर जिल्ह्यात वाद किती भयानकपण खेळतात याचा अनुभव मोठा विचित्र आहे.

या वादातून नगर जिल्हा कॉंग्रेस फुटली तर ती इष्टापत्तीच ठर-णार आहे गेली २५ वर्षे बेगुमानपणे कॉंग्रेसची मडळी सोयऱ्या-धायऱ्यापलीकडे कुणालाच खुमानीत नव्हती. एक तर सत्तेचीच मस्ती होती साखरकारखान्याचा पैसा होता. सत्ताकेंद्रे वाटून घेतली होती. त्यामुळे मस्त साडांसारखी संस्थानिक म्हणून ही मडळी राहिली. त्यामुळे प्रामाणिक कार्यकर्त्यांची कुचबणा झाली. ती कॉंग्रेसच्या फाटाफुटीमुळे थांबेल सत्ताकेंद्र विभागली जातील त्यामुळे या उन्मत्ताना, झक मारून का होईना, छोटया–मोठया प्रामाणिक कार्य-कर्त्यांची दखल घ्यावी लागणार आहे. अर्थात या सर्व फाटाफुटीचा फायदा जनतापक्ष घेणार की नाही हा खरा प्रश्न आहे. कारण जनतापक्षाचे नेतृत्व आज तरी चारित्र्यशुद्ध आहे कार्यकर्त्यांची चांगली टीम आहे. वर्षानुवर्षे नेकीने काम करण्याची त्यांना सवय आहे. म्हणूनच जनतापक्षाने या कॉंग्रेसच्या सुंदोपसुंदोचा फायदा करून घेतला पाहिजे

कॉंग्रेस आता फुटणार ( म्हणजे फुटलीच आहे ) यात तर शंकाच राहिली नाही. त्यासाठी फारसे परिश्रमही जनतापक्षाला घ्यावे लागणार नाहीत; पण ती फुटत असतानाच त्यातील वेचक कार्यकर्ते, की जे प्रामाणिक आहेत, कर्तृत्ववान आहेत ते मिळविले पाहिजेत. जिल्हाभर सध्या जनतापक्षाचे लोण पसरत आहे. त्याची पाळेमुळे यामुळे घट्ट होतील अशा घट्ट पाळेमुळे रुतलेल्या संघटनेला कॉंग्रेस म्हणजे किस झाडकी पत्ती वाटेल असा रागरंग आहे म्हणूनच धरणाचे पाणी पेटले आहे त्यात जनतापक्ष काही समिधा टाकणार काय यासाठी हा प्रपच !

□

---

# जेपी - सुधारक, बंडखोर की क्रांतिकारक ?

## कॉ. शरद पाटील ( धुळे ) यांचा लेख

लवकरच ' माणूस ' मधून

---

परराष्ट्रीय घडामोडी

# कॅनडा दुभंगलेले घर ?

चन्द्रशेखर पुरंदरे

काश्मीरच्या निवडणुकांच्या जरा आधी शेख अब्दुल्लाने भारतापासून विभक्त होण्याच्या घोषणेचा पुनरुच्चार केला. त्याबरोबर निषेधाची एक प्रचंड लाट देशाच्या उर्वरित भागात उसळली आणि त्याला प्रत्युत्तर म्हणूनच की काय, विभाजनवादी भूमिका जाहीर करूनही नॅशनल कॉन्फरन्सचे काश्मीरच्या खोऱ्यात राजकीय पुनरुज्जीवन झाले किंवा मध्यंतरी तामिळनाडूच्या द्रमुकने फुटून निघण्याची भाषा सुरू केली होती तेव्हाही अशाच निषेधाच्या, धिक्काराच्या घोषणा देशाच्या इतर भागात झाल्या. थोडक्यात, कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा करून देशाच्या एकात्मतेला तडा देणारे प्रश्न राष्ट्रीयत्वाच्या कष्टपूर्वक जोपासलेल्या भावनेला कसा सहज धक्का लावतात याचा नीट अनुभव आपणा सर्वांना आहे.

थोडासा असाच प्रकार कॅनडाच्या बाबतीत घडतो आहे. क्युबेक हा कॅनडाच्या पूर्वेकडचा संपन्न प्रांत आहे. या प्रांतात फ्रेंच बोलणाऱ्यांची संख्या इंग्रजी बोलणाऱ्यापेक्षा अधिक आहे. कॅनडाच्या एकूण १२ राज्यांपैकी आणखी तीन राज्यात ( न्यू ब्रुन्स्विक, नोवा स्कोटिया, मॅनिटोबा ) अशीच परिस्थिती आहे; पण उरलेल्या एकूण आठ राज्यांमध्ये या उलट म्हणजे इंग्रजी बोलणारे बहुसंख्य, अशी स्थिती आहे. या क्युबेक प्रांतामध्ये १९७६ च्या नोव्हेंबर महिन्यात निवडणुका झाल्या आपल्याकडचा उत्तरप्रदेश जसा परवापर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जात होता, तसाच क्युबेक हा प्रांत सत्तारूढ लिबरल पक्षाचा बालेकिल्ला होता; परंतु या प्रांतिक निवडणुकामध्ये 'पार्टी क्युबेकॉय' या स्थानिक पक्षाला बहुमत मिळाले आणि संपूर्ण कॅनडाला धक्का बसला. कारण या पक्षाचा नेता रेने लेवेस्क याने आपली संपूर्ण राजकीय कारकीर्द स्वतंत्र क्युबेकच्या मागणीत खर्ची घातलेली आहे. तेव्हा ह्या पक्षाला बहुमत म्हणजे फुटीरतेला खतपाणी असे समीकरण सपूर्ण कॅनडाला भेडसावू लागले यात नवल नाही. ही भीती खरी ठरू पाहात आहेच. लेवेस्कने निवडणुका विभाजनाच्या प्रश्नावर लढविल्या नव्हत्या. त्याने आपल्या प्रचाराची सुरुवात त्या प्रश्नाने केली, पण जनमत कसे झुकेल याचा अदाज नसल्याने त्याने सत्तारूढ लिबरल पक्षावर टीका करण्यावरच पुढच्या सर्व प्रचाराचा भर दिला आणि निवडणुका जिंकल्यावर येत्या दोन वर्षांत कॅनडापासून विभक्त होण्याच्या प्रश्नावर सार्वमत घेण्याची घोषणा केली.

क्लाउद मोरिन हा नव्या क्युबेकवादी पक्षाच्या सरकारातील मंत्री कॅनडामध्ये राहाणे हे क्युबेकला किती महागात पडत आहे याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमीत आहे. तिच्या अहवालानुसार स्वतंत्र क्युबेकचा जन्म होणार अशी योजना आहे.

रेने लेवेस्कची ' पार्टी क्युबेकॉय ' सत्तेवर येण्याआधी लिबरल पक्षाचे रॉबर्ट बुरासा याच्या नेतृत्वाखालील सरकार क्युबेकमध्ये अस्तित्वात होते. फ्रेंच लोकाचा ' फ्रेंच भाषा, फ्रेंच संस्कृती, फ्रेंच विचारसरणी' हा मानबिंदू त्याला जपता आला नाही. Law 22 या नावाची एक योजना त्याने राबविली. या अन्वये फ्रेंच हीच राज्यकारभाची भाषा ( क्युबेक प्रांतापुरती ) ठरविली गेली आणि सर्व सरकारी, खाजगी कर्मचाऱ्यांना ती शिकणे जबरदस्तीचे करण्यात आले. त्यामुळे जे इंग्रजी बोलणारे अथवा इतर भाषा बोलणारे क्युबेकमध्ये वा अन्यत्र होते, ते अस्वस्थ झाले आणि याच एकांगी भूमिकेमुळे फ्रेंच जनताही लिबरल पक्षावर असंतुष्ट झाली आणि निवडणुका रेने लेवेस्कच्या पार्टी क्युबेकॉयने जिंकल्या.

दोन वर्षांच्या कॅनडापासून विभक्त होण्याच्या सार्वमताआधी स्वच्छ व भ्रष्टाचार नसलेले सरकार देण्याचे आणि आर्थिक स्थिती सुधारण्याचे वचन लेवेस्कने क्युबेकच्या लोकांना दिलेले आहे. ही दुसरी गोष्ट अत्यंत अवघड आहे. कारण या सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या धोरणाने असंतुष्ट झालेले उद्योगसमूह क्युबेक सोडून जात आहेत. किंबहुना Law २२ च्या अंमलबजावणीनंतरच ५७ कंपन्यानी कॅनडाच्या इतर प्रांतांत पुनर्वसन केले आहे. ९१ कॅनेडियन किंवा अमेरिकन कपन्यानी प्रमुख ऑफिसे क्युबेकबाहेर नेली आहेत. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या स्वत च्या पायावर उभे राहण्यात, जी गोष्ट स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभे रहाण्यासाठी उद्या क्युबेकला अत्यावश्यक आहे. अडचणी येत आहेत. बुरासाच्या सरकारनेही आपल्या काँग्रेससरकारसारखाच दिवाळखोर अर्थव्यवस्थेचा देदीप्यमान वारसा मागे ठेवलेला आहे; पण तरीही लेवेस्क आणि त्याचे मंत्रिमंडळ कॅनडापासून फुटून निघण्याच्या कल्पनेनें एवढे भारून गेले आहे की, त्यांना या अडचणी तितक्या कठीण वाटत नाहीत

पण खरा प्रश्न निराळाच आहे विभक्त होण्याची भाषा इतकी वर्षे हा पक्ष करीत आला असला, तरी विभक्त होणे म्हणजे नक्की काय याबातत स्वत. लेवेस्कपासून कोणीच स्पष्ट भूमिका घेत नाही. जर विभक्त होण्याचे निश्चित झालेच, तर असंतुष्ट अशा या प्रांताला त्याच्या इच्छेविरुद्ध कॅनडाचे केंद्रीय सरकार कॅनडामध्येच रहाण्यास भाग पाडणार नाही या एका आशेवर लेवेस्क विसंबून आहे.

क्युबेक आणि क्युबेक वजा जाता उरलेला कॅनडा हे दोन स्वतंत्र, सार्वभौम देश असतील असे तो म्हणत नाही; पण निराळी राष्ट्रीय बँक [ आपल्या रिझर्व्ह बँकेसारखी ], निराळे चलन, निराळी करव्यवस्था, निराळ्या कपन्या व बँका, निराळी रेडिओ आणि टी. व्ही. संस्था इत्यादी स्वायत्त राज्य म्हणूनच ज्याचा उल्लेख केला जाऊ शकेल, अशा सरकारला पॅरलल यत्रणा उभारणे व हे शांततापूर्णरीत्या करणे हे लेवेस्कचे नजीकच्या भविष्यातले ध्येय असावे. संरक्षणव्यवस्थेबाबत तो अजून मौन पाळून आहे. दळणवळण आहे तसेच पण जरा बंधने घालून चालू राहील अशी अपेक्षा आहे.

या साऱ्या बदलणाऱ्या व बदललेल्या वातावरणाचे उरलेल्या कॅनडावरचे परिणाम शोकजनक आहेत. अजूनही कॅनडाचा बुद्धिमान पंतप्रधान पिएर त्रुदो याने क्युबेकची धमकी वास्तवात येईल असे मान्य केलेले नाही. त्याने दाखवून दिल्याप्रमाणे

खरोखरच क्युबेकच्या फुटून निघण्याने ११० वर्षे वयाच्या कॅनडाच्या संघराज्यावर किंवा स्वत: क्युबेकवर एकही चांगला परिणाम होण्याची शक्यता नाही. क्युबेक देशाला एकूण अर्थसंपत्तीच्या एकचतुर्थांश पैसा इतके भांडवल पुरवतो. केवळ फ्रेंच बोलणाऱ्यांचे निराळे राज्य म्हणून क्युबेक जर बाहेर पडू म्हणत असेल तर त्रुदोने दु:खाने म्हटल्याप्रमाणे त्याचे कॅनडावरचे सोडाच पण जगाच्या इतर भागावरही, जेथे भिन्न भाषिक गुण्यागोविंदाने नांदत आहेत त्यावर अनिष्ट परिणाम होतील. सहजीवनावरचा लोकांचा विश्वास उडेल आणि कॅनडातच जी इतर तीन राज्ये, ज्यामध्ये फ्रेंच बोलणाऱ्यांची संख्या जास्त आहे त्याच्यावर तर फारच विचित्र परिणाम होईल.

कॅनडा या संघराज्यात जी राज्ये सामील झाली आहेत त्यापैकी पूर्वेकडच्यांना पश्चिमेकडच्याविषयी एक विशिष्ट असूया कायम वाटत आलेली आहे. ब्रिटिश कोलंबिया हे राज्य मोठ्या नाखुषीनेच कॅनडामध्ये १८७१ साली विलीन झाले. आल्बर्टा आणि सास्काचेवान ही राज्ये तर १९०५ पर्यंत संघराज्यात सामील झालेली नव्हती. ही तीनही पश्चिमेकडची राज्ये आहेत. पूर्व कॅनडाबद्दल त्यांना फारसे प्रेम कधीच नव्हते व नाही. त्यांच्यावर आर्थिक अन्याय होत आल्याचा त्यांचा दावा आहे. त्यांच्या कॅनडाशी आधीच तकलादू असणाऱ्या निष्ठांवर क्युबेकच्या या निर्णयाने जबरदस्त प्रतिकूल परिणाम होण्याची भीषण शक्यता आहे. जर कॅनडा फुटण्याची वेळ आली तर ही राज्ये संयुक्त संस्थानात म्हणजे अमेरिकेत विलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बाकी राज्यांचा क्युबेकवरचा राग काही नवीन नाही. भारतसरकारने ज्याप्रमाणे काश्मीरला विशेष अधिकार घटनेतील कलमान्वयेच दिलेले आहेत, तसेच क्युबेक हे आजवरचे कॅनडाचे लाडावलेले राज्य आहे. विशेषत: १९६८ मध्ये ओटावामध्ये (कॅनडाची राजधानी) त्रुदो अधिकारारूढ झाल्यापासून तर पश्चिमेकडच्या राज्यांना उपाशी ठेवून क्युबेककडे सगळा ओघ वळविण्यात आलेला आहे. क्युबेकमध्ये आल्बर्टात किंमती वाढवून तेल सर्वत्र स्वस्त दराने विकले जात असे. हल या शहरात प्रचंड गगनचुंबी इमारती उभारण्यात आल्या. सरकारी केंद्रीय नोकऱ्यांतसुद्धा फ्रेंच बोलणाऱ्यांना प्राधान्य देण्यात आले. कपड्यांवर आणि कापडावर (आयात होणाऱ्या) प्रचंड कर लादण्यात आले आणि या करांचा फायदा सरळ सरळ क्युबेकला मिळत असे.

या साऱ्या क्युबेकप्रेमाचा आणि क्युबेकला गोंजारून घेण्याच्या मध्यवर्ती सरकारच्या धोरणाचा वीट येऊन अखेर त्याच्या निषेधार्थ मागच्या वर्षी कॅनडाचा संरक्षणमंत्री जेम्स रिचर्डसन याने राजिनामा दिला

दुसरा विचित्र परिणाम असा झालेला आहे की, आज कॅनडाचे त्रुदोसरकार कात्रीत सापडलेले आहे. क्युबेकला आजवर देत असलेल्या सवलती, क्युबेकच्या फुटून निघण्याच्या प्रतिज्ञेवर काहीच परिणाम न करू शकल्याने पाण्यात मिळाल्या आहेत आणि त्या आजवरच्या प्रमाणात चालू ठेवणे म्हणजे जी राज्ये संघराज्याशी निष्ठा बाळगून आहेत, त्यांचा रोष ओढवणे आहे. शिवाय ते सरकारी खजिन्याला परवडणारेही नाही; पण हे मानमरातब कमी करावेत, तर क्युबेकमधल्या लेवेस्कसरकारला आयतेच हातात कोलित दिल्यासारखे होणार. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत क्युबेकसरकार आनंदी पायरीवर उभे आहे.

क्युबेकच्या बाहेर पडण्याने अर्थव्यवस्था; अंतर्गत सुरक्षा तर अशी कोसळणार आहेच; पण क्युबेकच्याही पूर्वेकडची व अॅटलांटिक समुद्राला लागून किंवा समुद्रात असणारी जी सागरी राज्ये आहेत, त्यांना शिल्लक-राहणेही कठीण जाणार आहे. उदा. न्यूफाउंडलंड हे असे एक राज्य आहे की, जे वीजनिर्मिती करू इच्छिते, त्यातली फक्त निम्मीच त्याला स्वत:साठी पुरेशी आहे. निम्मी वीज घेण्याचे क्युबेकने मंजूर केले. क्युबेकपेक्षा ओंटॅरिओ हे कॅनडातील दुसरे राज्य अधिक किंमतीने ही वीज घ्यायला तयार आहे; पण ही वीज न्यूफाउंडलंडपासून ओंटॅरिओपर्यंत वाहून न्यायला ज्या तारा टाकाव्या लागतील; त्या क्युबेकमधून जातील आणि जर क्युबेक उद्या स्वतंत्र झाले, तर या साऱ्याच योजनेवर बोळा फिरणार. या आणि अशा अनेक अंतर्गत अडचणी क्युबेकच्या या निर्णयामुळे कॅनडासमोर आ वासून अचानक दत्त म्हणून उभ्या ठाकल्या आहेत.

ही सर्वच सागरी राज्ये (नोवास्कोटिया, प्रिन्स एडवर्ड आयलंड आणि न्यूफाउंडलँड) कॅनडाच्या बाकी कोणत्याही राज्यापेक्षा क्युबेकशीच संपूर्णतया जोडलेली आहेत. त्यात नोवास्कोटिया व प्रिन्स एडवर्ड आयलंडमध्ये अजून लिबरल पक्षाचीच सरकारे अस्तित्वात आहेत त्यामुळे क्युबेक आधीच त्यांच्याकडे संशयाने पाहत आहे. तेव्हा या परिस्थितीत त्यांच्याशी वैर जोपासणे त्यांना अस्तित्वाच्या दृष्टीनेच परवडण्यासारखे नाही.

अशा अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये रोज नव्या धैर्याने त्रुदो परिस्थितीला सामोरा जात आहे; पण जेवढा तो धीराने वागत आहे, तेवढी परिस्थिती हाताबाहेर जात आहे. त्यात दुष्काळात तेरावा महिना म्हणून त्याच्या सरकारच्या अखत्यारीत झालेली दोन भ्रष्टाचाराची आणि लाचलुचपतीची प्रकरणे चव्हाट्यावर आली आहेत. एकात तर एक कोटी डॉलर्सचा गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे. दक्षिण कोरिया आणि अर्जेंटिनाला विकण्यात आलेल्या अॅटोमिक रिअॅक्टर्सच्या व्यवहारातील हा संशयास्पद भाग आहे. त्यामुळे सामान्य माणूस सरकारवर नाखूष आहे.

भरीस भर म्हणून जगातच आलेल्या आर्थिक मंदीचा तडाखा कॅनडाला बसून किंमती वाढल्या आहेत, लिबरल पक्षाची प्रतिमा डागळली आहे.

अशा रीतीने आज ना उद्या जगाच्या ज्या ज्या भागात भिन्न भाषीय, भिन्न धर्मीय लोक राहतात त्या त्या भागात कॅनडातील या ज्वलंत प्रश्नाने सुप्त धोक्याचा इशारा दिलेला आहे. या गुंतागुंतीच्या व भावनेच्या दृष्टीने नाजूक प्रश्नात त्रुदो आणि त्याचे सरकार यशस्वी होते की रेने लेवेस्क क्युबेक बाजूला ओढण्यात यशस्वी होते हे पाहणे एतद्देशीयानाही अलिप्तपणाचे ठरू नये. □



# नक्षलवादाच्या शोधात

लेखांक चार

## तारकुंडे समितीचा स्फोटक अहवाल

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

तारकुंडे चौकशीसमिती ही काय चीन आहे याबद्दल विस्ताराने काही लिहिण्याची फारशी आवश्यकता नाही. कारण या समितीने दिलेला अहवाल आणि त्यानंतरचे राजकीय डावपेच बरेच गाजलेले आहेत. अर्थात राजकीय पातळीवर या अहवालाला महत्त्व प्राप्त झालेले असले तरी तो अहवाल नक्की आहे तरी काय याबद्दल महाराष्ट्रातच नव्हे तर बाहेरही प्रगाढ अज्ञान पसरलेले दिसते. त्याबद्दल हस्ते – परहस्ते मिळालेल्या त्रोटक बातम्या छापण्यापलीकडे वृत्तपत्रांनी फारसे काही केलेले नाही. अपुऱ्या राहिलेल्या त्या उत्सुकतेपोटीच हैदराबादमध्ये आम्ही हा अहवाल मिळविण्याची खटपट केली आणि तो यशस्वीही झाली. या समितीचे चार सदस्य हैदराबादमध्येच राहणारे असल्याने व त्यातील डॉ. बलवंत रेड्डी यांनी आस्थापूर्वक सहकार्य दिल्यानेच हे शक्य झाले. नक्षवादी चळवळ दडपून टाकण्यासाठी आंध्रप्रदेशच्या सरकारने गेली आठ–दहा वर्षे व विशेषतः आणीबाणीच्या काळात जे मार्ग अवलंबिले त्यांवर प्रकाशझोत टाकण्याचे महत्त्वाचे काम तारकुंडे समितीने चोख बजावले आहे. या समितीची वैधावैधता, तिच्या अहवालाची विश्वासार्हता या मुद्द्यांची चर्चा पुढे येईलच, तथापि त्यापूर्वी या अहवालाचा सविस्तर परिचय – सारांश देणे योग्य होईल.

आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, बिहार आणि ओरिसा वगैरे राज्यशासनांनी यापूर्वी अनेकदा काही नक्षलवादी चकमकीत ठार झाल्याचे वृत्तान्त प्रसिद्ध केलेले आहेत. आंध्रप्रदेशापुरते व आणीबाणीच्या काळापुरते बोलायचे तर ७७ माणसे अशा प्रकारे ठार झालेली आहेत. अर्थात ७७ हा आकडा कच्चा असून सरकारी निवेदन व पकडलेल्या नक्षलवाद्यांची कोर्टातली निवेदने यांच्या आधारे तो काढलेला आहे. तथापि हे ७७ जण सुद्धा खऱ्या चकमकीत ठार झालेले नसून त्याचे थंड डोक्याने खून करण्यात आलेले आहेत असा एक समज सर्वत्र पसरला आहे. सिटिझन्स फॉर डेमॉक्रसी या संस्थेचे अध्यक्ष श्री. जयप्रकाश नारायण यांच्या कानी ह्या बातम्या पडल्या

तेव्हा एप्रिल १९७७ मध्ये न्या. वि. म. तारकुंडे याच्या नेतृत्वाखाली एक समिती त्यांनी स्थापन केली. श्री. तारकुंडे याच्याखेरीज आठ सदस्याचा समावेश या समितीत होता आणि त्यातील चार सदस्य हैदराबादचे व एक वरंगळचे होते. ओरिसाचे सर्वोदयी नेते नभकृष्ण चौधरी हे यातले एक ठळक नाव. इतर ठळक नावे डॉ. बलवंत रेड्डी आणि अॅड्. कन्नबीरम् याची. यापैकी डॉ रेड्डी हे हैदराबादच्या नॅशनल अॅडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ ट्रेनिंग कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. त्यांच्याशी झालेल्या आमच्या भेटीचा वृत्तान्त पुढे येईलच. अॅड् कन्नबीरम हे वरिष्ठ न्यायालयातील एक कायदेपंडित आहेत आणि तारकुंडे अहवाल ज्यानी प्रत्यक्षात तयार केला त्या तुकडीत त्यांचा पुढाकार होता. यासंबंधीच्याच काही कामासाठी ते दिल्लीला गेलेले असल्याने आम्हाला भेटू शकले नाहीत. अरुण शौरी ( दिल्ली ), के. प्रताप रेड्डी ( हैदराबाद ), कालोजी नारायणराव ( वरंगळ ), एम् व्ही राममूर्ती ( हैदराबाद ) आणि सुप्रसिद्ध पत्रकार वी जी. वर्गिस ( दिल्ली ) हे तारकुंडे समितीचे इतर सदस्य होते.

आपल्या पहिल्या अहवालात समितीने तीन चकमकींसंबंधीचा पुरावा मांडला आहे. या तीन चकमकीत मिळून दहा नक्षलवादी ठार झाल्याचे वृत्त आहे. एकंदर पुराव्याची छाननी केल्यानंतर समितीची अशी खात्री पटली की तिनापैकी दोन चकमकी ज्यात प्रत्येकी चार नक्षलवाद्याचा बळी गेला या पूर्णपणे बनावट होत्या. ज्या तिसऱ्या चकमकीत दोघेजण ठार झाले त्या चकमकीविषयीचा अधिकृत वृत्तान्तही संशयास्पद आहे.

२४ जुलै १९७६ ची रात्र ते २५ जुलैची पहाट. मेडक जिल्ह्यातील गिरायपल्ली वनप्रदेशात पहिली चकमक झडली ती याच काळात. नोव्हेंबर ७६ मध्ये चिकलगुट्टाच्या जंगलात पकाल तलावाजवळ घडली ती दुसरी चकमक या चकमकीच्या बनावटपणाविषयी पुरेसा पुरावा समितीकडे आलेला आहे काही साक्षीदारानी समितीला सांगितले की, ' जे नक्षलवादी चकमकीत ठार झाल्याचा दावा केला जातो, त्याना प्रत्यक्षात त्याच्या घरातून पोलिसानी अटक करून नेल्याचे आम्ही पाहिले आहे. ' इतर काही साक्षीदारानी त्याना पोलिसकस्टडीतही ठेवलेले पाहिले आहे. पोलिसव्हॅनमध्ये त्यांच्याबरोबर असणारे काही साक्षीदारही आहेत. **गिरायपल्ली चकमक प्रकरणात तर एक ' आय् – विटनेसही ' समितीसमोर आला. पोलिसअधिकाऱ्यांनी जेथे या चौघांना गोळ्या घातल्या त्या ठिकाणापासून केवळ पन्नास फुटांच्या अंतरावरून लपून त्याने स्वतः तो प्रकार, तो खून पाहिला.** याखेरीज, मरणापूर्वी या नक्षलवाद्याचा छळ करण्याच्या पाशवी पद्धती पोलिसांनी अवलंबिल्या, त्यांचेही वर्णन साक्षीदारांनी केले आहे. या छळाचा प्रमुख उद्देश, ज्या ज्या गुन्ह्यात पोलीस त्याना गोवणार होते त्या गुन्ह्याचा कबुलीजबाब घेण्याचा असावा. तसेच इतर नक्षलवादीनेत्यांना त्या गुन्ह्यात गुंतवणाऱ्या साक्षी हातात सापडलेल्या नक्षलवाद्यानी द्याव्यात हाही हेतू होताच. या चकमकीमध्ये सापडलेल्या प्रेताची जरूर ती कायदेशीर चौकशी राज्यअधिकाऱ्यांनी केली नाही वस्तुत क्रिमिनल प्रोसिजर कोड १९७३, सेक्शन १७४ प्रमाणे त्याचे ते कर्तव्य होते. समितीसमोर आलेल्या सर्व साक्षीदाराचे नाव, पत्ते व त्याचे लेखी जबाब आणि या प्रकरणाशी संबध असलेल्या पोलिसअधिकाऱ्याची नावे समितीने केंद्रीय गृहमंत्र्याना स्वतत्रपणे सादर केली आहेत. या साक्षिदाराना पोलिसानी त्रास देऊ नये म्हणून त्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत.

आपल्या अहवालाच्या अखेरीस तारकुंडे समितीने पाच मागण्या केलेल्या आहेत. तारकुंडे समिती नेमण्याचा उद्देश काय आणि त्यातून साध्य काय झाले या प्रश्नाची उत्तरे मिळण्याच्या दृष्टीने या मागण्या येथे जशाच्या तशा उद्धृत करीत आहोत –

मागणी एक : केंद्रसरकारने या संबधात न्यायालयीत चौकशी-समिती नेमावी कमिशन्स ऑफ इनक्वायरी अॅक्ट ( १९५२ ) परिशिष्ट सात मधील याद्या १, २ वा ३ प्रमाणे अशी समिती नेमण्याचा केंद्राला अधिकार आहे. शिवाय ही घटना सार्वजनिक महत्वाची आहे आणि आंध्र राज्यसरकार हे यातील गुन्ह्यामध्ये गुतलेले असल्याने त्याने केलेली कोणतीही चौकशी नि.पक्षपाती असूच शकणार नाही.

मागणी दोन : ज्या पोलिसअधिकाऱ्यांचा हात या प्रकरणात आहे, त्यांच्याकडून या चौकशीत अडथळे येऊ नयेत यासाठी चौकशी संपेपर्यंत त्याना बडतर्फ करण्यात यावे.

मागणी तीन : केंद्रीय चौकशीसमितीनेही वरील चकमकी बनावट असल्याचा निर्णय दिला तर सबधित अधिकाऱ्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली खटले भरण्यात यावे.

मागणी चार : वरील हत्या हे जाणूनबुजून केलेले खून होते असे सिद्ध झाल्यास केवळ काही कनिष्ठ पोलिसअधिकाऱ्यावर ठपका ठेवून समाधान मानण्यात येऊ नये आपल्या खात्याच्या कारभाराला प्रत्येक मत्री जबाबदार असतो आणि मत्रिमंडळाचे कामकाज सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर चालते, ही दोन तत्त्वे येथे ध्यानात घेतली जावीत आंध्रचे मुख्य मत्री श्री. जे. वेंगल राव यानी ' आपण नक्षलवाद्याना साफ नाहीसे केल्याच्या ' घोषणा वारवार केल्या आहेत, त्याचेही विस्मरण होऊ नये.

मागणी पाच . चौकशीस मदत करणाऱ्या साक्षीदाराना धाकदपटशा दाखविण्याचा किंवा इजा करण्याचा प्रयत्न पोलिसाकडून होण्याची शक्यता गृहीत धरून केंद्रसरकारने साक्षीदाराना सरक्षणाची हमी द्यावी. गिरायपल्ली प्रकरणातील प्रत्यक्ष साक्षीदार (आय-विटनेस) श्री. भिक्षापती व आणखी एक महत्त्वाचे साक्षीदार श्री. यादव रेड्डी यांचे जीवित आत्ताच धोक्यात आहे. सध्या ते हैदराबादजवळ असलेल्या डॉ ओमप्रकाश गुप्तांच्या गांधी कस्तुरबा सेवा संघ आश्रमाच्या आश्रयाने राहत आहेत. त्यांना सुरक्षिततेचे आश्वासन लाभणे आवश्यक आहे.

न्यायालयीन चौकशीची मागणी करण्यास पुरेसा व भक्कम पुरावा आपण जमा केला आहे असा समितीला विश्वास वाटतो. अशा बनावट चकमकीत एकूण सत्याहत्तर नागरिक बळी गेले असल्याची बातमी मिळाली असून या सर्वांविषयी पुरावा गोळा करून तो अहवालरूपाने प्रसिद्ध करण्याचे समितीचे कार्य चालूच राहील. दरम्यान न्यायालयीन चौकशी सुरू झाली तर समिती

आपल्याजवळील सर्व पुरावा त्या समितीस सादर करील. नवी चौकशीसमिती स्थापन न झाल्यास तारकुंडे समिती आपले कामकाज चालूच ठेवील.

## गिरायपल्ली चकमक अशी झडली....

आणीबाणी जाहीर झाल्यानंतर नक्षलवाद्यांशी झडलेली ही पहिली चकमक. स्थळ : मेडक जिल्ह्यातील गिरायपल्ली जंगल. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांची नावे : जनार्दन राव, मुरली मोहन रेड्डी, सुधाकर व आनंदा राव. यापैकी जनार्दन राव हा वरंगळच्या रीजनल इंजिनिअरिंग कॉलेजचा (याचा उल्लेख नक्षलवाद्यांचे एक उगमस्थान म्हणून पूर्वी आलाच आहे.) विद्यार्थी होता. सगळेचजण अगदी कोवळे तरुण होते. वये पंधरा ते पचवीसच्या दरम्यान.

याच्या पार्श्वभूमीतली घटना अशी . २२ जून ७५ रोजी रात्री ८–३० वाजता कुणा एका दोन्थुलु अन्तैय्या नावाच्या माणसाचा त्याच्या सिरिसिंगंदला गावी खून झाला. मेडक जिल्ह्यातल्या सिद्दिपेट तालुक्यात हे गाव आहे. हा खून नक्षलवादी चळवळीतून घडून आला असावा अशा शंकेने पोलिसांनी शंभर गावकऱ्यांना कोठडी दाखविली. अखेर पोलिसकस्टडी अपुरी पडल्याने मुलुग फॉरेस्ट डाकबंगल्याचे रूपांतर कच्च्या तुरुंगात करण्यात आले.

या चौघा नक्षलवाद्यांपैकी जनार्दन राव हा १६ जुलै ७५ रोजी मुलुग पोलिसठाण्यात कैदेत होता असे पुरावा सांगतो. २० जुलै रोजी इतर तिघांना अटक करून तेथे आणण्यात आले. लॉकअपमध्ये त्यांना बेदम मारपीट करण्यात आली. रोज सकाळी त्यांना मुलुग फॉरेस्ट डाकबंगल्यात नेण्यात येत असे आणि तेथे अटकेत असलेल्या गावकऱ्यांनी याच चौघांना दोथुलु अन्तैय्याचे खुनी म्हणून ओळखावे अशी सक्ती केली जात असे. सर्व गावकऱ्यांनाही त्यासाठी भरपूर प्रसाद मिळत होताच. गावकऱ्यांचे हे हाल टळावेत म्हणून शेवटी या चौघांनी गुन्हा कबूल केल्याचे समजते. रोज रात्री या चौघांना पोलिसठाण्यात परत आणले जाई, तेव्हा त्यांना धड उभेही राहणे अशक्य होत असे आणि रक्तबंबाळ अवस्थेत ते वेदनांनी विव्हळत असत.

२४ जुलै ७५ रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मुलुग पोलिसस्टेशनमधले सर्व दिवे एकाएकी मालविले गेले. या चौघा नक्षलवाद्यांना पोलिसव्हॅनमध्ये कोंबून गिरायपल्ली जंगलात नेण्यात आले. त्यांना चार झाडांशी मानेपासून पायापर्यंत दोराने बांधण्यात आले आणि डोळ्यांवर पट्ट्या बांधण्यात आल्या. आंध्रप्रदेश राज्य पोलिसांच्या फर्स्ट बटॅलियनच्या सब-इन्स्पेक्टरला या चौघांना गोळ्या घालण्याचा हुकूम सुटला आणि त्याने तो मानण्यास नकार दिला असे दिसते. यावर सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस यांनी त्याला शिवीगाळ केली. अखेर गोळ्या घातल्या जाईपर्यंत हे तरुण घोषणा देत होते.

हे चार तरुण ॲडिशनल सेशन्स जज्ज श्री. संगारेड्डी यांच्यापुढे चाललेल्या सेशन्स जज्ज केस ३/१९७७ मध्ये आरोपी होते. त्यांना चकमकीत मृत्यू आल्याची वार्ता २६-२७ जुलैलाच वृत्तपत्रांना देण्यात आलेली असूनही, २२ ऑगस्ट ७५ रोजी न्या. श्री संगारेड्डी-समोर दाखल केलेल्या रिमांड रिपोर्टात हे आरोपी 'फरारी' असल्याचे सरकारी वकिलांनी म्हटले होते. कदाचित त्यांच्या टोपण नावामुळे हा घोटाळा झाला असेल. कारण जनार्दन राव हा गोपाल रेड्डी या नावाने, सुधाकर हा सुब्बाराव, आनंदा राव हा मल्ला रेड्डी आणि मुरली मोहन रेड्डी कृष्णा या नावानीही ओळखले जात होते !

गिरायपल्ली प्रकरणामध्ये आरोपीकडून खुनाचा कबुलीजबाब मिळविण्यासाठी पोलिसांनी छळाच्या अमानुष पद्धती अवलंबिल्याचे दिसून आले. चार-आठ पोलिसांनी कैद्याला घेरून लाथाबुक्क्यांनी तुडविणे, लाठ्यांनी झोडपणे, ठोसे लगावणे या नेहमीच्या मार्गांखेरीज काही नवे प्रकार शोधून काढण्यात आले. काही वेळा कैद्याला अपमानित करण्यासाठी पोलिस त्याच्या अंगभर थुंकत असत. याशिवाय पोलिसांमध्ये आवडती झालेली एक पद्धत अशी—माणसाला पालथा झोपवायचा, त्याच्या गुडघ्याखाली एक लाकडाचा ओंडका ठेवायचा आणि त्या लाकडाच्या विरुद्ध दिशेला त्याचे पाय वाकवायचे. इतके की, पायाचा सांधा निखळला पाहिजे. याच पद्धतीमधल्या एका उपप्रकारात माणसाला आडवा पाडून त्याच्या गुडघ्यांच्या खालून एक आणि वरून एक असे दोन समांतर ओंडके ठेवले जातात आणि त्यांच्या दोन टोकांवर दोन पोलिसकॉन्स्टेबल्स बसतात. हे कॉन्स्टेबल्स वजनदार असतील आणि ते थोड्या थोड्या वेळाने बदलले जातील याची काळजी घेतली जाते. परिणामी त्या दुर्दैवी माणसाचे पाय कायमचेही निकामी होऊ शकतात.

या पद्धतीपेक्षाही रानटी पण पोलिसांना कमीत कमी कष्टात जास्तीत जास्त मजा आणून देणारी एक सोपी आणि मुख्यतः स्वदेशी अशी छळाची पद्धत आंध्र पोलिसांनी या गिरायपल्ली प्रकरणातच नव्हे तर इतरही अनेक प्रकरणांत वापरली. यामध्ये कैद्याच्या पॅंटमध्ये सरडे, पाली वगैरे लहानसहान प्राणी सोडून पॅंटचा तळ आवळून बंद केला जाई. अपेक्षेप्रमाणेच, हे घाबरलेले प्राणी कैद्याच्या मांड्या पाय वगैरे चावून, कुरतडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत. वरवर साध्या-सोप्या दिसणाऱ्या या युक्तीने भरपूर रक्तपात होत असे.

'चिलकलगुट्टा चकमकीची हकीकत . चिलकलगुट्टाच्या जंगलात घडलेल्या या चकमकीतही चार व्यक्ती ठार झाल्याचे सांगितले जाते. श्री. पी. रामनरसय्या, जानकी रामिरेड्डी, उर्फ जानी रेड्डी, नारायण आणि श्रीहरी. यापैकी पी रामनरसय्या हा नक्षलवाद्यांच्या त्या वेळच्या लढाऊ नेत्यांपैकी एक हैदराबादमध्ये तो बराच काळ लपूनछपून राहत असल्याचे सांगितले जाते. २३ जून ७६ रोजी जुन्या मलकापेट भागातील १६–९–४०२ क्रमांकाचे घर त्याने भाड्याने घेतले (साक्षीदारांनी हे घर त्याचे म्हणून ओळखले आहे. घराची छायाचित्रेही घेण्यात आली आहेत.) ३० ऑक्टोबर ७६ म्हणजे चार महिने येथे राहिल्यानंतर ३१ ऑक्टोबर ७६ रोजी पहाटे त्याच्या मागावर असलेल्या पोलिसांनी या घराला वेढा घातला आणि पी रामनरसय्यासमवेत वर उल्लेखिलेल्या तिघांनाही अटक केली. हे वृत्त पसरू नये म्हणून ताडपत्रीने झाकलेल्या बंद गाडीतून त्यांना चिलकलगुट्टाच्या जंगलात पकाला तलावाजवळ नेण्यात आले. हा प्रवास नरसमपेट तालुक्यातील अशोकनगरम व कोठागुडम गावामधून झाला आणि त्या सर्व काळात हे चौघेजण घोषणा देत

होतेच, शिवाय आपली नावे सांगून आपल्याला ठार मारण्यासाठी चालविले असल्याची ओरडही करीत होते. अशोकनगरममधल्या गावकऱ्यानी हा आरडाओरडा ऐकल्याचे सांगितले. कोठागुडममध्ये पोलिसानी या चौघाची प्रेते पुरण्यासाठी/जाळण्यासाठी लाकडे व इतर साहित्य मागितले. हा सर्व पुरावा सादर करण्यास हे गावकरी संरक्षण मिळाले तर तयार आहेत अशी साक्ष आंध्रचे एक कम्युनिस्ट (मार्क्सिस्ट) आमदार श्री. एम. ओंकार यांनी तारकुंडे कमिशनसमोर दिली. श्री. ओंकार म्हणतात की, एकट्या नरसमपेट तालुक्यातच आणीबाणीच्या काळात सुमारे दहा पोलिसठाणी होती. मृतांपैकी एक, जानकी रामिरेड्डी याच्या आईने सांगितले की, आपला मुलगा 'चकमकीत' मारला गेल्याची बातमी तिला त्याच्या मृत्यूनंतर दहा दिवसांनी समजली. ती सुतक व इतर अंत्यसंस्कार करीत आहे असे कळताच इस्थलापुरम या तिच्या गावी सूर्यपेटचे पोलिस हजर झाले आणि मुलाच्या मृत्यूची बातमी तिला कशी कळली हे जाणून घेण्यासाठी त्यानी प्रश्नाचा भडिमार केला. या चौघाची बोटे छाटण्यात आलेली होती व गोळ्यानी त्याच्या शरीराची चाळण झालेली होती असे तिला कळले.

यल्लंडु जंगलातील ती प्रेते. नोव्हेंबर १९७५ मध्ये यल्लडु जंगलात झडलेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले, तथापि त्याची ओळख पटू शकली नाही, असे अधिकृत वृत्तात सांगतो. अनधिकृत सूत्राकडून समजलेली त्या दोघांची नावे, नीलम रामचंद्रय्या व जे. चद्रशेखर प्रसाद अशी आहेत.

या प्रकरणात हाती आलेला पुरावा असा. हे दोघेही ३ नोव्हेंबर ७५ ला गुटूर येथे दिसले होते. संबधित इसमाला, आपण विजययाडयाला जाण्यासाठी निघत आहोत, आणि ५ नोव्हेंबरला आपण तेथे दाखल होऊ असे त्यानी सांगितले. ४ नोव्हेंबरला सायंकाळी ६–३० वाजता विजयवाडा येथे ते एका इसमाला भेटले. या सर्व काळात त्याच्याकडे कोणतीही शस्त्रे नव्हती असे साक्षीदार सागतात. विजयवाड्याहून यल्लंडू जगल सुमारे सव्वाशे किलोमीटर्स दूर आहे आणि या दोहोंमध्ये दळणवळणाचा काहीही थेट संपर्क नसताना ५ नोव्हेंबरला यल्लडूच्या जगलात चकमक कशी घडू शकली हे गूढ एक पोलिसच जाणोत. बारा तासात या दोघानी पायी चालून सव्वाशे कि. मी. चे अंतर कापले आणि जगलात नि शस्त्रस्थितीत पोलिसाशी लढत दिली, यावर विश्वास कसा ठेवायचा ?

या दोघापैकी प्रसाद हा इजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला शिकत होता. दुसऱ्या लेखाकात त्याचा उल्लेख आलाच आहे. प्रोग्रेसिव्ह डेमोक्रॅटिक स्टूडन्टस् युनियनचा तो प्रमुख नेता आणि ही युनियन व नक्षलवादी नेता चद्रपुला रेड्डी याच्यातला तो एकमेव दुवा होता असे सांगितले जाते. नीलम रामचद्रय्या हे माजी आमदार असल्याने आंध्र विधिमंडळाच्या १९७६ च्या उन्हाळी अधिवेशनात त्याना श्रद्धांजली वाहण्याचा प्रसंग आला. विशेष म्हणजे सर्व विरोधी पक्षसदस्याच्या अनुपस्थितीत, कॉंग्रेसच्या नेत्यानेच हा ठराव मांडला. अर्थात रामचंद्रय्याच्या मृत्यूची पार्श्वभूमी मात्र त्या ठरावात उल्लेखिलेली नव्हती, नसणेच अपेक्षित होते.

यल्लडूच्या जंगलात चकमकीत ठार झालेल्या त्या दोघा निनावी मृताची गोष्ट ही अशी आहे

तारकुंडे आयोगाच्या अहवालाच्या दुसऱ्या भागात गुंटूर जिल्ह्यातील नऊ नक्षलवाद्याच्या हत्याचा तपास केलेला आहे. ज्या चकमकीत ते मारले गेले त्या पूर्णपणे बनावट होत्या, त्याचा भयानक शारीरिक छळ करून नंतर गोळ्या घालण्यात आल्या आणि कोणतीही जाहीर चौकशी या पंचनामा न करता मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली याबद्दल आयोगाची खात्री पटली आहे. अशा प्रकारचे 'खून' करणे हे आंध्रप्रदेश सरकारचे अधिकृत धोरणच झालेले असावे अशी शंका, मिळालेल्या नव्या पुराव्यामुळे निर्माण झाली आहे. आजपर्यंत या आयोगाने ज्या खूनप्रकरणाचा तपास केला आहे, त्यावरून अशी कृत्ये पोलिस स्वतःच्या हिंमतीवर करतील असे वाटत नाही तावडीत सापडलेल्या गुन्हेगाराना पोलिस मारहाण करतात, हा नित्याचाच प्रकार आहे. परंतु 'वरून' भक्कम पाठिंबा मिळाल्याखेरीज ते डझनवारी नागरिकाचे मुडदे पाडतील असे वाटत नाही. अशा प्रकारे केवळ संशयावरून नागरिकांना 'निकालात काढण्याची' व त्या प्रकरणात दोषी ठरलेल्याना सरक्षण देण्याची हिंमत यापुढे कोणत्याही सरकारला होऊ नये यासाठी या प्रकरणाची निःसंदिग्ध व परखड चौकशी होणे आवश्यक आहे. दरम्यानच्या काळात आंध्रप्रदेशचे काही वरिष्ठ अधिकारी पुरावे नष्ट करणे व साक्षीदाराना धमकाविणे, त्रास देणे अशा मार्गांनी चौकशीच्या कामात अडथळे निर्माण करीत आहेत अशी गभीर माहिती आयोगाच्या सदस्याना मिळाली आहे. या कारवाया थांबविण्याची मागणी आयोगाच्या दुसऱ्या अहवालात केली आहे.

### गुंटूरचे हत्याकांड

तारकुंडे चौकशी आयोगाच्या सदस्यानी गुंटूर, चिलकलुरिपेट, दाचिपल्ली, मचेरला, कावली व चेबूरू येथे २७ मे ते ३१ मे ७७ रोजी प्रत्यक्ष जाऊन जमा केलेला पुरावा सागतो, की गुटूर जिल्ह्यातील नऊ मृत्यू हा चेरुकुपल्ली पोलिसस्टेशनवर पडलेल्या धाडीचाच एक पर्यवसायी भाग होता.

हे चेरुकुपल्ली प्रकरण काय आहे ?

२१ मे १९७५ च्या पहाटे दोन वाजता गुंटूर जिल्ह्यातील चेरुकुपल्ली पोलिसस्टेशनवर धाड पडली हा हल्ला नक्षलवाद्यानी केला अशी खात्री पटून पोलिसानी आसपासच्या गावात दहशतीचे राज्य सुरू केले. हरिजनवस्ती बहुसख्य असलेल्या त्या खेड्यातील नागरिकांना गुराढोराप्रमाणे पाठलाग करून झोडपण्यात आले. घरे उध्वस्त झाल्याने व धान्य / पिके मातीला मिळाल्याने घाबरलेले शेकडो हरिजन गावे सोडून पळून गेले.

सुमारे डझनभर लोकांना संशयित हल्लेखोर नक्षलवादी म्हणून अटक करण्यात आली. ह्याच्यावरचा खटला एकीकडे रेंगाळत

**असे 'खून' करणे आंध्र प्रदेश सरकारचे अधिकृत धोरणच असावे अशी शंका येते.**

असतानाच सहा आरोपी चकमकीच्या निमित्ताने काळाच्या पडद्याआड गेले आहेत. उरलेल्या पाच सशयितांना, त्यांच्यावर आरोपपत्र दाखल केलेले नसतानाही, 'वरच्या' कोर्टात धाडून देण्यात आले आहे. 'नक्षलवाद्यांची घातपाती कृत्ये छुपी व गनिमी काव्याची असतात, त्यामुळे त्यांच्यावर खटला भरणे कठीण जाते, भरलेले खटले रेंगाळतात, कारण साक्षीपुरावाच .उपलब्ध होत नाही,' अशी तक्रार याबाबत सरकारपक्षातर्फे केली जाते; पण चेरुकुपल्ली खटल्यात तर सरकारपक्षाच्या साक्षीदारांची सख्या तब्बल ९२ आहे. तेव्हा या खटल्यातल्या आरोपींना खटल्याचा निकाल लागण्यापूर्वीच निकालात काढण्याची जरुरी का भासावी ?

'सेशन कमिट' झालेले ते सहा आरोपी—१. अठ्ठुलुरि मल्लिकार्जुन राव २. बी. जया राव ३. रेगलगड्डा सत्यानदम् ४. रत्नम् सूर्य वर्मा ५. कम्मा सुकण्णा ६. इन्टा कृष्णा रेड्डी. यातल्या पहिल्या चौघाच्या मृत्यूची हकीकत पुढे दिलेली आहे. कम्मा सुकण्णा व इन्टा कृष्णा रेड्डी यांच्या निधनाचा तपशील गोळा करण्याचे काम अजून पूर्ण झालेले नाही. ह्याच्याशिवाय शेख सुभानी, कोटय्या आणि आणखी दोघेजणही चकमकीत मारले गेले आहेत. म्हणजे तसे जाहीर झालेले आहे.

चेरुकुपल्ली छाप्याबद्दल पहिली अटक झाली ती ए. मल्लिकार्जुन राव याला. ३ जून १९७५ रोजी सकाळी सहा वाजता. अनतपूरला ज्या खोलीत तो इतर दोघा मित्रांसह राहत होता तेथेच पोलिस आले आणि 'हात वर करून बाहेर या!' असा हुकूम त्याना सोडला. मल्लिकार्जुनराव याला वेगळ्या गाडीतून अज्ञात ठिकाणी नेण्यात आले आणि इतर दोघांना अनंतपूर शहर पोलिसचौकी क्र. २ येथे नेण्यात आले. तीन दिवसानंतर पोलिसानी त्या दोघाना वृत्तपत्रातली एक बातमी दाखविली. 'साडेपाच फूट उचीचा आणि चेहऱ्यावर देवीचे वण असलेला एक अज्ञात इसम चकमकीत ठार झाला,' असे त्या बातमीत म्हटले होते व 'तुमचीही हीच गत करू,' अशी धमकीही पोलिसानी त्या दोघांना दिली. मयताच्या वर्णनावरून आणि या धमकीवरून तो ए. मल्लिकार्जुन रावच होता, असे त्या दोघानी सहज ओळखले.

आरोपी क्र. दोन बी. जया राव याच्या अटकेची हकीकत तर अतिशय नाट्यपूर्ण आहे. सप्टेंबर १९७५ मध्ये एका दुपारी एकच्या सुमाराला आदम व प्रसाद हे दाचिपल्ली पोलिसठाण्याचे दोन कॉन्स्टेबल्स गुंटूर—माचेर्ला बसमधून दाचिपल्ली बसस्टँडवर उतरले. अगात फक्त बनियन आणि अर्धी चड्डी घातलेला एक कैदी—त्याचे हात पाठीमागे नेऊन बाधलेले होते—त्यांच्या ताब्यात होता. 'मी बी. जया राव आहे आणि चेरुकुपल्ली खटल्याच्या संबधात तुम्मलचेरुवु येथे मला पकडलेले आहे!' असा आरडाओरडा कैदी सतत करीत होता. कॉन्स्टेबलसनी त्याला मारहाण करीत दाचिपल्ली पोलिसठाण्याकडे हाकलत न्यायला सुरुवात केली, तेव्हा त्याने माओवादी घोषणा द्यायला प्रारभ केला. बसस्टँडवरील अनेक लोकांनी हा प्रकार पाहिला आणि ऐकला. सिव्हिल लिबर्टीज कमिटी (नागरी स्वातंत्र्य सरक्षण समिती) च्या स्थानिक सभासदानी, पोलिस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी व गुंटूर—गुरजालाच्या तहसीलदारांना ताबडतोब तारा करून हा प्रकार कळविला.

तीन दिवसांनंतरच्या वृत्तपत्रात नेहमीप्रमाणेच बातमी आली—'बी. जया राव आणि आणखी एकजण गुंटूरपासून ३० कि. मी. अंतरावर असलेल्या कोटप्पाकोंडा गावाजवळ झडलेल्या चकमकीत ठार झाले!'

हा आणखी एकजण कोण असावा ?

६ सप्टेंबर १९७५ ला पार्क सेंटर, माचेर्ला येथील एका पानाच्या दुकानात सिगरेटस् खरीदणाऱ्या एका इसमाला, श्रीसेलमहून आलेल्या दोघा कॉन्स्टेबलसनी धरले. या वेळी झालेल्या झगड्यात त्या इसमाने सुब्रह्मण्यम नावाच्या एका कॉन्स्टेबलला चाकूने भोकसले. सुब्रह्मण्यमने 'गुड, मवाली' असा ओरडा केल्याने जमावापैकी काहीनी भोसकणाऱ्या इसमाला पकडले 'मी गुड नाही, कम्युनिस्ट आहे!' असे ओरडून तो आपले नाव कोटय्या असे सागत होता. तथापि त्याला पकडून ठाण्यात नेण्यात आले व सुब्रह्मण्यमला दाचिपल्लीच्या सरकारी रुग्णालयात उपचारार्थ नेण्यात आले. काही दिवसानी कोटय्या चकमकीत मारला गेल्याची बातमी वर्तमानपत्रात आली. त्यानंतर त्या पानाच्या ठेल्याच्या मालकाला कोटय्याचा एक फोटो दाखवून पोलिसानी त्याची एका कागदावर सही घेतली.

तुम्मलचेरुवूला पकडल्या गेलेल्या बी. जया रावबरोबर कोटप्पाकोंडा येथे मारला गेलेला तो दुसरा इसम म्हणजे माचेर्ला येथे पकडला गेलेला कोटय्याच असावा असे आतापर्यंतचा पुरावा सागतो.

चेरुकुपल्ली खटल्यातील तिसरा आरोपी रेगुलगड्डा सत्यानंदम् याची आणि त्याच्या कुटुबाची कहाणी तर अॅम्नेस्टी इटरनॅशनलने ताबडतोब लक्ष घालावे इतकी हृदयद्रावक आहे. १३ जानेवारी १९७६ ला आर. सत्यानदम् वय वर्षे पन्नास, त्याची बायको आणि दीड वर्षाचे मूल याना कोपर्ती येथे अटक करून बिम्मापुरमपर्यंत चालवीत नेण्यात आले. तेथून पोलिसव्हॅनमधून त्याना बापटला शहर पोलिसचौकी क्र. दोन येथे नेण्यात आले. व्हॅनमध्ये सत्यानदमचा मेव्हणा व आई हेही बसलेले होते. त्याचे पाय अतिशय सुजले होते आणि ठणक्यामुळे ते कण्हतहो होते. पोलिसचौकीत आणल्यापासून दोन दिवसपर्यंत, सत्यानदम् व त्याची पत्नी याना एकमेकासमोरच गुरासारखे झोडपण्यात आले. एका क्षणी तर फारच खवळलेल्या एका पोलिसअधिकाऱ्याने सत्यानदमचे दीड वर्षाचे मूल आईच्या हातातून हिसकावून घेतले. जमिनीवर फेकले आणि पायाखाली तुडविले. तिसऱ्या दिवशी सत्यानदमचे पाय कमालमर्यादेपर्यंत सुजल्यामुळे आणखी मारहाण करणे अशक्य झाले, तेव्हा त्याच्या पत्नीला गरम पाण्याने ते शेकण्यास सागण्यात आले.

१५ जानेवारी ७६ रोजी श्रीमती सत्यानदम् याना घरून आर. सत्यानदमसाठी कपडे आणण्यास सागण्यात आले. कारण त्याचे आधीचे कपडे रक्ताने भरले होते. गावी जाऊन कपडे घेऊन परत येण्यास तिला १७ जानेवारी उजाडला. कपडे ठेवून घेऊन पोलिसानी तिला लगेचच घरी पाठविले. हाती आलेल्या पुराव्यानुसार, कपडे आणण्यास सागणे ही केवळ बाईंना बाजूला करण्यासाठी सबब होती. सत्यानदमला, ती कपडे आणण्यास गेल्यानंतर ताबडतोब हलविण्यात आले होते आणि १५ किंवा १६ जानेवारीलाच रात्री, एका बनावट चकमकीत ठार मारण्यात आले होते.

अर्थात एवढ्या छळानतर आणखी छळण्याऐवजी गोळी घालून

त्यानी सत्यानंदमवर एका परीने उपकारच केले असे म्हटले पाहिजे. ' मर्सी डेथ 'ची तेलगू तऱ्हा ती हीच.

सत्यानंदम् प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही.

१९ जानेवारी ७६ रोजी श्रीमती सत्यानंदम् यांना पुन्हा अटक करण्यात आली. लॉकमध्ये चाळीस दिवस पूर्वीप्रमाणेच त्यांचा छळ करण्यात आला. अनेक दिवस पुरेशा अन्नपाण्याशिवाय काढावे लागले. उपास व छळ यांमुळे त्याना नीट चालताही येईना. भ्रमिष्टपणा आला. तेव्हा पोण्णूर पोलिसठाण्यात नेऊन त्यांना आणखी पाच महिने कैदेत ठेवण्यात आले.

पतिपाठोपाठ त्यांनाही दया दाखविण्यात आली नाही, हे विशेषच!

रत्नम सूर्य वर्मा आणि इतरेजन : २१ एप्रिल १९७६ रोजी प्रकाशम जिल्ह्यातील कुडिपडू गावात सहा पोलिस जीपमधून येऊन उतरले. तेथून ते कामम खेड्यात गेले. सकाळी ७–३० च्या सुमारास ते परत निघाले तेव्हा चार–पाचजण गावाकडे येताना त्याना दिसले. बऱ्याच पाठलागानंतर रामा राव व मलकोंडय्या यांना गावाजवळ पकडण्यात आले. रत्नम् सूर्य वर्मा, रामकृष्ण व बेंजामिन याना गावापासून पाच फर्लांगावर पाठलागानंतर पकडण्यात आले. एक दिवस अडकी पोलिसचौकीत अटकेत ठेवल्यानंतर त्यांना ओंगोल येथील पोलिस महानिरीक्षकाच्या कचेरीत नेण्यात आले.

२४ एप्रिल ७६ ला कंडुकूर तालुक्यातील चेवुरु गावापासून मैलभर अंतरावर असलेल्या झुडपाच्या रानात रेल्वे लेव्हल क्रॉसिंगजवळ पोलिसांच्या गाड्या उभ्या असलेल्या गावकऱ्यांनी पाहिल्या. आसपास सुमारे शंभर पोलिस पहाऱ्यावर होते. गावकऱ्याना जवळपास फिरकण्यास मनाई करण्यात आली. ' जंगलाच्या उत्तरभागात पोलिसाना गोळीबार करावा लागला ! ' असा संदेश पाठविण्यात आला व कंडुकूर तहसीलदाराला बोलावून घेण्यात आले. चेवुरुच्या मुन्सफाकरवी गावकामगाराना बोलाविण्यात आले. सात गावकामगार पोलिसव्हॅनमधून नेमलगुटा येथे गेले आणि पोलिसानी दाखविलेली चार प्रेते पुरण्याचे काम सहा–सहा रुपये मजुरीवर त्यानी केले. २६ एप्रिलला व त्यानंतर आणखी एकदा चेवुरुच्या मुन्सफ व इतरांना सिंगरायकोंडा पोलिसस्टेशनवर बोलावून बनावट पंचनाम्यावर व पोस्टमार्टम–रिपोर्टवर त्यांच्या सह्या घेण्यात आल्या.

नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रात चौघेजण चकमकीत मेल्याची बातमी आलीच. रत्नम् सूर्य वर्मा त्यातच होता. प्रत्यक्षात शंभर पोलिसांच्या पहाऱ्यात झुडपाच्या आश्रयाने त्याना गोळ्या घालण्यात आल्या होत्या.

अर्थात खरे पाहता एवढ्या पहाऱ्याची काहीच जरूर नव्हती. तीन दिवसाच्या अटकेनंतर नेमलगुटाला गोळ्या घालण्यापूर्वी रत्नम् सूर्य वर्मा आणि इतरेजनाना अगदी पळून जाण्याची संधी दिली असती तरी ते पळून जाऊ शकले नसते.

कारण पोलिसाच्या लाठ्यांनी त्याचे पाय अगोदरच ठिकठिकाणी मोडून टाकले होते.

□

## डॉ. बलवंत रेड्डींची मुलाखत

तारकुंडेसमितीच्या अहवालातील अमानुष घटनांचा प्रत्यक्ष अभ्यास केल्यानंतर याच अहवालाच्या निर्मितीसाठी ज्यानी मनापासून परिश्रम घेतले त्या डॉ. बलवन्त रेड्डीची मुलाखत या संपूर्ण अहवालाचा वस्तुनिष्ठ पाया कोणता हे दाखवून देणारी ठरते.

सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे, की जो रंग या अहवालाला चढविण्यात येत आहे तो ही चौकशी करताना अभिप्रेत नव्हता. चौकशीसमितीचा कोणताही सभासद नक्षलवादाला अनुकूल आहेच असे नाही स्वतः डॉ. बलवन्त रेड्डी यांच्या मते चुकीचे वळण लागलेली ही एक प्रामाणिक चळवळ आहे. नक्षलवाद्याबद्दल सहानुभूती ही नक्षलवादाच्या मान्यतेतून जन्मलेली नाही. संपूर्ण मानवतावादी दृष्टिकोनातून तिचा उगम झालेला आहे. कायदा गुन्हेगारांना शासन करण्यास पूर्ण समर्थ असताना पोलिसानी कायदाबाह्य साधने स्वीकारणे केवळ अनैतिकच नव्हे तर सुरक्षितरीत्या धोकादायकच आहे अर्थात केवळ स्वतःच्या पायावर पोलिस असा धोका पत्करत नाहीत हे बहुचर्चित राजन् केसवरून स्पष्टच आहे रस्त्यावरच्या भाजीवाल्याकडून भाजी हवी असली तरी पोलिस दमदाटी करून ती घेतो आणि त्याच्या उपद्रवशक्तीची पूर्ण कल्पना असल्याने वर्षानुवर्षे भाजीवाला ते सहन करतो. यामध्ये पोलिसखात्याच्या अवैध मार्गांचे मूळ आहे. तेव्हा, नक्षलवादीच नव्हे तर उद्या कोणत्याही पक्षाचा, किंबहुना कोणताही गुन्हा केलेला आरोपी तुरुंगात असताना पोलिसाकडून त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये आजतागायत आरोपी सत्तारूढ पक्षाच्या विरुद्ध, त्यातही हिंसाचारी म्हणून गणला गेलेला असला, की पोलिसाचे राज्य अबाधित असे या उफाळलेल्या वारूला कायद्याचा लगाम घातल्याखेरीज तो जागेवर येणार नाही. ही कायद्याच्या बडग्याची अपरिहार्यता लक्षात आल्यावरच ज्या लोकाना अशा प्रकारे अमानुष हल्लांना तोंड द्यावे लागले त्याना काय परिस्थितीतून जावे लागले व बऱ्याच प्रसंगी प्राणाना मुकावे लागले हे सत्यदर्शन या खात्याचा अनिर्बंध संचार थांबविण्यासाठी आवश्यक ठरले परत एकदा रक्तपिपासूपणाची प्रवृत्ती कायद्याच्या रक्षकानाच जडली की हाती असणाऱ्या अधिकाराचा सदुपयोग होणे दुरापास्तच. म्हणून कोणत्याही निष्ठेचा आरोपी जरी तुरुंगात कितीही गंभीर गुन्ह्याखाली पकडला गेला, तरी त्याचा पोलिसानी आपल्या अखत्यारीत कायद्याच्या चाकोरीबाहेर जाऊन काही आगतुक पाहुणचार करू नये यासाठी ' संपूर्ण मानवतावादी भूमिकेतून ' या कमिशनचा जन्म झाला. असे आरोपी अर्थातच नक्षलवादी मोठ्या प्रमाणात होते. कारण कायदा आणि सुव्यवस्था याच्या पालनासाठी पोलिसांनी त्यानाच गेली दहा वर्षे वेठीला धरले आहे. म्हणून या कमिशनने त्यातही आपले क्षेत्र मर्यादित करून फक्त आणीबाणीच्या काळातील पोलिसांनी केलेले खून यावर लक्ष केंद्रित केले.

ही झाली कमिशनच्या स्थापनेची भूमिका. दुसरा महत्त्वाचा प्रश्न हे लोक आज का जागे झाले ? जर १९६७ पासून याच्या मते हे अत्याचार अस्खलितपणे चालू आहेत तर इतकी वर्षे त्याविरुद्ध

## ' चुकीचे वळण लागलेली एक प्रामाणिक चळवळ '–डॉ. बलवन्त रेड्डी.

आवाज का उठविला नाही? ज्या अर्थी आज केंद्रस्थानी विपक्षाचे सरकार आलेले आहे आणि आन्ध्रमध्ये कॉंग्रेस अजून जबरदस्त आहे त्या अर्थी हा केवळ सरकारला बदनाम करण्याचा नवा डाव आहे. यावर बलवन्त रेड्डीचे उत्तर बरेच अस्वस्थ करणारे आहे त्याच्या मते जेव्हा सत्तारूढ पक्ष ( कॉंग्रेस ) आणि पोलिस हे संगनमताने ( जे वेंगल राव व विजय रामराव ) शातपणे क्रौर्याची परिसीमा गाठतात, किंवा दुसऱ्या शब्दात, अलिप्त समजले जाणारे पोलिस-खाते जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाच्या आहारी जाऊन त्या भरात विपक्षाना चिरडण्याचे कार्य जरुरीहून अधिक उत्साहाने करते, तेव्हा या साऱ्या प्रकाराला एक राजकीय मिती लाभणे अटळ आहे. म्हणजेच, त्याच्या मते हे कमिशन राजकीय दृष्टचा काही पूर्वग्रहावर आधारित आहे ह्या आरोपात बराच तथ्यांश आहे. ' जेव्हा सपूर्ण राजकारणाच्या पटावरच्या खेळाची नीतिमत्ताच आव्हान देण्याइतकी भ्रष्ट होते तेव्हा, असे आव्हान देणाऱ्याचे राजकीय पूर्वग्रह याबाबतीत थोडाफार पण निश्चित स्वरूपाचा परिणाम करणारच. '

या उत्तरावर भाष्य करण्याची जरुरी नाहीच.

तिसरा मुद्दा या कमिशनच्या तथाकथित ' स्फोटक ' प्रकाशनानंतरचा. महाराष्ट्रात या प्रकाराने हा अहवाल कोणी नीट पाहिलाही नसताना, महाराष्ट्रीय वैशिष्टचानेच त्यावर गदारोळ माजले. अग्रलेख, वर्तमानपत्रात वाचकाची पत्रे वगैरे वगैरे. प्रत्यक्ष हा प्रकार जिथे घडला किंवा ज्या हैदराबादेत या कमिशनचे चार सदस्य आहेत, त्या हैदराबादेत, आध्र सोडाच, चिटपाखरानेही याची दखल घेतलेली नाही. कोठेही निषेधसभा झालेली नाही, कोठेही वर्तमान सरकारविरुद्ध मिरवणुका निघालेल्या नाहीत. स्थानिक वृत्तपत्रात सपादकाला पत्र हा सर्वांत षढ उपायही कोणी अवलंबिलेला नाही. लोकांची जागृती एवढी नीचतम स्तराला पोचलेली आहे आणि ज्या अल्पसख्य लोकाना त्या अहवालाचे गाभीर्य कळलेले आहे, ते दहशतीने गप्प आहेत; पण इथे ज्या प्रमाणात त्या अहवालाचे पडसाद उमटले त्याच्या एकसहस्रांश सुद्धा तिथे अस्वस्थता नाही आणि याच गोष्टीची खत या सर्व सभासदाना वाटत आहे २८ जूनला या अहवालाच्या संदर्भात सरकारचा निषेध म्हणून एक मिरवणूक शहरभर काढून तिचे सभेत रूपातर करण्याची कल्पना होती; पण पधरा ते वीस लाख लोकसख्या असणाऱ्या हैदराबादेत या सभेला जेमतेम पाच-सहा हजार लोक जमतील असा स्वत: बलवन्त रेड्डी यानीच अदाज व्यक्त केला.

हे दुर्लक्ष कमीच म्हणून ज्या खेड्यातले नक्षलवादी मारले गेले आहेत, त्यातल्या एखाद्या खेड्यात जर आज चौकशी केली, तर ( दहशतीपासून अभय देऊन सुद्धा ) त्याचे अगदी जवळचे नातलग व प्रसगाचे साक्षीदार सोडले तर इतराना हा इसम नक्षलवादी होता हेही माहीत नसल्याचे, त्याना अहवालासाठी खेड्यात हिंडत असता आढळून आले. मग ते नक्षलवादी कसे मारले गेले आणि त्या बेकायदेशीर घटनाची चौकशी करून काहीएक उपाययोजना त्या विरुद्ध या अहवालाच्या रूपाने केली जाते आहे, हे माहीत असणे दूरच राहिले.

याच एकमेव कारणास्तव, लोकाच्या पूर्ण उदासीनतेमुळे प्रथम या दोन अहवालानंतर लगेच तिसरा अहवाल करायला घेण्याची कल्पना लावणीवर पडली आहे. ' यापेक्षा लोकशिक्षण सुरू करावे अशा विचाराप्रत आम्ही आलो आहोत. ' असा निराशावादी सूर त्याच्या बोलण्यात दिसला.

ही चळवळ रुजण्याबाबतचा आणखी प्रश्न विचारला असता त्यानी ' लोकांना तो माणूसच ( नक्षलवादी ) जर माहीत नसतो, तर तो कोणासाठी लढला, कोणासाठी मेला हे माहीत असणे अशक्यच ' असे सागितले. शिवाय ' कोणते सरकार इतका काल लोकाचा पाठिंबा असल्याखेरीज टिकू शकेल ? ' असाही प्रश्न केला. हाच प्रश्न सरकारी भूमिकेतूनही केला गेला होता. त्याची सविस्तर चर्चा पुढे येईलच; पण, डॉ. बलवन्त रेड्डी याच्यासारखा बऱ्याच प्रमाणात अलिप्त राहू शकणारा माणूस जेव्हा हे मत देतो, तेव्हा ते विचारणीय ठरते.

लोकमताची या अहवालाबाबत ही तऱ्हा, मग ज्याच्याविरुद्ध हे सर्व मुद्दे आहेत, ते राज्यसरकार अहवालाला केंद्राची टोपली दाखवील याबाबत या कमिशनच्या सभासदानाही शका नाही. जोपर्यंत वेंगल रावचे सरकार अस्तित्वात आहे तोपर्यंत याबाबतीत कोणताही न्याय्य निर्णय अपेक्षिणे मूर्खपणाचे लक्षण ठरेल. जो स्वतःच आरोपी आहे तो स्वत.वरचा आरोप सिद्ध करील हे असंभाव्य आहे. याच सदर्भात वेंगल राव यांनी नेमलेल्या भार्गवकमिशनच्या फार्सचा त्यानी उल्लेख केला.

## भार्गव कमिशन

या भार्गव कमिशनच्या बाबतीतही पडद्यामागच्या घटना त्रस्त करणाऱ्या आहेत. तारकुंडे कमिशनच्या सभासदाची मागणी केंद्रीय आयोग नेमावा अशी होती. त्यानुसार वेंगल राव व त्याचे मत्रिमंडळ याच्याविरुद्धच्या आरोपाची चौकशी करणाऱ्या सी. बी. आय्.कडेच हे प्रकरण सोपविण्याची व्यवस्था करण्यात आली, पण यानतर लगेच १६ जून १९७७ ला गुरुवारी चरणसिंगांनी लोकसभेत याबाबतीत चौकशी करण्यासाठी मुख्य मत्र्यानी कमिशन नेमावे अशी विनती केल्याचे निवेदन केले. या गुरुवारनंतर पुढचे चार दिवस एम्. व्ही. नारायण राव हा राज्यगृहमत्रालयाचा सचिव दिल्लीला तळ ठोकून होता. या घटनेकडे लक्ष वेधण्याचे कारण म्हणजे १९६९–७१ या दरम्यान, ज्या काळात अत्याचाराला बहर आला होता, हा गृहस्थ डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस होता. त्याने केन्द्रीय गृहमत्रालयाच्या सचिवाशी काहीएक संधान बाधले आणि मग चक्रे फिरली. शनिवारी मोरारजी देसाईंनी एक केन्द्रीय आयोग नेमण्याच्या घोषणेचा ( जी गुरुवारच्या चरणसिंगाच्या घोषणेच्या पूर्ण विरुद्ध होती ) पुनरुच्चार केला आणि त्याच्याच नतरच्या सोमवारी वेंगल राव यानी भार्गव कमिशन नेमण्याची घोषणा केली.

भार्गव कमिशनच्या चौकशीचा आवाकाही फार मर्यादित ठेवण्यात आलेला आहे. त्याचे प्रमुख कलम ' नक्षलवाद्यानी पोलिसावर केलेले अत्याचार ' हे आहे दुसरी गोष्ट अशी की नक्षलवादी पोलिस कोठडीतील अत्याचारामुळे मारले गेले त्या वस्तुस्थितीचा विपर्यास करून फक्त जे लोक मारले गेले ते नक्षलवादी होते की नव्हते एवढाच प्रश्न भार्गव कमिशनपुढे ठेवण्यात आलेला आहे. याचाच अर्थ असा की मारले गेलेले सगळे नक्षलवादी नव्हते, एवढे सिद्ध झाले, की

सरकार निदोष सुटले.

परत सरकार आणि पोलिसखाते दोघेही यांत आरोपी असल्याने ते वस्तुस्थितीची कल्पना व सहकार्य भार्गव कमिशनला देतील हे कठीण आहे. या ५ जुलैला CPI ( ML )च्या सत्यनारायण सिंग यानीही हीच भीती व्यक्त केलेली आहे आणि ती पूर्ण साधार आहे.

भार्गव कमिशनच्या चौकशीचा स्कोपही निश्चित न झाल्याने व सरकार स्वत:ला वाचविण्यासाठी त्याचा राजकीय साधन म्हणून उपयोग करणार हे निश्चित दिसल्याने तारकुंडे कमिशनच्या सदस्यानी त्याला सहकार्य करण्याचे नाकारले आहे. या कमिशनच्या अधिकारात नि पक्षपातीपणाने व निर्भयपणाने झालेल्या घटनांची चौकशी होणे शक्य आहे ह्याची खात्री पटली तरच त्यांना सहकार्य देण्याचे तारकुंडे कमिशनच्या लोकांनी ठरविले आहे.

जाता जाता या तारकुंडे कमिशनविषयीची सरकार व पोलिस याची प्रतिक्रिया नमूद करणे अनुचित होणार नाही. त्यांचे प्रमुख आक्षेप वर उल्लेखिलेच आहेत; पण स्वत तारकुंडे एकदाही हैदराबादला येऊन गेलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे 'संपूर्ण चौकशी हैदराबादभोवती केन्द्रित आणि तारकुडे त्याचे अध्यक्ष असूनही केवळ औपचारिकपणे सुद्धा ते हैदराबादला न आल्याने, इथून जे लोकांनी राजकीय दृष्टचा मालमसाल्याचे वाटले ते पुरविले आणि तारकुंडेनी त्यावर सह्या केल्या अशी प्रतिक्रिया आहे आणि घटनास्थळी स्वत. एकदाही न जाणाऱ्या तारकुंडेचे समर्थन करणे त्याच्या कट्टर समर्थकालाही जड्च जावे. [ ग्राश ]

---

# आमचे ग्रंथालय

## Power !

### How To Get It, How To Use It

By Michael Korda
(Ballantine Books,
Rs. 18–35, Pages 311 )

हे पुस्तक रॉबर्ट रिंगरच्या Winning Through Intimidation या पुस्तकासारखेच आहे असे मी 'माणूस'मध्ये आधी सागितलेच आहे; पण रिंगरच्या पुस्तकापेक्षा मायकेल कोर्डाचे पुस्तक फार पॉलिश्ड आहे. कोर्डा हा कोरडा नसून अत्यंत श्रीमंत आहे. वरील पुस्तक लिहूनच त्याने लाखो रुपये कमावले.

आता मायकेल कोर्डाची काही ब्रीदवाक्ये बघू या.

तुम्हाला आपली पगारवाढ करून घ्यायची आहे का? मग आपल्या हाताखालच्या लोकांच्या व आपल्या वरिष्ठाच्या पगारवाढीसाठी झटा.

ऑफिसमध्ये एखादा चमत्कार करायचा आहे का? मग ऑफिसवर एखादे संकट आले आहे असे भासवा व आपल्या कर्तृत्वामुळे संकटावर मात झाली आहे असे भासवा.

जेवढे तुम्हाला काम कमी, तेवढी तुमच्या हातात सत्ता जास्ती येईल असे कोर्डा म्हणतो! तो पुढे असेही म्हणतो की ऑफिस-पार्टीज् देणे आवश्यक आहे व त्याविषयी तो बऱ्याच सूचना देतो. स्वत:कडे सत्ता असलेले लोक खाली बसत नाहीत व जेव्हा जेव्हा गप्पा मारताना अफवा ऐकू येतात तेव्हा तेव्हा लक्षपूर्वक ऐकतात, पण त्या अफवेवर कॉमेंट करीत नाहीत

बोर्ड-रूममधील टेबल्स अगदीच गोलाकार का नसतात त्याचेही विवेचन कोर्डा करतो.

तुमची रिटायरमेंट लाबणीवर कशी टाकावी व दुसऱ्याची रिटायरमेंटची वेळ कशी लवकर आणावी वगैरे अनेक गोष्टी या पुस्तकात सफाईदारपणे सांगितल्या आहेत. बोलताना अगदी हळू आवाजात बोलावे म्हणजे दुसऱ्याना वाकून तुमचे म्हणणे ऐकावे लागेल! वादविवाद करताना ठामपणे 'नाही' म्हटले की तुमचे वजन वाढते !

'डेव्हिड हेलबर्सटेमनी त्याच्या 'द बेस्ट अॅण्ड द ब्राइटेस्ट' या पुस्तकात नामांकित व्यक्तीविषयी लेख लिहिले आहेत. त्यात रॉबर्ट मॅकनमारावर त्याने लिहिले आहे की, त्याला सत्तेचा हपाप असूनसुद्धा त्याची चर्या तो इतकी निरागस ठेवी की बघणाऱ्याना वाटावे की मॅकनमारा हा लहान मुलासारखा निष्पाप आहे. म्हणून सत्ता मिळविण्यासाठी तुम्हाला सत्तेची हाव आहे असे कधीच दाखवू नका. मुखवटा घालून आपण सत्तेविषयी अगदीच बेफिकीर आहात असे भासवा म्हणजे तुमच्या हातात सत्ता येईल.

सत्ता तुमच्या हातात येईल, त्यासाठी तुम्हाला कधीकधी शिष्टाचार सोडून वागावे लागेल. तुम्ही कुणाच्या ऑफिसमध्ये गेलात तर तुमच्या हातातल्या वस्तू तेथील खुर्चीवर ठेवा. त्या खुटीवर टागू नका त्यामुळे तुमचा 'टेरिटोरियल राइट' प्रस्थापित होईल. Territorial Imperative हे Robert Ardrey चे बिहेवियरल सायकॉलॉजीचे गाजलेले पुस्तक मी नुकतेच खरेदी केले आहे (त्याचा परिचय केव्हा तरी पुढे देईन.) नंतर तिथला टेलिफोन विचारून वापरा व त्या ऑफिसमधल्या डेस्कवर बसा हे सर्व अगदी आटोपशीर, आत्मविश्वासाने करा. या दृश्याने तेथे असलेला मॅनेजर थोडा नर्व्हस होईल.

जसजसा कंपनीचा अधिकारी वर चढतो तसतसे त्याला कळत जाते की रागाला आवर घालण्याने आपली सत्ता वाढते. रागाचे प्रदर्शन करून हातात सत्ता मिळवणारे नेहरूंसारखे लोक क्वचितच आढळतात. एरवी तुमच्या हाताखालच्या लोकाना कौशल्याने असे भासवा की त्याच्या कामाची गोडी त्याना आहे आणि एकदा तुम्ही वरवर चढायला लागलात की कधीकधी तुम्हाला आपोआप या गोष्टी अवगत होतील.

कोर्डा असे म्हणतात की ज्याच्याकडे फार सत्ता आहे त्याला फारसे लिहावे–वाचावे लागत नाही म्हणून त्याच्या आफिसमधील लाइट अगदी अंधुक असतो!

'फॉर्च्यून' हे मासिक जगातील मोठमोठ्या धंदेवाइकाचे आवडते मासिक आहे. जगातील सर्व मोठ्या ( व यशस्वी) कंपन्या हे मासिक घेतात. या मासिकात एकदा डब्ल्यू मायकेल ब्लूमेंथलची एक कहाणी आली होती. हा ब्लूमेंथल बेंडिक्स कॉर्पोरेशनचा प्रेसिडेंट व चेअरमन आहे. या कंपनीचा वार्षिक नफा ५६,४००,००० डॉलर्स

इतका आहे. ' फॉर्च्यून ' मासिकानें लिहिले होते की, कुणी अभ्यागत जर बेनॅडिक्स कॉर्पोरेशनमध्ये गेला तर त्याने कोणत्याच बंद दरवाजापुढे उभे राहू नये. याचे कारण असे की, कपनीचा अध्यक्ष ब्लूमॅथलमध्ये उत्साह इतका ओतप्रोत भरला आहे की ते दार उघडताना एकदम जोरात उघडतात व ते खोलीत प्रवेश करत नाहीत पण ' explode ' होतात ! या ब्लूमेथलची यशाची कहाणी या पुस्तकात आहे. इतर अनेक यशाच्या कहाण्याही या पुस्तकात आहेत. हा ब्लूमेंथल म्हणतो, ' Energy is the basic requirement of Power !! ' ब्लूमेंथलचा स्वभाव जरी आक्रमक असला तरी त्याची कंपनीच इतकी मोठी आहे की त्याची व्यवस्था ठेवायला त्याला त्याच्या आक्रमक स्वभावाला आळा घालणेंच भाग आहे ! त्याच्या कंपनीत ८७,००० लोक कामाला आहेत. त्यामुळे कधी कधी Size मुळेच Power diffuse होते असे कोर्डा म्हणतो.

एका मानसशास्त्रज्ञाने तर वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे असलेल्या माणसाचे वर्गीकरण Type A, Type B, Type C असे केले आहे Type A चे लोक अत्यंत महत्त्वाकांक्षी, आक्रमक व driving force असलेले असतात. या A टाइपच्या लोकाना अल्सर, हृदयविकार वगैरे तणावनिर्मित रोग फार होतात. यशाच्या मागे धावताना फार मोठी किंमत मोजावी लागते ही एक विचार करण्यासारखी बाब आहे; पण जोपर्यंत समाजाची यश मापण्याची मोजपट्टी चुकीची आहे तोपर्यंत या गोष्टीची फारशी दखल घेतली जाणार नाही.

लहानमोठ्या कंपन्यात किंवा कुटुंबांतसुद्धा प्रत्येकजण 'पॉवर-गेम्स' खेळत असतो. ज्यानी एरिक बर्नचे 'The Games People Play ' हे प्रख्यात पुस्तक वाचले आहे त्याना या गोष्टीची चांगलीच कल्पना येईल. या पुस्तकातील हे games म्हणजे मानसशास्त्राविषयी एक अभ्यासच आहे. कंपन्यात तर लहानमोठे अधिकारी त्याच्या कुवतीप्रमाणे लहानमोठे ' Power games ' खेळत असतात. परंतु मला वाटते ' Power games ' मधले सर्वश्रेष्ठ खेळाडू हे राजकारणक्षेत्रातील असतील. त्यांच्याइतका उत्कृष्ट पॉवरगेम कुणीच खेळू शकत नाही !

' As power currupts, it also mellows. ' सत्तेच्या मागे धावत असताना स्वत:ची सत्ता वापरण्याचा मोह बऱ्याच लोकाना आवरत नाही, पण एकदा का शक्य तेवढी सत्ता हातात आली व माणूस यशस्वी झाला की तो सत्तेचा वापर कमी प्रमाणात करतो व कधीकधी आपल्याकडे सत्ता आहे असे कबूलही करीत नाही हे कोर्डाचे म्हणणे फारसे पटण्यासारखे नाही. सत्ता हातात मिळाली की मैत्री व प्रेम दूर दूर पळतात, पण सत्तेची धुंदी, सत्तेचा कैफ काही विलक्षण असतो. अल्कोहोल किंवा इतर कोणत्याही मादक औषधापेक्षा ही धुंदी चमत्कारिक असते. सेक्सपेक्षाही हा कैफ काही औरच असतो व तो एक सेक्सचाच भाग असतो.

बऱ्याच लोकाचा असा समज असतो की उंचीमुळे आपली सत्ता वाढते. हॅरी कॉन नावाचा इसम जेव्हा बाहेर जेवणाला जात असे तेव्हा हळूच टेलिफोनडिरेक्टरी खुर्चीवर ठेवून उंच दिसण्यासाठी त्यावर बसत असे. जे लोक उंच टाचाचे एलिव्हेटर शूज वापरतात त्यांनाही कमी उंचीमुळे एक प्रकारची असुरक्षितता वाटत असावी. विन्स्टन चर्चिलच्या लाब लाब सिगार्स व विचित्र हॅट्स ही सुद्धा न्यूनगंडाच्या कारणामुळे असावी असे कोर्डा सूचित करतो.

पॉल रॅनो हा १९४० मध्ये फ्रान्सचा पतप्रधान होता. तो फार बुटका होता. असे म्हणतात की तो जर तीन इंच जास्त उंच असता तर इतिहासाला वेगळीच कलाटणी मिळाली असती. हेलन द पोर्त या बाईची पकड या पतप्रधानावर होती हेलनला ब्रिटिश लोकाबद्दल फारच आकस होता. हेलनमुळेच या पंतप्रधानाला आपल्याकडे सत्ता आहे असे वाटे. एकूण पुस्तक बरेच वाचनीय आहे. विशेषत: कंपनी अधिकाऱ्यांना व वरच्या थरातील लोकाना ते बरेच आवडेल असे वाटते.

— जे. एन्. पोंडा
— फिनिक्स लायब्ररी


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

1. **End Of An Era** – ( Inside Story of Emergency ) C. S. Pandit. Rs. 30/—
2. **Decline And Fall Of Indira Gandhi** – ( Inside Story of Emergency ) – D. R. Mankekar & Kamla Mankekar Rs. 30/—
3. **Words** – ( Autobiography ) – Jean Paul Sartra Rs. 8/—
4. **Walking The Indian Streets** – ( The journalist of New Yorker writes about his experiences in India and meeting wtth Nehru ) Rs. 9/—
5. **Calcutta** – (Description of the city which stinks of death ) – Geoffrey Moorehouse Rs. 15/—

- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.
- नॉन-मेंबर्सकरिता डेली बेसिसवर पुस्तके मिळतील.
- आमची उत्तम प्रतीची प्लॅस्टिक कव्हर्स करून मिळतील.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३

# रा. स्व. संघातील बदल – सत्य की संभ्रम : पृष्ठ १० वरून

राष्ट्रवादी ठरवू शकत नाही. सबब ही कल्पना लोकशाहीला मारक आहे. 'गतइतिहास, धर्मग्रंथ, प्राचीन संस्कृती, परंपरा इ. बाबी-विषयी कोणाची काय मते आहेत याचा भारतीयत्वाशी काडीचाही संबंध पोचत नाही.' ही आधुनिक राष्ट्रवादाची भूमिका संघास मान्य आहे का ? 'आजवरचा सगळा सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक वारसा नव्या युगात यशस्वीपणाने व समाधानाने जग-ण्याच्या दृष्टीने कुचकामी आहे' असे मत बाळगणारा हा कट्टर जनसंघीयाइतकाच भारताशी एकनिष्ठ असू शकतो, कारण भारताशी एकनिष्ठ असणे म्हणजे अमुक-तमुक वस्तूशी एकनिष्ठ असणे नव्हे तर, बरी-वाईट आज जशी आहे (अधोरेखित माझे) तशी ही भूमी व माणसे माझी आहेत ही दृढ भावना असणे आणि स्वतःचे भवितव्य भारताशी व भारतातल्या लोकांशी निगडित करणे ही राष्ट्रवादाची भूमिका संघाला मान्य आहे का ? (वरील अवतरणे श्री. वसंत पळशीकर यांच्या 'खासदार वाजपेयी आणि फुटीर जातीयवादाचा मुकाबला (स. प्र. पत्रिका जुलै-ऑगस्ट १९७० या लेखातून घेतली आहेत.) गोळवलकरांना ही भूमिका मान्य नव्हती. कारण ही मान्य केल्यास कदाचित समान नागरी कायद्याला मान्यता द्यावी लागली असती. नव्या संघचालकांनी तत्त्वत समान नागरी कायद्याला (सशर्त) संमती दिली आहे. त्यातील अटीवरून संघाची राष्ट्रवादविषयक भूमिका बदलली नाही असे वाटते.

येथवर हिंदुधर्म, अस्पृश्यता, राष्ट्रवाद या विषयीच्या संघमताची चिकित्सा केली आता थोडक्यात संघाच्या राजकीय मताची तपासणी करावयाची आहे.

## ४ अ : संघ व लोकशाही

ज्या कल्पना भारतीय नाहीत (उदा. समाजवाद, स्त्री स्वातंत्र्य) त्या स्वीकारार्ह नसणे अशी गोळवलकरांची राष्ट्रवादी (?) भूमिका होती लोकशाहीबाबत 'ही व्यक्तीपेक्षा पद्धतीला महत्त्व देणारी व्यवस्था' अशा गोंडस शब्दात लोकशाहीचा गोळवलकरांनी उपहास केला व वर भारतात राजेशाहीच्या काळात शांतता नांदली अशी मल्लीनाथी केली. (पहा विचारधन पृष्ठ २७) संघावर हुकुमशाहीचा आरोप यामुळेच केला जातो. (यात कार्यपद्धतीची भर) सुदैवाने (संघावर याच 'पद्धतीला' महत्त्व देणाऱ्या लोकशाहीविषयी लढण्याची पाळी यावी हा इतिहासाचा योग आहे.) नव्या सरसंघ-चालकांनी लोकशाहीवर पूर्ण श्रद्धा जाहीर केली ती स्वागतार्ह बाब होय. प्रश्न इतकाच आहे की, ही लोकशाही अधिक निकोप, परिपूर्ण होण्यासाठी तिचा सामाजिक समतेचा आशय साकार होण्यासाठी लढाई अद्याप संपली नाही. (उदा. आर्थिक व सामाजिक विषमता) हा आशय साकार करण्याच्या प्रयत्नात (कदाचित संघर्षात) संघ कितपत उतरतो यावर संघ बदलला का ? या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे कारण यासाठी समान नागरी कायदा, आधुनिक राष्ट्रवादाची ऐहिक भूमिका घ्यावी लागेल. कदाचित संघ राजकारण करणार नाही या भूमिकेला (किंवा स्ट्रॅटेजीला) विधायक संघर्षाच्या अर्थाने तिलांजली द्यावी लागेल.

## ४ ब : चारित्र्यसंपन्नता व मुस्लिम प्रश्न

रा. स्व. संघ ही राजकारण न करणारी, संघटित जीवनाचा संस्कार करणारी व चारित्र्य निर्माण करणारी हिंदुसंघटना आहे असे सामान्यत. सांगितले जाते. यातील चारित्र्य हा शब्द भोगळ वाटतो. कारण आपल्याकडे लैंगिक संबंधावर आधारित व्यक्तिगत चारि-त्र्याची पारंपारिक कल्पना मान्यता पावलेली आहे या अर्थाने चारित्र्यवान होण्यासाठी संघात जाण्याची अथवा संघाची जरुरी नाही. चारित्र्याचा व्यक्तिगत भाग सोडल्यावर उर्वरित सामाजिक चारित्र्याच्या भागाचा विचार करणे अवश्य ठरते उदा. संघटित जीवन जगून एकीचे बळ वाढवावे व सामाजिक जीवन एकरस करावे ही सामाजिक चारित्र्याची व्याख्या गृहीत धरली तर या सर्वांची गरज सर्वच भारतीय समाजाला आहे. एकट्या हिंदु-समाजाला नाही. मग यासाठी फक्त हिंदुसंघटन करण्याची जरूर काय ? जो काय अल्पसा प्रयत्न करावयाचा तो विशिष्ट समाजा-पुरताच का ? याचे उत्तर संघाने द्यावयास हवे. किमान याबाबत अडचण कोणाची व काय आहे हे तरी स्पष्ट करावयास हवे. वादा-साठी येथल्या अल्पसंख्य समूहाची (मुस्लिम, ख्रिश्चन) अडचण (वा अडथळा) आहे असे गृहीत धरल्यास हिंदुसमाज एकसंध आहे असे मानावे लागेल. (तरच अल्पसंख्य एकमेव अडथळा ठरतील) पण संघाचे उद्दिष्टच हिंदुसमाज एकसंध करण्याचे आहे म्हणजे हिंदुसमाजही एकसंध नाहीच. मग जर सर्वच भारतीय समाज एकसंध नाही तर तो निर्माण (एकसंध) करण्यात प्रयत्न खर्ची घालायचे का राष्ट्रातील इतर समूहांना दूर ठेवून (शत्रू म्हणून) विशिष्ट समाज एकसंध करावयाचा हा प्रश्न येतो व या प्रश्नाचे उत्तर राष्ट्रवादविषयक काय भूमिका घेतली जाते यावर अवलंबून आहे (कारण हिंदुसमाज म्हणजेच भारतीय समाज ही भूमिका सोडावी लागते) थोडक्यात मूळ हिंदुसंघटनेचे उद्दिष्ट सोडावयास संघ तयार होणार का ? असा हा प्रश्न आहे व आज तरी याचे उत्तर नाही असेच आहे.

या देशातल्या मुस्लिम प्रश्नावर संघ बदनाम झालेला आहे. याबाबतची संघाची भूमिका व प्रचार हेच याला कारणीभूत आहेत. उदा. मुस्लिम राष्ट्रभक्त असू शकत नाहीत, (असल्यास त्यांनी वागणुकीने सिद्ध करावे) ही भूमिका घेऊ यात राष्ट्रभक्त कोणाला व राष्ट्रद्रोही कोणाला म्हणायचे हा मुख्य प्रश्न आहे उदा. केवळ निष्ठा परदेशी आहेत म्हणून मुस्लिमांना अराष्ट्रीय ठरवायचे का ? तसे असेल तर परदेशात चैनीसाठी व विलासी राहणीसाठी स्थायिक होणारे हिंदुसुद्धा राष्ट्रद्रोही ठरतील पुन्हा काय केले असता राष्ट्र-द्रोह होतो हे ठरवावे लागेल संविधान व कायदे जी कृत्ये राष्ट्रद्रोही ठरवतील ती कायद्यातल्या तरतुदींनुसार; कृत्य करणारा हिंदु आहे की मुस्लिम आहे हे पाहून नाही. हे संघाला मान्य आहे का ? जर कायद्याच्या आधारे राष्ट्रविरोधी वर्तन सिद्ध होत असेल तर काळा बाजार असणारे हिंदु व्यापारी, जनतेची लूट करणारे हिंदु भांडवल-दार, हिंदु जमीनदार हेही राष्ट्रद्रोही ठरतील. म्हणजे अल्पसंख्य मुस्लिम (वादासाठी) अराष्ट्रीय ठरले तरी बहुसंख्य हिंदु राष्ट्रभक्त

ठरत नाहीत. म्हणजेच हिंदुसमाजालाही राष्ट्रवाद व्यापक प्रमाणात शिकविण्याची गरज आहे व मुस्लिमाना तर जास्तच गरज आहे. तर राष्ट्रवाद शिकविण्यासाठी वेगळ्या वा स्वतंत्र जमातीच्या सघटनेची गरज आहे का ? हा प्रश्न फक्त हिंदुसघटनेचे उद्दिष्ट, व्यापक भारतीय एकात्म समाजनिर्मितीसाठी सोडून देण्याचा आहे यातले सघ काय स्वीकारणार यावर त्याच्यातील बदलाचे उत्तर मिळेल. गोळवलकरानी वेगळ्या घराची भाषा केली होती ती भाषा सोडून एका घराची सुधारणा ही भूमिका संघ घेणार काय ? याचे उत्तर आज तरी नाही असे आहे.

सध्या सघात मुस्लिमाना प्रवेश देण्याचा बोलबाला आहे. श्री. बाळासाहेब देवरस यानी 'मुस्लिमांनी अशी मागणी करावी' अशी भूमिका घेतली आहे. शिवाय त्याना (सघात यावयाचे तर) सघाची भूमिका मान्य करावी लागेल हे वेगळेच. या कामी सुसवादाचे साधन म्हणून देवरस जमाते इस्लामीशी सबध व सपर्क राखून आहेत. प्रश्न इतकाच आहे की, मुस्लिमानी सघात येण्यासाठी सघ काय सोडणार आहे ? उदा भगवा ध्वज हे हिंदुराष्ट्राचे प्रतीक होय. कारण छ. शिवाजीनी ते वापरले होते. या ध्वजामागची हिंदु राष्ट्रवादाची भूमिका व शिवाजी याबद्दलच्या सघाच्या भावना ( उदा. शिवाजी हा स्वातंत्र्यासाठी लढणारा नेता नसून मुस्लिमाना ठेचून काढणारा वीर ही भावना ) सघ बदलणार आहे का ? त्याचप्रमाणे इथला मुस्लिमाचा इतिहास भारतीय इतिहासात ( परकी म्हणून नव्हे ) सामावून घेण्याची व त्या अनुषगाने इतिहासातील लाजिरवाणा भाग कोणता, टाकाऊ कोणता हे ठरविण्याची तयारी सघ दाखवील काय ? अकबर हा एक उदार पुरोगामी मुस्लिम राजा होऊन गेला हे सघ मान्य करणार का ? यावर सघात मुस्लिमानी येण्यात अर्थ आहे. पुन्हा मुस्लिमाना संघात घ्यायचे तर सघातील धार्मिक कार्यक्रम दोन्ही धर्मांचे असावे लागतील ( उदा. रक्षाबधन, नमाज पढण वा. डोले इ ) हे सघ मान्य करतो काय ? अन्यथा उपासनापद्धती भिन्न होऊन एकत्र यावयाचे असेल तर धार्मिक कार्यक्रमाना सुटी द्यावी लागेल. याला सघाची तयारी आहे काय ? याला संघ तयार असेल तर हिंदुसघटनेच्या उद्दिष्टाचे काय ? किमान आज तरी मुस्लिमविषयक सघाच्या दृष्टिकोनात मूलभूत बदल न होता मैत्रीचे सबध असावेत इतपतच बदल झाला आहे, पण पुन्हा मैत्री कुणाशी तर जमाते इस्लामीशी. नुकत्याच ब्लिट्झमधील एका मुलाखतीत देवरसानी समान नागरी कायद्याचा सशर्त पुरस्कार केला त्यातली शर्त ही मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात बदल करताना मुस्लिमाची समती मिळवावी. म्हणजे समान नागरी कायद्याचा पुरस्कार कॉंग्रेसने असाच ( व आजच्या जनतासरकारनेही असाच ) केला होता यात कॉंग्रेस वा जनतापक्षापेक्षा देवरसाची भूमिका वेगळी काय ? मग ज्या कॉंग्रेसवर मुस्लिम अनुनयाचा आरोप सघ करीत होता तीच ती भूमिका नव्हे काय ? यातील गोडवगाल सध्या तरी असे दिसते की, दोस्ती जमाते इस्लामीशी ( मुस्लिम जातीयवाद कायम व त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदु जातीयवाद कायम ), मागणी (दोन्हीही जातीयवाद मोडणाऱ्या ) समान नागरी कायद्याची शिवाय वर सघ बदलतो आहे हा डकाही कायम. हे फार काळ टिकेल काय ? देशातला हिंदु-मुस्लिम प्रश्न समाधानकारक व तेढ न वाढविता सोडवायचा तर दोन्ही समाजातील सेक्युलर शक्ती ( हमीद दलवाईंची चळवळ व सेक्युलॅरिझमची चळवळ ) वाढविण्याचा प्रयत्न सघाला व तत्सम संघटनाना करावा लागेल. प्रश्न सघाला हिंदु सेक्युलर करणे परवडेल का हा आहे ! यावर सघातील बदल प्रचितीक्षम ठरेल. कारण धर्म व परपरा याचा सामाजिक प्रभाव नष्ट करण्याची चळवळ सघाच्या उद्दिष्टाशी विसगत ठरेल.

## ४ क : संघ व राजकारण

संघ राजकारण करीत नाही; परंतु हिंदुत्ववादी राजकीय पक्षाला ( पूर्वाश्रमीचा जनसंघ ) कार्यकर्ते पुरविण्याचा उद्योग संघाने आजवर केला हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल. दि १२-६-७७ च्या Organiser च्या अकात संघाचे सहकार्यवाह राजेंद्रसिह यानी R S S and Power Politics' नावाचा लेख लिहिला आहे त्यात त्यानी १९५० साली सघावरील बदी उठल्यावर व ( नेहरूंच्यामुळे ) सघस्वयसेवकाना कॉंग्रेसची दारे बद झाल्यावर स्वयसेवकाना राजकीय पक्षात जाण्याची मनाई करण्यात आली असे लिहिले आहे व १९५१ साली जनसंघाची स्थापना झाल्यावर भारतीय ध्येये व उद्दिष्टे मान्य असणाऱ्या राजकीय पक्षात जाण्याची परवानगी देण्यात आली असेही लिहिले आहे याचा अर्थ उघडच असा आहे. त्या वेळचे राजकीय पक्ष म्हणजे समाजवादी, कम्युनिस्ट, कृषक मजदूरसभा इ. सघाच्या व्याख्येने भारतीय नव्हते व सरळ जनसघात जा सागण्याऐवजी भारतीय उद्दिष्ट व ध्येये असणाऱ्या पक्षात जा असे सागण्यात आले एवढाच फरक. हीच गोष्ट इतर क्षेत्रातली. कामगारक्षेत्रात भारतीय मजूरसंघ अशीच वेगळी भूमिका टिकवून आहे ( उदा. भा. म. ला जागतिक कामगार दि. १ मे मान्य नसून विश्वकर्माजयती कामगारदिन म्हणून मान्य आहे ) विद्यार्थीक्षेत्रात अ. भा. वि. प व धार्मिक क्षेत्रात विश्वहिंदुपरिषद. अशा रीतीने समाजाच्या सर्व क्षेत्रात आपल्या प्रणालीची संघटना उभी करून हिंदुत्वाचे राजकारण प्रबळ करण्याचा उद्योग सघाने केला हे सत्य आहे म्हणून संघ प्रत्यक्ष निवडणुकीच्या राजकारणात नसेल पण राजकारणात नाहीच असे म्हणणे कठीण आहे.

येथवर सघाच्या एकंदर भूमिकेचे ढोबळमानाने परीक्षण केल्यावर सघ बदलतो आहे किंवा नाही या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. आज देवरसाची भाषा सघाबद्दलचे गैरसमज दूर होत आहेत अशी आहे. ( सघ बदलतो आहे अशी नाही. ) सघाचे आजचे स्वरूप सामाजिकदृष्टया उच्चवर्णीयाची व आर्थिकदृष्टया मध्यमवर्गीयाची हिंदुसघटना असे स्थूल मानाने आहे. हे स्वरूप बदलून सघ ही व्यापक समाजाचे प्रतिबिंब असणारी सघटना करायची असेल तर विषमतेच्या प्रश्नावर लढाऊपणा दाखवून दलिताना व शोषिताना दिलासा दिला पाहिजे कारण नुसते सघात येऊन हे प्रश्न सुटणार नाहीत व नसतील तर चारित्र्य व सस्कृति या गोष्टी हवेतच सोडाव्या लागतील यापुढे या देशातील दलिताच्या आदोलनात सघ दलिताच्या बाजूचो निर्णायक शक्ति म्हणून उभा न राहिल्यास सघाची वाढ होणे बद होऊन ती एक निष्क्रिय सघटना बनेल. किमान सघ व्यापक होण्यासाठी तरी सघाला बदलावे लागेल नुकतेच जयप्रकाश नारायण व श्री. देवरस याचे अस्पृश्यता व जातिव्यवस्था/ याच्या निर्मूलनावर एकमत झाल्याची वार्ता आहे. तत्वत. या प्रश्नावर कोणाचे दुमत आहे ? प्रश्न फक्त कृतीचा आहे. जयप्रकाशाच्या संपूर्ण क्रातीचा वाहक सघच होणार असा समजही आज आहे अर्थात सघाची याबाबतची भूमिका अजून स्पष्ट झालेली नाही, पण सघाला ही क्राती झेपेल का ? उदा. जानवी तोडा हा जयप्रकाशाचा कार्यक्रम प्रतीकात्मक असला तरी महाराष्ट्रातील सघजन हे मान्य करतील का ? या भूमिकेच्या स्पष्टतेवरच सघातील बदल ' सत्य की सभ्रम ' याचे उत्तर मिळणार आहे. अर्थात सघटना, व्यक्ति बदलूच शकत नाही, या मताचा मी नाही किंवहुना या बदलासाठी थोडा काळ जाऊ देण्याचीही माझी तयारी आहे. फक्त हा बदलाचा निश्चय कृतीच्या कसोटीवर उतरला पाहिजे. सघासारख्या सघटनेकडे ताकद आहेच व ती परिवर्तनाच्या चळवळीसाठी वापरल्यास परिवर्तनाची प्रक्रिया अधिक वेगवान होईल व जयप्रकाशजींच्या स्वप्नातील भारत लवकर निर्माण होईल. म्हणून सघाकडून ती अपेक्षा आहे. □

आहे त्याला बगल दिलीच आहे. निवडणुकीच्या आधी अथवा निवडणूककालखडामध्ये आणीबाणी उठविण्यात आली नव्हती अथवा प्रसिद्धपूर्व नियत्रणेही दूर करण्यात नव्हती त्याबाबत केवळ शिथिल धोरण स्वीकारण्यात आले होते. अशा परिस्थितीमध्ये घटकाभर असे धरून चालू की बाईंनी निवडणुका जिंकल्या असत्या तर ..तर कदाचित आणीबाणी चालू राहिली असती आणि प्रसिद्धिपूर्व नियत्रणे पुन्हा अमलात आली असती असे म्हणणे अगदीच अवाजवी वाटू नये. निवडणुका घेण्याचे घोषित करून आपण लोकशाहीवादी असल्याचा जो दावा इदिराजींनी केला आहे–तोही हास्यास्द आहे. एक तर त्याना स्वतःच्या निर्णयावर जनतेचे शिक्कामोर्तब करून घ्यायचे होते आणि दुसरे म्हणजे आपण निवडणुका हरू, असे त्याना अजिबात वाटत नव्हते. कोणताही हुकूमशहा निवडणुका घेतो त्या वेळी जनमत आपल्या विरुद्ध जाणार नाही याची काळजी घेतो ( अगदी ताजे उदाहरण म्हणून जनाब भुट्टो यानी घेतलेल्या पाकिस्तानमधील निवडणुकाकडे बोट दाखविता येईल ). बाईंनी असा काही बंदोबस्त केला नव्हता हे खरे; पण त्याचे कारण आपल्या नावाची जादू अजूनही चालते असा त्याना दाडगा विश्वास होता, खेरीज गुप्त हेरखात्याकडूनही निवडणुका घेतल्यास हुकमी आणि प्रचंड बहुमत आपणास मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला होता. आणीबाणीमधील अधिकारांचा मुक्त हस्ते वापर करून विरोधी पक्ष मोडून काढला होता. तात्पर्य ज्या वेळी निवडणुका घोषित केल्या त्या वेळी पराभवाची कल्पनाही दृष्टिक्षेपामध्ये नव्हती. अगदी हुकुमशहा झाला तरी त्याचेही अडाखे चुकतात–इदिराजींच्या बाबतीतही तेच झाले. त्यानी बाधलेले सारे अदाज मातिमोल ठरले आणि त्याचा दारुण पराभव झाला ! आता या अंदाज चुकण्याच्या प्रतिक्रियेवरून जर बाईंना स्वतःच्या पाठीवर ' लोकशाहीवादी ' अशी थाप मारून घ्यायची असेल, तर त्यानी ती खुशाल मारून घ्यावी.

कदाचित गृहमत्र्याची विधाने जास्त आक्रमक असतील, त्याला जरा वाजवीपेक्षा तिखटमीठ जास्त लावले असेल, पण म्हणून त्याचे विधान एकदम झिडकारण्यात अर्थ नाही आणीबाणीच्या काळामध्ये शेकडो लोक मारले गेले, अनेकाना तुरुगामध्ये जावे लागले या सगळ्या गोष्टी योजनाबद्ध होत्या असे जसे म्हणता येणार नाही, त्याचप्रमाणे त्या केवळ अपघाती स्वरूपाच्या होत्या असेही म्हणता येणार नाही. हाती असलेली अफाट सत्ता ज्यानी बेगुमानपणे वापरली अशा मडळीच्या हातून घडलेल्या अत्याचारामुळे उडालेल्या रक्ताचे थेंब दोषी माणसाच्या हातापायावर जरूर आहेत; पण इदिराजी, अजून गाडे प्रत्यक्ष तुमच्यापर्यंत पोचलेले नाही. निदान तसे पुराव्यानिशी सिद्ध झालेले नाही, परतु हे अत्याचार झाले त्या वेळी तुम्हीच सर्वोच्च सत्तास्थानी होता आणि आणीबाणीचा जन्म आपल्याच हातून झाला या गोष्टी नजरेआड करून चालणार नाही.

□

## □ जयप्रकाशजींचा सल्ला

लोकसभेमध्ये इदिराजीवर तोफा डागल्या जात असतानाच कलकत्तामार्गे पाटण्याला जात असताना जयप्रकाशजीनी सागून टाकले की कॉंग्रेसपक्ष हाच जनतापक्षाला चागला पर्याय आहे. मात्र कॉंग्रेसला पक्ष म्हणून पुन्हा उभे रहावयाचे असेल तर या पक्षाने इदिराजीचे नेतृत्व पूर्णपणे फेकून दिले पाहिजे असा सल्लाही जयप्रकाशजीनी जनतापक्षाला दिला आहे. केवळ एवढा सल्ला देऊनच ते थाबलेले नाहीत—तर या पक्षाने यशवतराव चव्हाण अथवा अन्य जबाबदार व्यक्तीकडे पक्षाचे नेतृत्व द्यावे असेही त्यानी सुचविले आहे आपल्या मुलाच्या कृष्णकृत्याची काळी छाया सोबतीला घेऊन पक्षाचे नेतृत्व त्याना करता येणार नाही आणि ही काळी छाया त्याचा पिच्छा कधीही सोडणार नाही असेही भाकित त्यानी केले आहे कलकत्त्यामध्ये उतरून कॉंग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून मान्यता देणारे वक्तव्य जयप्रकाशजीनी करावे आणि त्याहीपेक्षा डाव्या कम्युनिस्टाना त्याचा पक्ष प्रादेशिक असल्याचे सागावे इतकेच नव्हे तर मद्रासमधील अण्णा डि. एम् के. बरोबर त्याची तुलना करावी या गोष्टी डाव्या कम्युनिस्टाना चारल्याच लागल्या. अर्थात जयप्रकाशजीच्या विधानावरून वाद निर्माण करण्याची त्याची इच्छा नाही. आपली नाराजी मात्र त्यानी पुरेशा स्पष्ट शब्दामध्ये व्यक्त केली आहे. जयप्रकाशजीनी कॉंग्रेसबाबत जे विधान केले आहे त्याचे कॉंग्रेसच्या एका वर्तुळामध्ये स्वागत झाले आहे. बाईंनी कांग्रेस सोडावी आणि त्या कॉंग्रेस सोडणार नसतील तर पक्षाने त्यना हाकलून काढावे अशी सुस्पष्ट मागणी मूळ धरू लागली आहे.इदिरा इज् इडिया ' – म्हणणारे देवकात बरुआ या मागणीचा पाठपुरावा करीत आहेत हे लक्षात घेतले म्हणजे ' काळाय तस्मै नम. ' असे म्हणण्याखेरीज गत्यतर रहात नाही. प्रारभी बाईंवर टीका करण्याचे धाडस विशेष कोणाला होत नव्हते. माजी मत्री टी. ए. पै ज्या वेळी परखडपणे बोलले त्या वेळी त्याना विरोध झाला. आता भीती नष्ट झाली आहे, भीडही माणखो दबली गेली आहे त्यामुळेच बाईंवर तोफा डागल्या जात असताना वातावरण शात होते. आज पक्षाची सूत्रे ज्याच्या हाती आहेत ते चव्हाण – रेड्डीही मूग गिळून गप्प बसले होते. ज्या वेळी इदिराजीचा त्याच्या पक्षासह पराभव हा केवळ अभ्यासू चर्चेचा भाग होता त्या वेळी कोणा पत्रकाराने अटलजीना असे झाले तर काय होईल असा प्रश्न विचारला होता आणि अटलजीनी उत्तर दिले होते–कॉंग्रेसच्या आणि इदिराजींच्या पराभवाचे इतर काय परिणाम होतील ते होवोत, पण एक गोष्ट नक्की की असा पराभव जर झालाच–तर त्याचा स्वत.चा पक्ष त्याना झुगारून देईल. आज गाडे त्याच दिशेने जात आहे. एके काळी इदिराजींची तारीफ करणाऱ्या ब्लिट्झने निवडणुकीपूर्वीच आपल्या प्रवासाची दिशा बदलली असली तरीही इदिराजी हा विषय या साप्ताहिकाला

प्रिय आहे आणि गृहमंत्र्यांच्या विधानावर भाष्य करणारे आक्रमक पत्रक बाईंनी काढल्यावर या आवडत्या विषयावर पुन्हा एकदा लेखणी चालवणे अपरिहार्य होते. बाईंच्या पत्रकामधील प्रत्येक ओळीवर त्यानी भाष्य केले असून–क्रियाशील राजकारणामध्ये पुन्हा नव्या जोमाने उभे राहण्याचा बाईंचा प्रयत्न असल्याचे ब्लिट्झने सुचित केले आहे बाईंच्या या एकाच निवेदनातून ब्लिटझचे लेखक ए. राघवन यानी अनेक अर्थ काढलेले आहेत. जनतापक्षाने काय करावे हे सुचवण्याचे धाडसही बाईंनी प्रथमच केले आहे. या गोष्टी-कडे लक्ष वेधून राघवन पुढे लिहितात, इंदिराजींच्या राजकीय कार-कीर्दीमधील काळ्या भागाला अलहाबाद न्यायालयाच्या निकाला-नतर प्रारभ झाला. त्यानतर आलेली आणीबाणी आणि सजयला स्वतःचा वारसदार म्हणून अट्टाहासाने लादण्याचा प्रयत्न या दोन्ही गोष्टी इंदिराजीना अतिशय प्रतिकूल ठरल्या आणि पुन्हा ज्यातून बाहेर पडणे कठीण आहे असे जबर अपयश त्यानीच घेतलेल्या निवडणुकानी त्याच्या पदरामध्ये घातले. चरणसिंग यानी केलेल्या विधानाच्या सदर्भामध्ये त्यानी काढलेले निवेदन म्हणजे पूर्ण पराभूत राजकीय जीवनातून पुन्हा उभारी घेण्याचा प्रयत्न आहे. जनतापक्षामधील बाबूजी – बहुगुणा आदि मडळीशी सुसवाद निर्माण करण्याचा प्रयत्न बाईंनी चालविला असून कोंडी फोडण्यासाठी त्या प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहेत. आणी-बाणीमधील अतिरेकी प्रकाराबाबत त्यानी काही वेळा दिलगिरी व्यक्त केली असली तरी–आपल्या मुलाबाबत त्यानी पूर्णपणे मौन पाळले आहे. सजयला आपला राजकीय वारसदार बनवण्याची खट-पट इंदिराजीनी चालवली होती याबाबत माझ्या मनात कोणताही सदेह नाही असे स्पष्ट विधान जयप्रकाशजीनी केल्यावर इंदिराजी निदान या सदर्भात तरी काही बोलतील अशी अपेक्षा होती; परतु शुद्ध राजकीय आरोपाचे निराकरणही त्यानी केले नाही. अर्थात त्यालाही दोन कारणे असावीत. एक तर विधान जयप्रकाशजीनी केले असल्यामुळे त्यानी उत्तर देण्याचे टाळले असावे, अथवा संजयचे नेतृत्व ज्या पद्धतीने रुजवण्यात आले ती पद्धत इतकी सुस्पष्ट होती की–आपण काहीही खुलासा केला तरी त्याच्यावर लोकाचा विश्वास बसणार नाही याची इंदिराजीना मनोमन खात्री असावी. मग उगाच खुलासा करून आणखी हसे करून घेण्यात हाशिल काय म्हणूनही त्या कदाचित् गप्प राहिल्या असतील. चरण-सिंग यानी केलेल्या आरोपाबाबत तसे नव्हते–काही तरी खुलासा आवश्यक होता आणि करण्यात आलेल्या खुलाशाची विश्वासार्हता शंकास्पद असली तरी हा खुलासा हास्यास्पद वाटण्याचे प्रयोजन नव्हते.

निवडणूकनिकालानंतर चुपचाप बसलेल्या इंदिराजींनी प्रकाशात न राहता कांग्रेसपक्षाची सूत्रे आपल्या हाती ठेवली होती. केवळ त्यांच्या सल्ल्यानुसारच विधानसभा निवडणुकाचे वेळी उत्तर प्रदे-शाच्या कांग्रेस उमेदवाराच्या यादीमधील पच्याऐंशी नावे बदलण्यात आली. हरयानामध्ये जी अस्थायी कांग्रेस प्रदेशसमिती अस्तित्वात आली आहे तिची सूत्रे बन्सीलाल याचे उजवे हात समजले जाणाऱ्या रणवीर सिंग याच्या हाती सोपविण्यात आली आहेत. पंजाबमधील कांग्रेसची सूत्रे बन्सीलाल याचे दुसरे साथीदार दरबारा सिंग यांच्या हाती जाणार असे दिसत आहे. या सगळ्या गोष्टी बाईंच्या इच्छे-नुसार होत आहेत. महाराष्ट्रामधील बदल त्याना मुळीच मजूर नाहीत हे तर स्पष्टच आहे; परंतु यशवतरावाबरोबर त्या ज्या पद्धतीचे राजकारण महाराष्ट्रामध्ये खेळल्या, आता परिस्थिती बदलल्यावर यशवतरावजी त्याच पद्धतीचे राजकारण त्यांच्याशी खेळत आहेत. कोणाची मते काहीही असोत, पण महाराष्ट्रामध्ये जे राजकीय बदल झाले– ते यशवंतरावाच्या मार्गदर्शनानुसारच आणि इंदिराजीच्या इच्छेविरुद्ध हे नाकारण्यात अर्थ नाही. यशवतराव हळू-हळू निश्चितपणे आणि हेतुपूर्वक बाईंपासून दूर जात आहेत. त्याच्या यशवतनीतीला शोभेल अशीच ही चाल आहे उत्तर हिन्दुस्थान-मधील कांग्रेस बाईंना जोपर्यंत पूर्णपणे नाकारीत नाही आणि दक्षिणे-मधील बाईंची जादू जोपर्यंत पूर्णपणे पातळ होत नाही तोपर्यंत चव्हाण बाईंना पूर्णपणे सोडणार नाहीत एका बाजूने बाईंची ताकद खच्ची करायची– आणि दुसऱ्या बाजूने कांग्रेसचा राष्ट्रीय नेता म्हणून स्वतःची ताकद वाढवायची असे दुपदरी राजकारण सध्या चव्हाण खेळत आहेत. आपण पूर्ण गप्प राहिलो तर कायमच्या सपून जाऊ– आणि बोलण्यासारखी तर परिस्थिती नाही अशा विचित्र कोडीमध्ये इंदिराजी अडकल्या आहेत. सधी मिळेल तेव्हा तोफ डागायची, असे गनिमी धोरण सध्या त्यानी स्वीकारले आहे

सत्ताभ्रष्ट झाल्यानतर त्या प्रथमच मुलाखत देत आहेत. अमेरिकेचे माजी अध्यक्ष रिचर्ड निक्सन याची प्रदीर्घ मुलाखत घेणाऱ्या डेव्हिड फ्रोस्ट याना त्यानी मुलाखत दिली असून त्याची ही मुलाखत बी. बी. सी. वरून प्रसारित करण्यात आली आहे. आत्तापर्यंत बोलू न शक-लेल्या किती तरी गोष्टी बाई या मुलाखतीमध्ये बोलल्या आहेत. त्याचा ताठरपणा कायम आहे. मुलाचे अपराधही मानण्यास त्या तयार नाहीत. निक्सनने पैसे मिळण्यासाठी मुलाखत दिली होती. बाईंचे तसे नाही– आणि म्हणूनच या मुलाखतीलाही विशेष महत्त्व आहे. चढत्या क्रमाने यशस्वी होत सत्तेच्या आणि लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेली ही बाई लोकप्रक्षोभाच्या तडाख्याने अपमानित होऊन खोल दरीत कोसळली आहे तिची आणि तिच्या चाहत्याची कितीही इच्छा असली तरी तिचे पुनरा-गमनही जवळजवळ अशक्यप्राय गोष्ट आहे आणि तशी सधी मिळू नये म्हणून जनतापक्ष चारीही बाजूनी सरकारी पातळीवर मोर्चे बाधतो आहेच. □

## □ जनतापक्षाचे भवितव्य

इंदिराजींचे भवितव्य हा जसा एक चर्चेचा विषय आहे त्याचप्रमाणे अजून एकजीव न झालेल्या जनतापक्षाचे भवितव्य हाही एक सतत चर्चेचा विषय आहे. जनतापक्षामध्ये राहून उच्च सत्तास्थान भूषव-णारा बाबुजीसारखा नेताही जनतापक्ष अजून एकरूप झाला नाही असे म्हणतो. इतकेच नव्हे तर पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकापर्यंत तरी ही एकरूपता निर्माण होईल की नाही याविषयीही त्यांना शका वाटते. पक्षातर्गत लाथाळ्यामुळे मंत्रिमंडळविस्ताराचे काम

अवाजवी लांबल्याची ओरड सर्वत्र चालूच आहे आता मात्र आठ-पंधरा दिवसांमध्ये हे काम मार्गी लागेल, असे दिसते आहे. बंगाल-मध्ये पी. सी सेनसारखा प्रमुख नेता नाराज आहे, इतकेच नव्हे तर त्यांनी प्रांताध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. खासदारकीचा राजीनामा देण्याची तयारी ठेवली आहे. इकडे मुंबईहून सदोबा पाटलांनी गळा काढला आहे. देशाच्या आणि पक्षाच्या भवितव्यापेक्षा त्यांना स्वत.च्या भवितव्याची जास्त चिंता लागली आहे आता त्याच्या बाबतीत नवीन काही घडण्यासारखे नसले तरी त्यांच्या पत्रकाची दखल दैनिकाच्या पहिल्या पानावर घेतली जाते आणि त्याच्या विधानाचा आधार घेऊन दैनिकाचे अग्रलेख लिहिले जातात आणि जनतापक्षाच्या भवितव्याचा खेळ खेळवला जातो. जनतापक्ष सत्तेवर आल्याला केवळ तीन महिने होऊन गेले आणि शंभर दिवसात या शासनाने काय केले याच्या पत्रिका माडल्या गेल्या आणि बहुतेक सगळ्या वृत्तपत्रांनी, साप्ताहिकांनी जनतापक्षाला लोकशाहीच्या पुर्वस्थापनेचे श्रेय दिले. पतप्रधान मोरारजी देसाई याच्या विरुद्ध निवडणुकीचा खटला दाखल झाला आहे हे पण खुल्या लोकशाहीचेच एक लक्षण मानायचे. वृत्तपत्रस्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित झाले असून आकाशवाणी आणि दूरदर्शन याना पुन्हा तेज आले आहे. या सर्व अपेक्षित गोष्टी शासनाने पूर्ण केल्या आहेत, परतु लोकाचे लक्ष शासन आता आर्थिक आघाडीवर काय करते याकडे लागुन आहे आणि आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी पक्ष पूर्णपणे एकजीव होणे आवश्यक आहे असे अनेकाना वाटते अजून तो होत नाही किंवा ही एकरूपता लवकर येऊ शकणार नाही हे समजण्यासारखे आहे, परतु पक्षातर्गत गट निर्माण होत असल्याचा जो आरोप वारवार करण्यात येतो त्यामध्ये भरपूर तथ्य आहे हे नाकारता येणार नाही भालोद आणि जनसघ यानी हातमिळवणी करून आपल्याला हवी ती मंडळी नव्याने सर केलेल्या राज्याच्या मुख्य मत्रिपदी बसवली हे कसे नाकारता येईल ? या आरोपावाबत 'ऑर्गनायझर' या साप्ताहिकाने केलेला युक्तिवाद पहाण्यासारखा आहे. ज्या वेळी दोन अथवा तीन मित्र एकाच उद्देशाने एकत्र येतात त्या वेळी त्यापैकी जो सर्वांत बलिष्ठ असतो त्याचे वर्चस्व राहते. मात्र असे वर्चस्व राहत असतानाही मित्रमडळीना त्याच्या ताकदीच्या मानाने यशामधील वाटा मिळतो आहे की नाही यावरून गोष्टी ठरवण्यात आल्या पाहिजेत. हा दृष्टिकोन मान्य केला म्हणजे सघटनाकाँग्रेसला तक्रार करण्यास जराही वाव नाही असे म्हणावे लागेल. ऑर्गनायझरने याच विचारसरणीमधून आपल्या लेखाची माडणी केली आहे. सघटनाकाँग्रेसला जनतापक्षाने पुरेसे स्थान दिले नाही अशी जी तक्रार श्री. स. का पाटील यांनी केली आहे त्याची दखल घेऊन अशी विचारणा करण्यात आली आहे की देशामधील सर्वोच्च सत्तास्थान जे पतप्रधानपद ते सघटनाकाँग्रेसच्या मोरारजीभाईंना दिले. राष्ट्रपतिभवनामध्ये सजीव रेड्डी जाऊन बसले आहेत म्हणजेच हेही सन्माननीय पद संघटनाकाँग्रेसकडेच गेले आहे. खेरीज केंद्रीय मत्रिमडळामध्ये त्याचे पाच मत्री आहेत. एका राज्यात त्याचा मुख्य मत्री आहे आणि अन्य आठ राज्यामध्ये काही मत्रिपदे त्याच्याकडेच आहेत सघटनाकाँग्रेसची सघटनात्मक ताकद लक्षात घेता सत्तेमधील हा वाटा काही लहानसहान नाही. प. बंगाल किंवा तामिळनाडू-मध्ये जर जनतापक्ष विजयी झाला असता तर त्या राज्याच्या मुख्य मत्रिपदी निश्चितपणे संघटनाकाँग्रेसचा नेता विराजमान झाला असता; पण जेथे संघटनाकाँग्रेसची ताकद सगळ्यात जास्त तेथेही त्याना सघटनाकाँग्रेसला विजय मिळवून देता आला नाही. आता बिहार किंवा उत्तरप्रदेशामध्ये आपल्या पक्षाचा नेता, जनतापक्षाचा विधानसभेमधील जनतापक्षाचा नेता होऊ नये याची खत सघटनाकाँग्रेसच्या नेत्याना वाटली तर ते समजण्यासारखे आहे; परतु-काही गोष्टीना इलाज नसतो- आणि विशिष्ट परिस्थितीमध्ये काही अप्रिय निर्णय स्वीकारावे लागतात आणि व्यापक हिताच्या दृष्टीने ते पचवावेही लागतात. आपले काही तरी हरवले जात आहे, स्वत च्या अस्तित्वाची दखल घेतली जात नाही याचे जे दु ख सघटनाकाँग्रेसमधील काही नेत्याना वाटते तो प्रामुख्याने मानसिक खेळ आहे सत्ताधारी काँग्रेसचे आपणच वारसदार असल्याची कल्पना करून घेतल्याने जे मिळाले त्याबद्दल समाधान मानण्यापेक्षा जे मिळाले नाही त्याबद्दल खंत करण्याची प्रवृत्ती दिसते ज्याना जनतापक्षामध्ये स्थान नाही असे सघटनाकाँग्रेसचे जे नेते आहेत त्यानीच आज आवाज उठविला असला तरी संघटनाकाँग्रेसच्या गटामध्ये असतुष्टता आहे ही तर दिसती गोष्ट आहे. चरणसिंग पतप्रधानाना सत्ताभ्रष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत यासारखे जे आरोप आहेत ते हेतुत: केले जात असून वृत्तपत्रीय स्वातंत्र्याचा पूर्ण फायदा घेत अवाजवी विषारी वातावरण निर्माण करणे हाच त्यामागील मुख्य उद्देश आहे. सघटनाकाँग्रेसचे नेते आणि अनुयायी यानी म्हणूनच जास्त सावध राहणे-आणि जनतापक्षाचे ऐक्य मजबूत राहण्यासाठी प्रयत्नशील राहाणे अगत्याचे आहे. ताकदीच्या दृष्टीने विचार केला तर एक गोष्ट निश्चित की,- जनसंघ हा जनतापक्षाच्या घटकपक्षामधील सर्वात बलिष्ठ पक्ष असून,- भालोद आणि समाजवादी याचा क्रम त्याच्या खालोखाल आहे सुदैवाने पतप्रधान मोरारजी देसाई हे सघटनाकाँग्रेसमधील काही नेत्याच्या मनामध्ये असलेली ही खुपरेपणाची भावना मानण्यास तयार नाहीत. त्याचा दृष्टिकोन निकोप आणि राष्ट्रीय नेत्याला साजेसा आहे केवळ काँग्रेसचा विचार करण्यास ते तयार नाहीत आणि स्वातंत्र्य सपादन करून देणारा काँग्रेसपक्ष १९६९ साली काँग्रेस दुभगली त्याच वेळी सपला असे ते मानतात. निवडणुका घोषित झाल्यावर ज्या वेळी मोरारजींची तुरुगामधून सुटका झाली त्या वेळी जनता नवीन पक्षाची उत्सुकतेने वाट पाहात असल्याची त्याना जाणीव झाली. सधिसाधू राजकारणापासून आणि लाचखोरीपासून दूर असलेल्या पक्षाचे चांगले स्वागत होईल हे लक्षात आल्यावर नवीन पक्षाच्या उभारणीचे काम झाले आणि नवीन पक्षाचा अधिकृत जन्म होण्यापूर्वीच जनतेने येऊ घातलेल्या या पक्षाला सत्ता बहाल केली जनतापक्षाला मिळालेल्या यशाचे श्रेय कोणा एकाला घेता येणार नाही. जनसघ-सघटनाकाग्रेस-भालोद आणि समाजवादी याच्या एकत्रीकरणाला जयप्रकाशजीचे आशीर्वाद मिळाले आणि यशाची आशा दुणावली बाबुजीनी सत्ताधारी काँग्रेसवर बॉबगोळा टाकला आणि हे यश अधिक सभवनीय वाटू लागले आणि तरीही जनतापक्षाला निवडणुकीमध्ये जे यश मिळाले ते बाधलेले अदाज कोलमडून टाकणारे होते. जनतापक्षाच्या बाधणीमध्ये मोरारजीभाईंचा मोठा वाटा होता. जनतापक्षाला मिळालेल्या

यशाचे पुरेपूर श्रेय आणि त्याच्या योग्यतेचा सन्मान त्याच्या वाटयाला आला. आता निवडणुका मागे पडल्या— आणि यशामुळे आलेली जबाबदारी उचलण्याची अवघड वेळ येऊन ठेपली आहे आणि प्रत्यक्ष काम करण्याची ही जबाबदारी जनतापक्ष कशा प्रकारे पार पाडतो याच गोष्टीवर जनतापक्षाचे भवितव्य ठरणार आहे. □

## एम्. जी. रामचंद्रन : अभिनेता....नेता

अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघमपक्षाचा संस्थापक आणि या पक्षाला विधानसभा निवडणुकामध्ये निर्विवाद बहुमत मिळवून देणारा नेता जनतेला प्रिय आहे तो अभिनेता म्हणूनच. मद्रासच्या हिंदूने राज्याची सूत्रे सांभाळणाऱ्या या नवीन नेत्याचे असे वर्णन केले आहे— ६५ वर्षांचा रामचंद्रन एखाद्या अठरा वर्षांच्या तरुणासारखा वावरतो. निदान आपल्यामध्ये ती तडफ आहे हे दाखविण्याची त्याची सारखी धडपड चालू असते. कारण आजही पडद्यावरील त्याचे वय १८ ते २५ हेच आहे, आपले खरे वयही तेच आहे अशी त्याची समजूत असावी. डोक्यावर असलेला 'विग' दिसू नये म्हणून तो टोपी घालतो आणि डोक्यावर गरगरीत टक्कल असल्याने विग वापरतो. दोन्ही डोळ्याच्या भुवया साफ केल्या असल्याने— तो गॉगल वापरतो. चित्रपटामध्ये काम करताना अर्थातच तो आपल्या भुवया रगवतो. त्याचा रंगभूषाकार कायम त्याच्याबरोबर असतो आणि तो नसलाच तर रगभूषेचे सामान कटाक्षाने तो स्वत.जवळ बाळगतो. जन्माने तो मल्याळी असला तरी त्याची सारी कारकीर्द तामिळनाडूमधील आहे. असख्य चित्रपटामध्ये काम केलेल्या एम् जी आर. ने प्रयत्नपूर्वक निर्माण केलेल्या आपल्या प्रतिमेला छेद जाईल अशी वेडीवाकडी भूमिका त्याने कधीही स्वीकारली नाही. तो उत्तम प्रियकर,— गरिबांचा कैवारी, अशाच स्वरूपाच्या भूमिका स्वीकारतो. पडद्यावर तो कधीही अयशस्वी होत नाही— राजकारणाच्या वेड्यावाकड्या खेळी खेळण्यातही त्याने यश मिळविले आहे. ··· अपयश न पाहिलेला हा नेता आपलेही भले करील अशी भाबडी आशा लोक बाळगून आहेत. □

---

**सप्रेम नमस्कार : पृष्ठ ४ वरून**

व शेरेबाज होत जाते हे नमूद करण्यास खेद होतो. ( उदाहरणार्थ, पाचव्या परिच्छेदातील त्याचा बनचुके–नवशिकेपणाबाबतचा शेरा. ) अधूनमधून (च)— म्हणजे पहिल्या, पाचव्या व सहाव्या परिच्छेदात, श्री. मराठे यांनी माझी दया येत असल्याचा आव आणलेला आहे. तो तर मला असह्य होणाराच आहे

( कारण बराचसा दडपलेला माझा अहंकार मला वारंवार टोचतो आहे, की माझी अशी कीव, गय, दया कुणी करावी ? चंद्रशेखर मराठे यानी ? ) □

'किनारा'वर मी प्रतिकूल अभिप्राय दिल्याने श्री कोपर्डे नाराज झालेले दिसतात माझ्या परीक्षणाचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने त्यानी किनाराचे एक प्रतिपरीक्षण (counter–review) लिहिला आहे. या प्रतिपरीक्षणाचे आणखी एक परीक्षण लिहिणे मला अशक्य नाही. तथापि मी ते करू इच्छित नाही, कारण त्यातून आत्मसमर्थन साधले तरी परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही किनाराच्या बाबतीत श्री. कोपर्डे व मी दोन टोकाच्या विरोधी मताचे आहोत हे स्पष्टच आहे आणि त्यात बदलाचा यत्न करणे शक्य व योग्यही वाटत नाही कलेच्या प्रांतात असे मतभेद अपरिहार्यच नव्हेत तर स्वागतार्हसुद्धा आहेत. या क्षेत्रात कोणत्याच प्रश्नाना अतिम, सर्वमान्य व सर्वथा सत्य उत्तरे नसतात. ज्याने त्याने आपल्या रसग्रहणक्षमतेच्या प्रकाशात आपला मार्ग शोधायचा असतो अस मला वाटत.

गुलजारवर मी अन्याय केलेला आहे असे एकीकडे लिहितानाच माझ्या परीक्षणातले टीकेचे बरेच मुद्दे श्री. कोपर्डे यानी मान्य केले आहेत. शिवाय जे मुद्दे मी माझ्या मूळच्या लिखाणातच मान्य केलेले आहेत (उदा. गुलजारच्या हातूनही चुका घडण्याची शक्यता) तेही कोपर्डे नव्याने उपस्थित केल्यासारखे लिहून काय साधतात ? त्यांनी किनाराच्या चागल्या बाजूची यादी देण्याचा प्रयत्न केला आहे, पण माझ्या लिखाणात किनाराच्या सगळ्याच प्लस पॉइंटस्चा (आणि सगळ्याच मायनस पॉइंटस्चाही उल्लेख स्थलकालाअभावी मला करता आलेला नाही हे मी मूळ लिखाणाच्या शेवटी स्पष्ट केलेलेच आहे माझे परीक्षण मी विचारपूर्वक लिहिले आहे व श्री कोपर्डे यानी केलेल्या किनाराच्या तरफदारीमुळे त्यात फरक पडण्यासारखा नाही.

श्री. कोपर्डे यानी माडलेल्या दोन शकाची उत्तरे फक्त थोडक्यात देतो. एक : गुलजाराच्या सिनेमाची रे— बेनेगलशी तुलना करणे सोपे नाही. त्याच्या तोडीची वास्तवता मी गुलजारकडून अपेक्षीत नाही, कारण गुलजार मूलत कवी आहे तथापि त्याच्या आंधीसारख्या lyrical कलाकृतीलासुद्धा, किंबहुना त्याच्या आजपर्यंतच्या बहुसंख्य चित्रपटाना जी वास्तवतेची किनार असायची, ती मात्र 'किनारा'ला नाही एवढीच माझी तक्रार आहे. दोन : नाम गुम जाएगा किंवा अब के ना सावन बरसे या ओळीतले काव्य मला कुठेच प्रभावी वाटत नाही. किनारामध्ये कवी व लेखक या नात्याने गुलजारची कर्तबगारी मला कुठेच भिडली नाही. गीताच्या ओळी देऊन प्रश्न विचारल्याने काही फरक पडण्याची शक्यता नाही.

माझे किनाराबद्दलचे लिखाण निरनिराळ्या जागी बरेचसे मान्य करूनही पुन्हा ते उथळ, एककल्ली, पूर्वग्रहयुक्त, अन्यायकारक व विनोदी आहे असे श्री कोपर्डे म्हणतात. माझी मते चुकीची ठरवून त्यानी स्वत ची मते माडली आहेत. आता, वस्तुत मीही त्याच्या या प्रतिक्रियात्मक मतप्रदर्शनाचा याच प्रकारे समाचार घेऊ शकतो. त्याचे लिखाण 'त्या अमुकतमुक चुका खऱ्या आहेत हो; पण जरा इकडेही बघा की,' अशा नमुन्याचे आहे, अस मी म्हणू शकतो, तथापि हा प्रकार मी करू इच्छित नाही. माझे कुठलेही मत सर्वांनीच शिरोधार्य मानावे असा दुराग्रह मला कसा धरता येईल ? किनाराबद्दलची माझी सर्व मते कायम असली तरी श्री कोपर्डे याच्या व मतभेद व्यक्त करणाऱ्या इतराच्या मताबद्दल मला आदर वाटतो त्याची मते मला मान्य होण्यासारखी नसली, तरी व्हॉल्टेअरच्याच शब्दात सागायच तर, 'त्याना ती बाळगण्याचा व माडण्याचा अधिकार जरूर मिळावा यासाठी मी प्रयत्न करीन !'

—शिरीष सहस्रबुद्धे

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३०।७।७७ ते ५।८।७७

### जागतिक राजकारणात भारताचे महत्त्व वाढेल

या सप्ताहाच्या सुरुवातीलाच मकर-राशीत चंद्र उदित आहे व चंद्रासमोर रवि–शनी ठाण मांडून बसले आहेत राजकारण, सत्ताकुशलता, सामर्थ्याचे प्रदर्शन याबाबतीत रवि-शनीची उत्तम साथ मिळणार आहे. त्यामुळे जागतिक राजकारणाचे डोळे लोक-शाही भारताकडे खिळले जाणार आहेत. रशिया, अमेरिका व चीन ही राष्ट्रे इतकेच काय पाकिस्तानदेखील भारताच्या परराष्ट्र-धोरणाकडे अधिक आपुलकीने ओढली जातील. अमेरिका व रशिया यांच्याकडून मदतीची आश्वासने मिळणार आहेत. भारताचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी पुन्हा एकदा लोकांच्या आनंदाचा विषय बनतील. मंगळ वृषभराशीत आहे त्याचा परिणाम पीकपाणी उत्तम होणार असून महागाईची तीव्रता कमी होणार आहे. तेले, खाद्यतेले, साखर, कडधान्ये, सोने, चांदी, शेअर्सची वाढलेली भावपातळी खाली येऊ लागणार आहे. औद्योगिक क्षेत्रात थोडे सौम्य वातावरण राहील लोकांचा असंतोषदेखील थोडाफार कमी होणार आहे. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई जाणवणार नाही केंद्रीय मंत्रिमंडळात वाढ, बदल तसेच खातेबदल होऊ शकतील. महाराष्ट्रात नरेंद्र तिडके यांचा मार्ग फारसा अनुकूल नाही.

**मेष : आशा बहरतील**

चौथा रवि–शनी, तिसरा गुरु, पाचवा बुध आणि दुसरा मंगळ सारे ग्रहच तुमच्या-वर सध्या खूष आहेत. अशी अनुकूल परि-स्थिती गेल्या कित्येक दिवसात तुमच्या वाट्याला आलेली नाही. म्हणूनच या वेळी या अनुकूलतेचा फायदा करून घ्या. मंगळ हा तुमच्या राशीचा स्वामी आहे. तो तुम्हाला बरेच काही बहाल करणार आहे. उद्योग-धंद्यातील तुमच्या आशा बहरणार आहेत. नव्या कल्पना प्रत्यक्षात आणता येतील. रसायने, शेतीची अवजारे, स्टेशनरी वगैरे उद्योगाला प्रगतिकारक चालना मिळेल. नोकरीत काळजी नको, पण बारावा केतू आहे याकडे दुर्लक्ष करू नका गुप्त शत्रू त्रास देणारच नाहीत यावर विश्वासून राहू नका. शुभ ३१–२

**महिलांना** स्वतंत्र उद्योगात स्थैर्य मिळेल.

**विद्यार्थ्यांना** अभ्यासात मन गुंतविणे आवश्यक आहे.

**वृषभ : आत्मविश्वास वाढेल**

मंगळ राशीत आहे ही एकच गोष्ट तुमच्याबाबतीत यशाची खात्री द्यायला पुरेशी आहे. आजवर जी कामे होत नव्हती किंवा प्रयत्न करूनसुद्धा जी माणसे तुमच्या-बाबतीत उदासीन होती ती या वेळी आपण-हून तुम्हाला सहकार्य देणार आहेत. प्रामुख्याने आर्थिक बाजू बरीच सुधारणार आहे. लोकांच्याकडे पैसे येणे असतील तर ते वसूल होणार आहेत. नोकरलोकांचे चांगले सहकार्य मिळणार आहे. उद्योगधंद्यात नव्या तंत्राचा वापर करायला बरीच अनुकूलता आहे. धंद्यातील अडचणी दूर होतील. मित्रत्वाचे संबंध वाढतील. नोकरीत चांगले दिवस आहेत. नोकरीची शाश्वती मिळेल. बढती प्रमोशन मिळू शकेल प्रयत्नांना यश मिळणार आहे. शुभ ३१–३

**महिलांना** ' संसारात गोडवा व प्रेम राहील

**विद्यार्थ्यांना** पैशाची टंचाई भासणार नाही.

**मिथुन : खर्च वाढणार आहे**

राशिस्वामी बुध तिसरा आहे तो तुमची कार्यक्षमता उंचावणार आहे बुद्धिमत्ता वापरून कोणतेही काम यशस्वी करण्यात तुमची कसोटी लागणार आहे, पण त्या कसोटीला तुम्ही पूर्णपणे उतरणार आहात. रवि–शनीचा सहयोग धनस्थानी आहे. त्यामुळे पैसे मिळण्यात काहीच अडचणी येणार नाहीत. विशेष करून व्यापार व शेअर्सविषयक व्यवहार तसेच इन्कमटॅक्स सल्लागारासारखा व्यवसाय तेजीत चालेल. कर्जाचा व्यवहार कटकटीचा होणार नाही. जमीनखरेदी–विक्री काळजीपूर्वक करा. या वेळी अनपेक्षित खर्च वाढणार आहे. घरदुरुस्ती, वाहनदुरुस्ती असे काही तरी घडेल. नोकरीच्या दृष्टीने एकदरीत अनु-कूलता आहे चालू नोकरी कायम नसल्यास कायम होईल शुभ १–२.

**महिलांना :** घरसंसारात नव्या वस्तू आणू शकाल.'

**विद्यार्थ्यांना** . केवळ स्मृतीवर अवलंबून राहू नका.

**कर्क : व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव**

तुमची रास चंद्राची आहे. पण त्याला शनीने ग्रासले आहे. शनीची साडेसाती अजून काही काळ तुम्हाला ग्रासणार असली तरी, राशीतच सध्या शनीबरोबर रवीदेखील आलेला आहे. तो तुमच्या व्यक्तिमत्त्वाला आकर्षक आकार आणणार आहे. कोणत्याही क्षेत्रात तुम्ही कोणतेही काम करा तुमची लोकप्रियता वाढणार आहे तुमच्याकडे अनेकांचे डोळे लागणार आहेत धंद्यात मोठी उलाढाल होईल व्यापारउदीम चांगला नफ्यात चालेल तुम्ही कलावंत असाल तर तुमची लोकप्रियता वाढणार आहे. नोकरीत बढती–प्रमोशन मिळू शकेल. ज्यांच्या नोकऱ्या कायम नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. वरिष्ठाकडे मागण्या मांडल्यास त्या मंजूर होतील. शुभ ३, ४.

**महिलांना :** तब्येतीची थोडी काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना** आळसाने वागत राहाल.

**सिंह : अजून थोडे थांबा**

राशीतच बुध आहे. बारावा शनी व रवी आता जरी तुम्हाला फार त्रास देणार नसले तरी त्यांची कूटकारस्थाने चालूच राहणार आहेत, पण त्याला तुम्ही सावध राहून तोंड देऊ शकता या वेळी मंगळ दहावा आहे याचे फार मोठे उपकार तुमच्यावर होणार आहेत हाती फार मोठी सत्ता येईल अशी चिन्हे दिसू लागतील तुम्ही राजकारणात आता फार मोठी कामगिरी करू शकाल. अधिकार वाढणे, प्रतिष्ठा उंचावणे, कोणत्याही स्पर्धेत यश मिळणे असे काही तरी या वेळी होईल. नोकरीत तुमच्यासाठी मोठी कामगिरी चालून येईल. भावी अनुकूल काळाची ती नांदीच ठरेल. मात्र सर्वांगीण यश पदरात पडायला अजून थोडा काळ थांबलेच पाहिजे शुभ ३१, २

**महिलांना** नोकरीत बढती प्रमोशन मिळू शकेल.

**विद्यार्थ्यांना** महत्त्वाच्या परीक्षेत यश मिळेल.

**कन्या : अर्थलाभ**

कन्या राशीला सध्या बरेच अनुकूल दिवस आहेत. अनेक ग्रहांची मर्जी तुमच्यावर सध्या आहे तुम्ही जे मनात आणाल किंवा जे करायचे ठरवाल ते मोठे यश देऊन तुमच्या पदरात पडणार आहे. राशीत राहू उत्तम आहे अकरावा शनी-रवी आर्थिक बाजू बलवान करण्याचा प्रयत्न करीत आहे. तुम्ही रेस खेळत असाल तर या वेळी बरेच मोठे घबाड तुमच्या पदरात पडू शकेल अशी ग्रहांची अनुकूलता आहे. दुय्यम व्यवसायाला चालना मिळून उत्साहाने त्यात रस घेऊ

शकाल. नोकरीत सगळीकडे तुम्हाला अनुकूल वातावरण राहाणार आहे. गुप्त शत्रूंना डोळे वर काढायला वेळच मिळणार नाही. कामाचा ताण पडणार आहे; पण त्याचबरोबर कार्यक्षमता व सामर्थ्यदेखील वाढणार आहे शुभ ३०, ३.

**महिलांना :** तब्येतीची कुरकूर आता राहाणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात बरीच मजल माराल.

## मूळ : नोकरीत बढती

एकटा राहु बारावा असला तरी त्यामुळे तो तुमचे प्रगतीचे गाडे मुळीच अडवू शकणार नाही. कारण रवी-शनी दहावे आहेत. ते तुमच्या प्रतिष्ठेचे व संपत्तीचे रक्षण करायला समर्थ असताना राहूचे कोणतेच डावपेच यशस्वी होणार नाहीत. फार फार अनपेक्षित खर्च वाढू शकेल. हौसेला मोल नसते या न्यायाने तुम्ही तुमच्या राहण्याची जागा आकर्षक बनवण्यासाठी खर्च करणार असाल तर त्याला उपाय कोणता ? पैसा मिळण्यात अडचण नाही. नोकरीत तर हा आठवडा अतिशय महत्त्वाचा जाणार आहे. काही अनुकूल बदल अपेक्षित आहेत. बढती कामात अनुकूल बदल असे काही तरी घडू शकेल. प्रवासाला जाण्याची तयारी ठेवा. कारण अनपेक्षित प्रवास घडू शकेल शुभ १, ३.

**महिलांना :** मन प्रसन्न ठेवणाऱ्या घटना घडणार आहेत.

**विद्यार्थ्यांना** · संगीतकलेत प्राविण्य मिळू शकेल.

## वृश्चिक : प्रगतीला वेग

अनेक प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीतून तुम्ही आता बाहेर पडला आहात. आता तुम्हाला तशी कोणतीच खरी म्हणजे काळजी उरलेली नाही. नोकरी असो की धंदा असो त्यात प्रगतीचे वारे वाहणार आहेत. प्रगतीला वेग येणार आहे. धंद्यात नवे काहीतरी घडवू शकाल. स्वतंत्र योजना आखून त्यांत स्वत:ची बुद्धी उपयोगात आणू शकाल. पैसा कमी पडणार नाही. बँकेतून कर्ज मिळू शकेल. शेतीकडे लक्ष द्यावे रसायने, खते, स्टेशनरी, जमिनीची खरेदी-विक्री यात लाभ होईल. खूप दिवसाचे स्वप्न साकार होईल. बेकाराना नोकरीत स्थान मिळेल. वणवण, त्रास संपुष्टात येईल. चालू नोकरीत कार्यक्षमतेचा प्रत्यय येऊ लागणार आहे, वरिष्ठांची मर्जी राहील. मनात असलेल्या अपेक्षा पूर्ण होईल. शुभ- दि ३-५

**महिलांना :** नोकरीत वरिष्ठाची सहानुभूति राहील

**विद्यार्थ्यांना :** कोणत्याही भांडणांत भाग घेऊ नका.

## धनु : पैसा मिळेल.

आता तुम्हाला चागले दिवस येत चालले आहेत व त्याचे प्रत्यतर देखील येऊ लागले आहे. राहू ही एक चागली शक्ति तुमच्या पाठीशी उभी आहे. त्यामुळे व्यापार व व उद्योगात अकस्मात भरभराट होणार असे दिसते वायदे अचूक ठरतील. केलेले अदाज बरोबर उतरतील. तब्येत जरा नरमगरम राहणार आहे. कारण रवि व शनि हे दोन्ही ग्रह आठवे आहेत. पण त्याचा तुमच्या प्रत्यक्ष कामावर कोणताच परिणाम होणार नाही. उलट स्थावरापासून जमिनजुमल्यापासून, रेस-लॉटरीपासून लाभ होण्याचा सभव आहे. पैशांची कमतरता अजिबात नाही ही या वेळेची खास परिस्थिती आहे. प्रवास अचानक होईल. नोकरीच्या दृष्टीने काही अनुकूल घटना घडू शकतील. शुभ- दि ३०-३१

**महिलांना :** माहेरच्या मदतीचा लाभ होईल.

**विद्यार्थ्यांना :** मानसिक सामर्थ्य वाढेल.

## मकर : उपेक्षा सपेल.

चंद्रासमोर शनि आहे व आता रविदेखील तेथे आहे. रवि-शनि ही एकत्र जोडी तशी चागली नाही. तरीपण व्यक्तिमत्त्वावर त्याचा परिणाम थोडाफार अनुकूल होणार आहे. गेले काही दिवस तुमची जी उपेक्षा होत होती ती आता संपणार आहे. अर्थात तुम्ही लोकाच्या टीकेचे विषय होणार आहात. सध्या तरी तुम्हाला चांगुलपणा मिळणे फार कठीण आहे अशा प्रतिकूल परिस्थितीतदेखील तुम्हाला त्रास भोगावा लागणार नाही आर्थिक स्थिती मात्र समाधानकारक राहील. उत्पन्नात भर पडेलच असे नाही. नोकरीत वरिष्ठाच्या मनात व मालकवर्गाच्या मनात गैरसमज निर्माण होतील असे दिसते. तूर्त तुम्ही तुमच्या मागण्या व अपेक्षा ताणून धरणे हिताचे होणार नाही. शुभ दि. ३-४.

**महिलांना :** तब्येतीच्या बऱ्याच कटकटी कमी होतील.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षकांवर तुमच्या हुशारीचा प्रभाव पडेल.

## कुंभ : विरोधकांवर विजय

राशिस्वामी शनी सहावा आहे व रविबरोबर त्याचा सहयोग झाला आहे ही एक अतिशय अनुकूल घटनाच आहे तुमच्या धूर्त राजकारणाला त्यामुळे अनुकूल कलाटणी मिळणार आहे. एखादी महत्त्वाची कामगिरी तुमच्या वाट्याला येणार आहे तुमची बुद्धी कसोटीला उतरणार आहे. या वेळी आजवर उराशी बाळगलेले स्वप्न साकार होण्याची चिन्हे दिसू लागतील. मोठेपणा चालत येईल. उद्योगात सरशी होईल. तोटा भरून निघेल. अडचणी दूर होतील. नव्या योजना प्रत्यक्षात आणण्यास अनुकूलता आहे. विरोधक मग ते घरातले असोत की सार्वजनिक क्षेत्रातील असोत- तुम्हाला सहकार्याचा हात देणार आहेत. शेती, व्यापार, वकिलीव्यवसाय व्यवस्थित चालणार आहे. नोकरीत तुमचे काम वरिष्ठाच्या पसतीला उतरून तुमच्यावर मर्जीराहणार आहे. बेकारांना शुभकारक. शुभ दि.-२-३

**महिलांना :** नोकरीत असलेल्या अडचणी दूर होतील.

**विद्यार्थ्यांना** · कलेला प्रोत्साहन मिळेल.

## मीन : सारीच अनुकूलता

इतका छान अनुकूल काळ नशिबानेच वाट्याला येनो. या वेळी तुमच्या नशिबाचा वारू वाऱ्याच्या वेगाने घोडदौड करणार असला तर आश्चर्य वाटू देऊ नका. इतर कोणतेही ग्रह तुम्हाला साथ देवोत अथवा न देवोत पण रवि-शनी सामर्थ्य देत आहेत. त्याचा फायदा तुम्ही घ्याल तेवढा थोडा आहे एखाद्या अत्यत महत्त्वाच्या पत्रव्यवहारात या वेळी यश येईल. तुमची एखादी खूप दिवसाची इच्छा सफल होईल. मोठेपणा घे घे म्हणून तुम्हाला मिळेल. नेतृत्व अगर पुढारीपणा तुमच्या पदरात पडणार आहे. तुमच्या लेखणीचे व वाणीचे तेज झलतेच चमकणार आहे. स्फूर्ती प्रसन्न होणार आहे. नोकरी-व्यवसायात आशाआकांक्षा सफल होणार आहेत. अनेक प्रकारे लाभ दृष्टिपथात येणार आहेत. थोडाफार बदलही संभवतो. कौटुंबिक आनद मिळणार आहे शुभ दि.-३०-३.

**महिलांना :** ससारात आनंददायक घटना घडेल.

**विद्यार्थ्यांना :** सर्वत्र कौतुक करून घेण्याचे भाग्य लाभेल. ☐